
ऑगस्ट २०१५ / पाने ६० / किंमत ₹१०/-

# लोकराज्य



## जलयुक्त शिवार

### शाश्वत सिंचन : समृद्ध जीवन

# राज्यातला शेतकरी सुखी होऊ दे...



राज्यातील शेतकरी सुखी होऊन महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् होऊ दे, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पांडुरंग चरणी घातले. यावेळी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती अमृता फडणवीस, महसूल मंत्री एकनाथ खडसे, हिंगोली जिल्ह्यातील, कळमनुरी तालुक्यातील पिंपरी (खुर्द)चे मानाचे वारकरी राघोजी नारायणराव धांडे व त्यांच्या पत्नी श्रीमती संगीता धांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

वर्ष ६७ वे | अंक २ | ऑगस्ट २०१५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई



## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in


## अंतरंग


### शाश्वत सिंचन, समृद्ध जीवन

महाराष्ट्रातील काही भागाला सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. याचा परिणाम गावोगावच्या विकासावर झाला आहे. पाणी हाच सगळ्यात मोठा प्रश्न झाल्याने इतर सोयीसुविधा, पायाभूत सुविधा, मुलांचे शिक्षण याकडे गावाचे दुर्लक्ष होत गेले. नव्या सरकारपुढे पाणी समस्येचे आव्हान उभे ठाकले होते. या आव्हानावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.


६


१६

### नवी गुंतवणूक, नव्या संधी

महाराष्ट्रात सुरू झालेल्या नव्या विकासपर्वाबाबत संपूर्ण अमेरिकेत झालेली जोरदार प्रतिमा निर्मिती हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नुकत्याच पार पडलेल्या अमेरिका दौऱ्याचे वैशिष्ट्य आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणारी हजारो कोटींची गुंतवणूक करण्यासंदर्भात या दौऱ्यात प्रामुख्याने सामंजस्य करार करण्यात आले.

### सारे काही शेतकऱ्यांसाठी


२०

शेतकऱ्यांच्या हितासाठी मुख्यमंत्र्यांनी विविध निर्णय घेतले आहेत. त्याचा फायदा होऊन त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### ।। जाता पंढरीसी, सुख वाटे जीवा।।



लाखो वारकरी मोठ्या भक्तिभावाने दरवर्षी आषाढी वारीसाठी पंढरपूरला 'जाऊ देवाचिया गावा घेऊ तेथेचि विसावा' या ओढीने येतात. वारकऱ्यांची ही वारी अधिक सुकर व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष प्रयत्न केले. ३०

### लोकसहभागातून वनसंवर्धन

वनांचे जतन आणि संवर्धन लोकसहभागातून करण्याचा निर्धार वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे.


२६

### ।।संस्कृती।। ओळख पुण्याची: पगडी अभिमानाची ४२

### किल्ले शिवछत्रपतींचे

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत नव्याने बांधण्यात आलेल्या किल्ल्यांचा उद्देश कोकण व देश यांना जोडणाऱ्या घाटमार्गांवर लक्ष ठेवणे, कर जमा करणे आणि शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवणे, हा होता. ४४

### पावसाळ्यातील आजार

निरामय

पावसामुळे वातावरणात तत्काळ होणाऱ्या बदलांमुळे रोगराईला बळी पडण्याची शक्यता असते. त्यावर मात करण्यासाठी उपयुक्त टिप्स ४६

### ढगांसोबत ट्रेकिंग

भ्रमंती

महाराष्ट्रातील अनेक किल्ले ट्रेकिंगचा थरारक अनुभव देतात. त्यापैकी एक म्हणजे लोहगड! ४८

### सूत्रबद्ध नियोजन

प्रेरणा


यंदा नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातून पहिल्या आलेल्या अबोली नरवणे यांचे मनोगत. ५०

## सप्रेम नमस्कार

### कुंभमेळा विशेषांक सुंदर

१२ वर्षांनी नाशिक येथे होत असलेल्या कुंभमेळ्याचे औचित्य साधून लोकराज्यने प्रसिद्ध केलेला कुंभमेळा विशेषांक खूप सुंदर झाला आहे. कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य, शाही स्नान, कुंभमेळ्याची पंरपरा त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील पर्यटनस्थळांची माहिती दिल्याने आता कुंभमेळ्यासोबत नाशिक पर्यटनही करता येईल.

**शरद चावरे, कोल्हापूर**




### संग्राह्य


लोकराज्यचा जुलै महिन्याचा कुंभमेळा विशेषांक संग्राह्य झाला आहे. कुंभमेळ्याची सविस्तर माहिती यातून मिळते. याबरोबरच राज्यात सुरू असलेल्या जलयुक्त शिवार योजनेविषयीची माहिती देणारा लेखही सुंदर आहे. लोकराज्यची इतर सदरे नेहमीप्रमाणेच वाचनीय आहेत. लोकराज्यच्या संपादकीय टीमला खूप शुभेच्छा!

**– स्वरूप कुलकर्णी, पुणे**

### ज्ञानाचे साधन

लोकराज्य म्हणजे आमच्या विद्यार्थी जीवनातील एक अत्यंत जवळचे व ज्ञानाचे साधन हाती आल्याने, आम्ही ज्ञान घेण्यास उत्सुक आहोत. जूनच्या अंकातील 'सप्तपदी स्वच्छतेची पायाभरणी स्मार्ट महाराष्ट्राची' हा लेख खूप छान वाटला.

**– रवी तायडे, बुलडाणा**




### विद्यार्थ्यांसाठी नवसंजीवनी

लोकराज्य हे मासिक सर्व बाजूंचा वेध घेणारे आहे. या मासिकातील लेख हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा आलेख उंचावणारे ठरत आहेत. शिवाय या मासिकामधील प्रेरणा हे सदर विद्यार्थ्यांना आपली वाटचाल ठरविताना मदत करते. प्रत्येक क्षेत्रातील सखोल माहिती या मासिकातून मिळत असल्याने हे मासिक स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अप्रत्यक्षपणे योग्य मार्गदर्शन करते.

**– तुषार कांबळे, पुणे**

### उपयुक्त

लोकराज्य मासिकाची मी नियमित वाचक आहे.

लोकराज्य मासिकातून आम्हा वाचकांना जाणकारांचे लेख, यशस्वितांच्या मुलाखती, तज्ज्ञांच्या मुलाखती, उपयुक्त सूचना वाचायला मिळतात.

**– उज्वला राम शेळके, तरोडा(खु), नांदेड**




### ज्ञानात भर


लोकराज्य मासिक वाचनीय आणि ज्ञानात भर घालणारे असे कौटुंबिक मासिक आहे. एप्रिल २०१५ मधील 'महामानव आपला आदर्श: आपली प्रेरणा' हा लेख अत्यंत वाचनीय होता. त्यामधील युगपुरुषाच्या आठवणी हा लेख वाचनीय व ज्ञानात भर घालणारा होता. तसेच मे महिन्यातील 'अभेद्य दुर्गनीती' वाचल्यावर शिवाजी महाराजाच्या राज्यकारभाराची ओळख झाली.

**– कु. उज्वला हिरामण शिरसाट,**
**मु.पो. सुनगाव, ता. जळगांव (जामोद)जि. बुलढाणा**

### निर्णयांची माहिती

लोकराज्य मासिकातून उपयुक्त माहिती मिळते. विविध विषयानुसार लेख असतात. मंत्रिमंडळाच्या विविध कामकाजाची व निर्णयांची माहिती मिळते. विधिमंडळाने एका महिन्यात घेतलेले निर्णय व राबवलेले उपक्रम यांची माहिती मिळते. एप्रिल २०१५ चा अंक छान आहे. ह्या अंकात इतिहासकार निनाद बेडेकर यांचा समृद्ध वारसा हा लेख छान आहे.

**– यशवंत गुरव, लांजा**




### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.
**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

अतिथी संपादकीय



# लोकचळवळ जलसमृद्धीची

महाराष्ट्रातील जलसमस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार ही महत्त्वाकांक्षी योजना राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. या योजनेमध्ये जलसंधारणाच्या विविध योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. गावाच्या शिवारातील पाणी गावातच साठवून भूपृष्ठावरील आणि भूगर्भातील जलपातळी वाढण्यास या योजनेचा मोठा हातभार लागणार आहे. लोकसहभागातून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सर्वत्र होत आहे. यामुळे शाश्वत जलसाठा निर्माण होण्यास साहाय्य होईल. या जलसाठ्यामुळे कृषी उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. राज्यात विविध ठिकाणी सुरू असलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यावर आधारित मुखपृष्ठ कथा या अंकात समाविष्ट करण्यात आली आहे.

नुकत्याच संपलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या हितासाठीचे अनेक निर्णय घेऊन त्यांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. पुढील पाच वर्षात २५ हजार कोटी रुपयांचे विविध विकास कार्यक्रम राबवण्यात येतील. यामध्ये एक लाख विहिरी, दीड लाख शेततळी, २२ लाख शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण आदी बाबींचा समावेश आहे. या उपायांमुळे शेतकरी कर्जमुक्त होऊन तो आत्मनिर्भर होण्यास नक्कीच साहाय्य होईल.

शहरांच्या गरजेनुसार भौतिक, सामाजिक आणि संस्थात्मक सुविधांचा सर्वंकष विकास करण्यासाठी केंद्र शासनातर्फे देशातील १०० शहरांमध्ये स्मार्ट सिटी योजना राबवण्यात येत आहे. महाराष्ट्रातील दहा शहरांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजनेमुळे शहरांना नवे स्मार्ट रूप मिळण्यासोबतच आर्थिक विकासालाही चालना मिळेल.

वनविकास आणि संवर्धन याबाबत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विशेष मुलाखत या अंकात आम्ही दिली आहे. आपल्या विभागामार्फत नव्या संकल्पना साकार करण्यासाठी कटिबद्ध झालेल्या वेगवेगळ्या खात्याच्या ज्येष्ठ मंत्र्यांच्या मुलाखती वाचकांच्या पसंतीस उतरल्या आहेत.

हा अंक छपाईसाठी जात असतानाच देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या निधनाचे वृत्त आले. त्यांच्या मृत्यूमुळे थोर शास्त्रज्ञ, देशभक्त आणि लोकांच्या हृदयात कायमस्वरूपी स्थान मिळवलेल्या थोर नेत्याला आपला देश मुकला आहे. त्यांनी आम्हास भव्यदिव्य स्वप्ने पाहण्यास शिकवले. भारतास २०२० पर्यंत सामर्थ्यशाली राष्ट्र बनवण्याचे स्वप्न त्यांनी बघितले. या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी आपण साऱ्यांनी झटणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. लोकराज्य परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**मनीषा पाटणकर–म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)



# शाश्वत सिंचन, समृद्ध जीवन

**गेल्या दोन दशकांपासून राज्यातील विविध भागात दुष्काळाचे सावट कायम आहे. सार्वत्रिक पावसाचे आणि मान्सूनमधल्या निश्चित पर्जन्यमानाचे दिवस मागे पडले आहेत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवार योजनेवर लक्ष केंद्रित केले आहेत. येत्या पाच वर्षात २५ हजार गावांना पाणी टंचाईमुक्त करण्याचा त्यांचा संकल्प आहे. पहिल्या वर्षी ५ हजारांपेक्षा अधिक गावे या योजनेत सहभागी झाली आहेत. आता जलयुक्त शिवार ही लोकचळवळ झाली आहे. सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात या चळवळीत सहभागी होत आहेत. शाश्वत सिंचन-समृद्ध जीवन हे मुख्यमंत्र्यांचे स्वप्न आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी महाराष्ट्र हळूहळू सज्ज होत आहे. या अनुषंगाने टीम लोकराज्यने महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जाऊन जलयुक्त शिवार योजनेच्या कामांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्याचा हा आँखो देखा हाल...**

गेली काही वर्षे राज्याला दुष्काळाला तोंड द्यावे लागल्याने पाण्याची परिस्थिती बिकट झाली होती. मूलभूत सोयीसुविधा उभारणे हाच पाण्याच्या समस्येवरचा तोडगा आहे. हे जाणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील २५००० दुष्काळी गावांना येत्या पाच वर्षात दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला.

दरवर्षी पाच हजार गावे दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प कितीही चांगला असला तरी त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागणार आणि उत्तम नियोजनही करणे गरजेचे आहे. लोकसहभागातून ही कामे वेगाने पूर्णत्वास जाऊ शकतात, हे मुख्यमंत्र्यांनी हेरले आणि त्यांच्या हाकेला प्रतिसाद देऊन गावोगावची जनता तन-मन-धनाने त्यांच्या मागे उभी राहिली. यातूनच साकारली गेली जलयुक्त शिवार योजना. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकसहभागातून साकारलेली ही सर्वात मोठी चळवळ आहे.

महाराष्ट्राला तसा पुरेसा पाऊस, मोठ्या नद्या, तलाव, आणि मोठे ओढे यांचे वरदान लाभले आहे. पण गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या काँक्रिटीकरणाच्या लाटेमध्ये या नैसर्गिक स्रोतांचे मोठे नुकसान झाले. राज्य दुष्काळाच्या खाईत लोटले जाण्यामागे हे एक मोठे कारण आहे.

### नैसर्गिक प्रवाह

कोणत्याही प्रकारची नैसर्गिक रचना मुळात अतिशय समतोल असते. एखाद्या प्रदेशात टेकड्या, डोंगर, खोलगट भाग, पठारे, मैदाने अशा वेगवेगळ्या भूरचना, तेथील वृक्षराजींचे आवरण आणि पावसाचे प्रमाण याचा एकत्रित परिणाम म्हणून तेथील नैसर्गिक प्रवाह तयार होतात. हे नैसर्गिक प्रवाह म्हणजे नद्या, ओढे, नाले व आणखी

लहान प्रवाह. आपण त्याचे कसे संवर्धन करतो यावरच मुख्यत: त्या त्या प्रदेशाचे भवितव्य ठरत असते. कोणत्याही प्रदेशातील नागरिकीकरण होताना नैसर्गिक संरचनेत थोडे बदल करावेच लागतात. महाराष्ट्रात नागरिकीरणाचा वेग प्रचंड आहे आणि याच्या रेट्यात प्रवाह गिळंकृत होण्याचा वेग प्रचंड वाढला यातच काही नाले-ओढे कायमचे नष्ट झाले. नैसर्गिक प्रवाहांवर अतिक्रमण झाले.

नाले-ओढे नाहीत असे शहर, गाव, खेडे महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. या नैसर्गिक स्रोतांना पुनरुज्जीवित करण्याचे मोठे काम जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून होत आहे.

दुष्काळी गावांमध्ये झालेली कामे बघितल्यानंतर लोकांमध्ये उत्साह संचारला आणि अवघ्या सात महिन्यात एकूण ९९ हजार १५४ कामे ६ हजार २०२ गावांमध्ये झाली.

जलयुक्त शिवार योजनेमध्ये लोकसहभागातून झालेली कामे बघितली तर अवाक् व्हायला होते. आपल्याकडे एक पूर्वांपार चालत आलेली म्हण आहे, 'गाव करी ते राव न करी' या म्हणीची सत्यताच ही कामे बघितलं की कळते.

गावालगत वाहणाऱ्या छोट्या नद्यांच्या पाण्यावर खरेतर त्या गावाचे जीवन आधारलेले असते. या नद्यांकडे गावांचे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी त्यांचे प्रवाह तुंबले, पात्रात कुठे झाडेझुडपे वाढली. पात्रे उथळ झाली. कहर म्हणजे काही ठिकाणी या नद्यांचे पात्रेच



**स्वतंत्र भारताच्या इतिहासामध्ये सर्वात मोठा लोकसहभाग असलेले जलयुक्त शिवार अभियान विकेंद्रित व शाश्वत जलसाठे निर्माण करणारी परिवर्तनाची लोकचळवळ ठरली आहे. पावसाचा पडणारा प्रत्येक थेंब स्वत:च्या मालकीचा आहे आणि तो माझ्या जमिनीत माझ्याच गावात मुरला पाहिजे. या जाणिवेतून पाणवठा, सिंचन व विकेंद्रित जलसाठे निर्माण करण्याचे काम जनता मोठ्या प्रमाणावर करत आहे.**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

बदलली. या साऱ्याचा परिणाम ही गावे दर पावसाळ्यात भोगत आहेत. पाऊस थोडा झाला तरी गावात पाणी शिरणे नित्याचे होते. याशिवाय गावातील पाणी पातळी खालावणे आणि दुष्काळ गावांच्या जणू पाचवीलाच पूजलेला.

### लोकांमध्ये जागरूकता

जलयुक्त शिवार योजनेबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी गावोगावी जलदिंड्या निघाल्या. वाजत-गाजत आलेल्या या जलदिंड्यांनी गावांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले. छोट्या-छोट्या गटांनी पुढाकार घेऊन गावकऱ्यांचा सहभाग मिळवला आणि 'न भूतो' अशी कामे गावागावांत झालेली आहेत. या अभियानातून नदी, नाले, ओढे यांचे खोलीकरण, रुंदीकरण, साखळी सिमेंट नाला बांध, जुन्या लघुपाटबंधाऱ्याची



## नद्या खोल झाल्या, विहिरींना पाणी वाढले...

निसर्गाला वाटेल तसे वाकवले तर काय होते हे अकोला जिल्ह्यातील तेल्हाऱ्याच्या गावकऱ्यांपेक्षा कोणी सांगू शकणार नाही. सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेले तेल्हारा हे टुमदार गाव. पाऊस भरपूर त्यामुळे शेतीभाती उत्तम. पण दरवर्षी पाऊस आला की गावकऱ्यांची पाचावर धारण बसायची. गावाजवळून वाहणारी गौतमा नदी तिच्या काठावर झालेले अतिक्रमण, पात्रात वाढलेली झाडेझुडपे यामुळे पार उथळ झालेली. दर पावसाळ्यात कित्येकदा गावातल्या घरांमध्ये या नदीचे पाणी शिरायचे आणि गावकऱ्यांचे अतोनात नुकसान व्हायचे. २०१४-१५ या वर्षी गौतमा नदीला आलेल्या पुरामुळे तेल्हारासह आजूबाजूच्या १३ गावांमधील ३८३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. या सर्वांवर मात करायची झाल्यास नदीचे पात्र खोल करणे आवश्यक होते. त्यासाठी लोकचळवळच उभी राहिली. लोकसहभागातून १० किलोमीटरपर्यंत या नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. ५ लाख ४० घनमीटर गाळ काढण्यात आला. या गाळाचा उपयोग जमीन सुपीक करण्यासाठी आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी करून घेतला.

अकोट तालुक्यातल्या दिवठाणा गावची कथाही अशीच. दिवठाण्याचा ओढा ग्रामस्थांनी लोकसहभागातून खोल केला तसेच पूर्वीपासून असलेल्या सिमेंट नाला बांधाऱ्याची दुरुस्ती केली. जूनमध्ये झालेल्या पावसाळ्यात हा नाला ओसंडून वाहु लागल्याचे आजूबाजूचे शेतकरी सांगत होते. जून महिन्यात परिसरात पाऊसच आला नाही पण नाल्याला भरपूर पाणी होते. शेतकऱ्यांनी पंप लावून पिके वाचवली. अकोट तालुक्यात जवळपास ७० सिमेंट नाला बंधाऱ्याचे खोलीकरण रुंदीकरण आणि दुरुस्ती करण्यात आली.

जलयुक्त शिवार म्हणजे काय हे शब्दश: बघायचे तर अकोला जिल्ह्यातील घूसर गावाला भेट द्यायला हवी. या गावात २५६ शेततळी आहेत. रस्त्याने जाताना जागोजागी शेततळी दिसतात. मौजे घुसर हे गाव खारपाण पट्ट्यात येते. इथे ओलिताचे दुसरे साधन नाही. त्यामुळे शेततळ्यांना पर्याय नाही. या शेततळ्यांच्या पाण्यावर येथील शेतकरी कापूस, सोयाबीन, हरभरा यांचे पीक घेतात.

सदरपूर हे असेच गाव. या गावातल्या शेतकऱ्यांनी बांधलेला सामुदायिक तलाव खरच वाखाणण्याजोगा आहे. १९००० घनमीटर साठवण क्षमता सदरपूरच्या तलावाची आहे. १३० बाय १५० मीटरचा हा तलाव ४५० हेक्टर शेतीला नवे जीवनदान देणार आहे.



## जलकुंभ

दिवस बदललेत, पावसाचे प्रमाण लहरी झाले आहे हे लक्षात घेऊन पाणी वापरले पाहिजे याचे भान शेतकऱ्यांना जलयुक्त शिवार योजनेमुळे आले. आता पाणीटंचाई संपेल, अशी अपेक्षा जेव्हा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे यांनी व्यक्त केली, तेव्हा आम्ही उभे होतो गंगापूरच्या गोल तलावाकाठी. लोकेच्छेतून काय बदल घडू शकतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हे काम.

गंगापूर हे लातूर तालुक्यातले ७-८ हजार उंबऱ्यांचे गाव. रोज साधारणपणे १ लाख लीटर पाणी या गावाला लागते. पाण्याची ही गरज गावात असलेल्या मोठ्या तलावाने काही अंशी भागवली जाते पण उन्हाळ्याचे चार महिने गावाला तीव्र पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते. पाणीसाठा वाढवणं हे पाणीटंचाईवरचे उत्तर या गावाला अभियानादरम्यान पटले. त्यासाठी या गोल तलावाची साठवण क्षमता वाढवण्यासाठी या तलावात आणखी एक तलाव खोदण्याचा निर्णय गावाने घेतला.

५० ते ५२ एकरात पसरलेल्या गोल तलावात १०० मीटर बाय १०० मीटरचा आणि २५ ते ३० फूट उंचीचा तलाव निर्माण केला. गावकऱ्यांनी या तलावाला नाव दिलेय जलकुंभ. या जलकुंभाची साठवण क्षमता २ कोटी लीटर आहे. गावकऱ्यांच्या या प्रयत्नांना आता शासनाची साथ लाभली आहे. तलावाला आतून प्लास्टिकचे कोटिंग करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी पांडुरंग पोल यांनी केली होती. ते एवढ्यावरच थांबले नाही तर साडे आठ लाख रुपयांचे प्लास्टिक उपलब्ध करून दिले. नुकतीच त्याला मंजुरी मिळाली असल्याने लवकरच ह्या तलावाला प्लास्टिकचे आवरण मिळेल.

लातूर जिल्ह्यामध्ये गावोगावी वाहणाऱ्या छोट्या नद्या आणि मांजरा नदीच्या उपनद्यांना पुनरूज्जीवन देण्याचे मोठे कार्य लोकसहभागातून झाले. आर्ट ऑफ लिव्हिंगचे कार्यकर्ते, लायन्स क्लबचे सभासद आणि स्थनिक नेते यांच्या प्रेरणेने सुरू झालेली ही कामे आज लक्षणीय ठरली आहेत. रेणापूर गावातून रेणा नदी वाहते. मांजरा नदीची ही उपनदी. या नदीच्या पात्रात उगवलेल्या झाडाझुडपांनी नदीचे अस्तित्वच संपुष्टात आणले. जी कथा रेणा नदीची तशीच काहीशी बामणीच्या जाना आणि कव्हा गावच्या तावरजेची. जाना नदीने तर चक्क पात्रच बदलले होते. रेणा नदी ८ किलोमीटरपर्यंत गावकऱ्यांनी खोदून काढली. तिचे पात्र आता ४० मीटर रुंद झाले आहे. या खोलीकरणातून जो गाळ निघाला त्यातून आजूबाजूच्या शेतांची सुपीकता वाढली. १ कोटी २७ लाख रूपयांचे हे काम लोकसहभागातून झाले आहे, यावर विश्वास बसत नाही.

दुरुस्ती, ओढे-नाले जोड प्रकल्प, मध्यम व मोठ्या प्रकल्पांच्या क्षमतेचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने विचार, पाणी वाटप संस्थांचे बळकटीकरण अशी एक-दोन नाही तर हजारो कामे अवघ्या सात महिन्यात गावकऱ्यांनी केली.

### चांगला बदल

जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची पाहणी करण्यासाठी राज्यातील अनेक गावांना भेट दिली तेव्हा गावागावांत झालेला हा बदल प्रकर्षाने जाणवला. सोलापूर जिल्ह्यातील लातूरमध्ये फक्त २८ गावे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत निर्धारित करण्यात आली होती, पण या गावांशिवाय इतर गावांनीही उत्साहाने या योजनेत सहभागी होत दुष्काळमुक्तीचा निर्धार केल्याचे जाणवत होते. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन झाले पाहिजे याची जाणीव आज महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत निर्माण झाली आहे.

या जागृतीचा आणखी एक दृश्य परिणाम गावात जाणवतो तो म्हणजे या प्रकल्पांबद्दल गावकऱ्यांमध्ये आपुलकीची भावना आहे. गावातल्या नद्या, नाले, ओढे, तलाव यांचे संवर्धन ही आपली जबाबदारी आहे हे त्यांना पटले आहे. त्यामुळे लोकसहभागातून झालेली जलयुक्त शिवार योजनेची कामे हे गावकरी अभिमानाने दाखवतात आणि या योजनेबद्दल बोलताना त्यांच्या चेहऱ्यावर



**पाण्याचा थेंब आपण निर्माण करू शकत नाही. मात्र तो वाचवणे हे आपल्या हातात आहे. जलयुक्त शिवार अभियान हे आता शासनाची योजना राहिलेली नसून ती लोकांचे झाले आहे या योजनेला उत्स्फूर्त लोकसहभाग मिळत आहे. हा केवळ धरण-तलांवापुरता कार्यक्रम नाही, तर पाणी पातळी सातत्याने टिकवणारा कार्यक्रम आहे.**

**- एकनाथ खडसे, कृषीमंत्री**

उत्साह ओसंडून वाहत असतो.

पावसाच्या अनियमिततेने राज्याला याही वर्षी ग्रासले आहे. जूनमध्ये राज्यात दाखल झालेला मान्सून महिनाभर दडी मारून बसला होता. लातूरमध्ये तर जून महिन्यातही म्हणावा तसा पाऊस झाला नाही. त्यामुळे या सगळ्यांना प्रतीक्षा होती ती पाऊस येण्याची. आपण केलेल्या कामांची यशस्वितता बघण्यासाठी सगळे उत्सुक होते. त्यामुळे अगदी ठरवल्यासारखे सगळे म्हणायचे बघा ना एवढी कामे झाली पण पाऊस तोंड दाखवत नाही!

## जलसमृद्धीतून आर्थिक समृद्धीकडे

अनियमित पावसाचा धसका सर्वांनीच घेतला आहे. जेव्हा तो यावा यासाठी डोळे आसुलले असतात, तेव्हा तो हमखास डोळ्यात आसवे आणतो. यंदाच्या जुलैमध्ये तसेच घडले. पहिल्या पंधरवाड्यात पावसाने दडी मारली. पिकांना जेव्हा पाण्याची अधिकच गरज असते, तेव्हा त्याचे नसणे यासारखी वेदनादायक गोष्ट दुसरी नाही. यावर काहीच उपाय नाही का ? उतारा नाही का ? पावसाच्या पाण्याला पर्याय नाही हे शाश्वत सत्य आहेच. पण त्याच्या लहरीपणावर निश्चितरीत्या मात करता येऊ शकते. ही शक्यता जलयुक्त शिवारामुळे निर्माण झाली आहे. याचे प्रत्यंतर नुकतेच नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील सहा-सात ठिकाणच्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामांची पाहणी केल्यानंतर लक्षात आले. राज्य शासनाची ही महत्त्वाकांक्षी योजना गेल्या तीन चार महिन्यांपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. यामध्ये विविध १८-१९ विभागाच्या जलसंधारण आणि जलसंचयाच्या योजनांचे एकत्रीकरण करून पाण्याचे स्रोत बळकट करणे, गाळ काढणे, बांधबंदिस्ती करणे, नाला खोलीकरण आदी उपायांचा समावेश आहे.

हिंगणा तालुक्यात उखळी गावातील नाली खोलीकरणामुळे या नाल्याच्या आसपास असणाऱ्या विहिरींची जलपातळी गेल्यावर्षीपेक्षा सध्या अधिक झाली. उखळी येथील जुना सिमेंट नाला बंधारा १९९४-९५ साली बांधण्यात आला होता. गाळ साचून या बंधाऱ्याच्या पाणी साठवण आणि पाणी वहन क्षमतेवर परिणाम झाला होता.



## बंधारे भरले, पिके तरली...

जानेवारीमध्ये सिमेंट नाला बंधाऱ्याच्या बांधणीला सुरुवात झाली...आणि जुलैमध्ये बंधाऱ्याच्या पाण्याची ऊसासाठी उपसा सिंचनाला मदत झाली, अशा यशकथेचे प्रात्यक्षिक पाहण्याची संधी नुकतीच कोल्हापूर जिल्ह्यात आली. जून महिन्याच्या प्रदीर्घ उघाडीनंतर आणि जुलैतील पाऊस येण्या आधी जलयुक्त शिवार योजनेतून प्रत्यक्ष मिळत असलेला लाभ कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात काही सिमेंट नाला बंधाऱ्याची पाहणी करता आली. करवीर तालुक्यातील छोट्या दोन गावातील हे कमी क्षमतेचे बंधारे शेतकऱ्यांच्या शाश्वत सिंचनाचे स्वप्न अगदी दोन महिन्यात पूर्ण करीत असल्याचे बघून मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीची खात्री पटली. एखादा मोठा प्रकल्प सहा महिन्यात पूर्ण होऊ शकला नसता आणि त्याचा लाभ घ्यायला कितीतरी वर्ष लागली असती. पण हे प्रत्यक्षात उतरले होते. सांगवडे येथील नाल्यामध्ये पहिला बांध पाहिला. पाऊस उलटून महिना झाल्यावरही तो तुडुंब भरून होता. मी बांधावर गेलो तेव्हा शेतात आजूबाजूला काम करणारे शेतकरी जवळ आले. सांगवडे येथील बंधाऱ्यामुळे विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याचे त्यांनी समाधान व्यक्त केले. गावाला नदी नसल्यामुळे बारमाही बागायत करता येत नव्हती. मात्र या गावामध्ये गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. गावाच्या परिसरात ५ ठिकाणी छोट्या बंधाऱ्यांमुळे मोठ्या प्रमाणात पाणी अडवले गेले. कोल्हापूरसारखे महानगर जवळ असणाऱ्या या गावातील शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात आंतरपीक घेण्यास सुरुवात केली. बंधाऱ्यातील पाणीसाठा वाढल्याने विहिरींना पाणी मुबलक असून मोठ्या प्रमाणात भाजीपालाही नगदी पिकाच्या स्वरूपात शिवारात दिसून आला. या ठिकाणी एकत्र आलेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान होते.

दुसरा एक बंधारा कणेरीवाडी येथे बघता आला. या ठिकाणच्या वीज पंपाची घरघर आणि वाहते पाणी बघून शाश्वत पाणीसाठे आपल्या जीवनात किती बदल घडवून आणू शकतात याची खात्री पटली. छोट्या बंधाऱ्यामुळे महिनाभर पावसाने दडी मारल्यावरही शेतकऱ्यांचा धीर सुटला नाही...सोबतच विहिरीही तुडुंब भरल्या. शेतकरी जलयुक्त शिवार योजनेबद्दल भरभरून बोलत होते..महाराष्ट्राचे चित्र बदलायला सुरुवात झाल्याचा प्रत्यय या शेतकऱ्यांशी बोलून येत होता. कल्याणकारी राज्यातील लोकोपयोगी योजनांचा आविष्कार आणखी काय असू शकतो.

कृषी विभागांतर्गत असलेल्या या नाल्याच्या खोलीकरणाचा समावेश जलयुक्त शिवार योजनेत करण्यात आला. २२५ मीटर लांब असलेला हा नाला तीन-चार महिन्यांपूर्वी गाळ साचल्यामुळे कसा दिसत होता, याची छायाचित्रे मंडळ कृषी अधिकारी भगत यांनी दाखवली.

गाळ काढल्यावर या नाल्याचे रूप बदलून गेले आहे. जून महिन्यातील पावसामुळे हा नाला पाण्याने भरून गेला होता. त्यामुळे आजूबाजूच्या शेतीचा ओलावा कायम राहिला. शेतातील विहिरींची पाणीपातळी वाढली. जुलै महिन्यात पावसाने १२-१५ दिवस दडी मारल्यावरही शेताचा ओलावा कायम होता. त्यामुळे पिकांवर फारसा परिणाम झालेला दिसला नाही. आणखी सात-आठ दिवस पाऊस पडला नाही तरी हा ओलावा कायम राहील असे श्री भगत यांनी सांगितले. खोलीकरणामुळे या नाल्यामध्ये पाणी साठा होऊन त्याचा लाभ यंदाच्या रब्बी हंगामात चांगला दिसून येईलच शिवाय पुढल्या वर्षी याचा अधिक चांगला परिणाम दिसून येईल. शेतकऱ्यांनी ठरवले तर ते भाजीपाल्यासारखी पिके सतत घेऊन आपले उत्पन्नही वाढवू शकतात याकडे भगत यांनी लक्ष वेधले.

खोलीकरणामुळे निघणारा गाळ काही शेतकऱ्यांनी शेतात



**राज्यातील टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सरकारने जलयुक्त शिवार अभियान राबवण्याचा निर्णय घेतला. त्याद्वारे दरवर्षी राज्यातील पाच हजार गावे दुष्काळमुक्त करण्यात येत आहेत. या पाणी चळवळीत सहभागी होत असून शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होत आहे.**

**- पंकजा मुंडे,**
**ग्रामविकास आणि जलसंधारणमंत्री**

टाकला. त्याचा उपयोग खतासारखा त्यांना झाला. या बंधाऱ्यावरील माती वाहुन जाऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणही करण्यात येत आहे. पुढील वर्षी हे वृक्ष वाढलेले दिसतील. हिरवीगार शेती, तुडुंब भरलेली विहीर, भरलेला नाला, नाल्याच्या आजूबाजूला झाडांच्या रूपाने निर्माण झालेली वनश्री असे आल्हाददायक आणि नयनरम्य चित्र हे केवळ स्वप्न राहणार नसून ते एक-दोन वर्षात वास्तवातसुद्धा उतरू शकते.

कृषी विभागाने एकात्मिक पाणलोट विकास क्षेत्र कार्यक्रमाशी या जलयुक्त शिवाराचा संबंध जोडला आहे. त्यामुळे ही कामे होत असतानाच शेताची बांधबंधिस्ती करण्यात येत आहे. त्यावर तुरीसारखी डाळवर्गीय झाडे लावण्यात येत आहेत. यंदा जागतिक डाळ वर्ष असल्याने डाळीच्या उत्पादन वाढीसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणारा आहे. याच भागात समतल चर बांधणीचाही एक प्रकल्प एका नजीकच्या टेकडीवर घेण्यात आला. या टेकडीवरून पावसाच्या पाण्यामुळे सुपीक माती वाहुन जात असते. ही माती नाल्यात जात असल्याने गाळ साचत असे. यामुळे नाले बुजत



## बारमाहीच्या दिशेने अग्रणी....

खानापूर, तासगाव आणि कवठेमहांकाळ या तीन तालुक्यातून जाणाऱ्या आणि नदी काठावरील २१ गावांना थेट साहाय्यभूत होणारी जवळपास ५५ किलोमीटर लांबीची अग्रणी नदी पूर्वापार प्रवाहित करून ती बारमाही करण्याच्या कामाला प्रत्यक्षपणे सुरुवात झाली आहे. अग्रणी नदी बारमाही करण्याचे काम शासन आणि विविध सेवाभावी संस्थांच्या पुढाकाराने गावकऱ्यांच्या लोकसहभागातून हाती घेतले आहे.

## डोंगरवाडीकर सुखावले

अभियानास सांगली जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. शासकीय योजना आणि लोकसहभागातून येत्या मार्चअखेर पहिल्या टप्प्यात १४१ गावे टंचाईमुक्त होतील. यापैकी एक असलेल्या मिरज तालुक्यातील डोंगरवाडी गावानेही या अभियानात भरीव काम केल्याने गावाच्या जमिनीतील पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसत आहे. टंचाईवर मात करणाऱ्या या अभियानासाठी सांगली जिल्ह्यात ३५८ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला असून टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात लोकसहभाग हा महत्त्वाचा घटक ठरत आहे. यंदा या अभियानासाठी शासनाच्या विविध योजनांद्वारे ७८ कोटी ५४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून या निधीतून पहिल्या टप्प्यात १४१ गावे मार्च २०१६ अखेर टंचाईमुक्त होतील.

**– एस. आर. माने**

## सुजलाम सुफलाम मदनी



पिण्याच्या पाण्याची कायम टंचाई असलेल्या मदनी गावात जलयुक्त शिवार अभियानामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा स्रोत उपलब्ध झाला. नाल्यावर बांधलेल्या सिमेंट नाला बंधाऱ्यामुळे केवळ गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला नाही, तर शिवारातील शेतीला शाश्वत सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले. पावसाच्या दडीमुळे पिकांना आवश्यक असलेले पाणी मदनी (आमगाव)चे शेतकरी तुषार सिंचनाद्वारे देऊन जगवित आहेत.

कोरडवाहु अशा जमिनीला शाश्वत सिंचनाचा मार्ग मिळाला. सात किमीवर असलेल्या बोरखेडी धरणावर अवलंबून राहावे लागत असलेल्या या ग्रामस्थांना अभियानाच्या माध्यमातून गाव सुजलाम सुफलाम् करण्यासाठी नवी दिशा सापडल्याने ग्रामस्थांमध्ये चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळते.

एकूणच अभियानाच्या अंमलबजावणीने भूगर्भातील पाणीसाठा वाढविण्यास मदत होत आहे. जिल्ह्यात ७४ शेततळी, मृदा संवर्धन, १२ हजार ३६० हेक्टर क्षेत्रावर ढाळीचे बांध, ७७ बंधारे, ९७ किलोमीटर नालाखोलीकरण आदी कामे राबवण्यात येऊन अभियानातील आदर्श मॉडेलही वर्धा जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे.

मदनी गावामध्ये कोरडवाहु शेती अभियानाच्या माध्यमातून १२ लाख ८७ हजार आणि ८ लाख ४० हजार रुपये किमतीच्या खर्चाचे एकूण दोन सिमेंट बंधारे उभारण्यात आले. यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होऊन आजूबाजूच्या शेतीतील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. या दोन्ही बंधाऱ्यात अनुक्रमे १३.०५ टीसीएम आणि ९. ०१ टीसीएम पाणीसाठा होण्यास मदत होणार आहे. गावात सध्या पाणी असल्याने गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर चैतन्य असल्याचे पाहावयास मिळते.

सहा एकर शेती कसणारे मंदार देशपांडे म्हणतात, आमचे गाव टंचाई घोषित गाव. पाण्यासाठी नेहमीच वणवण. त्यासाठी जवळच्या बोरखेडी धरणावरच अवलंबून रहावे लागते. महिला वर्गाला पाण्यासाठी, कपडे धुण्यासाठी वणवण भटकावे लागत असे. धरणाच्या पाण्यावरच आम्हा सर्वांना अवलंबून राहावे लागत असे. पण सिमेंट नालाबांध करून पाणी अडविण्यात आल्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे.

**– श्याम टरके, वर्धा**



## राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांकडून जलयुक्त शिवार योजनेचे कौतुक

महाराष्ट्रात जलयुक्त शिवार ही लोकचळवळ झाली असून सिंचन व जलस्तर वाढविण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे. राजस्थान सरकारदेखील याच धर्तीवर राज्यातील टंचाईग्रस्त भागातील जलस्तर वाढविण्यासाठी प्रयत्न करेल. स्वत:च्या गावातील पाणी स्वत:साठी वापरा हा संदेश देत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेली ही लोकचळवळ नक्कीच शाश्वत सिंचनाचा मार्ग मोकळा करणारी आहे, अशा शब्दात राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी या याजनेचे कौतुक केले आहे. जयपूर येथे राजस्थान सरकारने टंचाई निवारण करण्यासाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या आयोजनामध्ये महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या या लोकचळवळीचे सादरीकरण रोहयो व जलसंधारण सचिव प्रभाकर देशमुख यांच्या नेतृत्वात करण्यात आले. उस्मानाबादचे जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे व सातारा जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल यांनी दोन जिल्ह्यातील यशकथांचे सादरीकरण केले. या सादरीकरणाने प्रभावित होऊन जलयुक्त शिवार योजनेचा महाराष्ट्र पॅटर्न राजस्थानमध्ये राबवण्याचा निर्णय राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

असत. आता या टेकडीवर ठिकठिकाणी विशिष्ट पद्धतीने स्थानिकरीत्या उपलब्ध दगडांचे चर बांधण्यात आले आहेत. त्यामुळे टप्प्या-टप्प्यावर वाहुन जाणारी माती अडणार आहे. या टेकडीवर वृक्षारोपणाचेही काम मोठ्या प्रमाणावर घेण्यात येत आहे. सध्या ओसाड दिसणाऱ्या या टेकडीस पुन्हा एकदा हिरव्या छत्राचे वैभव प्राप्त होईल.

भौगोलिक रचनेमध्ये कमालीचे वैविध्य असणाऱ्या आपल्या राज्यातील प्रत्येक गावाचे पाण्याचे प्रश्न वेगळे, त्यांचे राजकरण, अर्थकारण वेगळे. यामुळेच त्यांचे पाणीप्रश्नावरचे उत्तरही प्रत्येकाचे वेगळे आणि ज्याचे त्याने शोधलेले. या साऱ्यांचे दृश्य परिणाम येत्या काळात बघायला मिळतील. गावांची पाणी प्रश्नांवर झालेल्या एकीतून पायाभूत सुविधांची उभारणी होईल, असा विश्वास वाटतो.

### बीड

बीड जिल्ह्यात एकूण १४०३ महसूली गावांपैकी २०१४-१५ व १५-१६ करिता एकूण ३३३ गावे जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडण्यात आली आहेत. यापैकी २७१ गावात शासकीय विविध



## नाला झाला खोल, जमिनीत राहिली ओल...

पुणे जिल्ह्यातील खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुके डोंगराळ आणि दुर्गम आहेत. या भागात पाऊस चांगला पडतो. पण पावसाचा प्रत्येक थेंब साठवण्याचे प्रयत्न होत नसल्याने पुन्हा पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत असे. या समस्येवर आता चांगलाच तोडगा निघत आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या कामांतून पावसाचा प्रत्येक थेंब साठवण्याचे नियोजन पुणे जिल्हा प्रशासनाच्या खेड आणि आंबेगाव तालुका जलयुक्त शिवार समितीने केले आहे. याचे एक उदाहरण म्हणजे खेड तालुक्यातील वाफगाव येथील ओढ्यावरचा सिमेंट नालाबांध.

वाफगाव येथील या बंधाऱ्यांची उंची प्रथम एक मीटर होती. त्यामुळे या ओढ्यात पाणीसाठा होत नसे. पण आता या नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. त्याचबरोबर बंधाऱ्याची उंचीही वाढवण्यात आली. त्यामुळे नाल्याची साठवण क्षमता वाढली. खोलीकरण आणि सरळीकरण करताना या नाल्यातून सुमारे तीन हजार घनमीटर माती काढण्यात आली. आता या नाल्याची खोली तीन मीटरहुन अधिक झाली आहे. रुंदी सुमारे १६० मीटर करण्यात आली आहे. त्यामुळे या नाल्यात मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा झाला आहे.

या वाढलेल्या पाणीसाठ्यामुळे परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत वाढ झालीच आहे. त्याचबरोबर जमिनीचा ओलावाही टिकून आहे. या नाल्याच्या काठावर असणाऱ्या शेतजमिनीतील पाणीपातळीत चांगली वाढ झाली असल्यामुळे पावसाने ओढ दिली असली तरीही पिकांना जगवण्यात शेतकरी यशस्वी झाले आहेत. सध्या काही शेतकऱ्यांनी नाल्यात साठलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करता यावा यासाठी स्प्रिंकलरचा वापर केला आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या पाण्यात जास्तीत जास्त पिके घेता येणे शक्य असल्याचे, तालुका कृषी अधिकारी लक्ष्मण होतकर यांनी सांगितले.

वाफगाव नाल्याच्या खोलीकरणाबरोबरच खेड तालुक्यातील विविध गावांत जलयुक्त शिवार अभियानातून १२ ते १३ कामे सुरू आहेत. त्याचबरोबर विविध औद्योगिक कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून आठ कामे सुरू असल्याचे उपविभागीय अधिकारी हिंमतराव खराडे यांनी सांगितले.

### कर्मचाऱ्यांनी घेतले गाव दत्तक, देणार एक दिवसाचा पगार

अभियानाला सर्व स्तरातून भरघोस पाठिंबा मिळत आहे. बारामती तालुक्यातील सर्व विभागांच्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जलयुक्त शिवार अभियानात तालुक्यातील सोनवडी-सुपे हे गाव दत्तक घेतले आहे. या गावात जलसंधारणाची कामे करण्यासाठी एक दिवसाचा पगार जमा केला आहे. हा उपक्रम प्रशासनाच्या सामाजिक दायित्वाचे सकारात्मक उदाहरण ठरले आहे.

यंत्रणेची एकूण १०७४ कामे पूर्ण झाली आहेत. १३०९ कामे सुरू असून त्यावर अंदाजे ३० कोटी २ लाख रुपये एवढा खर्च झालेला आहे.

### निवड प्रक्रियेतही लोकसहभाग

जलयुक्त शिवार योजनेत माझे गाव कसे सहभागी करता येईल? किंवा का नाही? असा प्रश्न पडू शकतो. मुळात ज्या ठिकाणी सध्या टंचाई आहे. टँकर लावावे लागतात, अशाच गावांची यादी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तयार केली जाते. ही यादी तयार करतानाच खऱ्या अर्थाने लोकसहभाग सुरू होतो. निवडीसाठी एक तालुकास्तरीय समिती आहे. यामध्ये गावपातळीवरील ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहायक, कृषी पर्यवेशक, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतिशील शेतकरी यांचा समावेश असतो. यांच्यासोबतच हे कर्मचारी शिवार फेरीचे आयोजन करून कामाची निश्चिती अर्थात कृतिआराखडा तयार करतात. लोकसहभागाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे या कृतिआराखड्याला ग्रामसभेची मान्यता आवश्यक आहे. याशिवायही या योजनेचा लाभ आपल्या गावाला  मिळावा असे वाटणारा सामान्य नागरिक जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी अर्ज करू शकतात. या योजनेच्या लोकप्रियतेनंतर राज्यभर अशी मागणी वाढत आहे.

### खांडवा गाव बनले पाणीदार

बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालुका हा कायम अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. येथील जनता वर्षभर पाण्यासाठी आसुसलेली असते. या गावातील टंचाई दूर करण्यासाठी येथील भूजल पातळी वाढविणे गरजेचे होते. त्याच हेतूने गाव जलयुक्त शिवार अभियानात निवडण्यात आले. बघता बघता गावाच्या शिवारात बंधारे बांधण्यात आले. गाव बंधाऱ्यात साठलेल्या पाण्यामुळे पाणीदार बनले.

आता या शिवारातील विहिरी पाच दहा नव्हे, तर ३०-४० फुटांपर्यंत पाण्याने वधारल्या आहेत. अशा प्रकारच्या कामांमुळे मोताळा तालुक्यातील १७ गावांना फायदा झाला आहे. टंचाई व टँकरमुक्तीकडे ही गावे निघाली आहेत.

# गती मिळाली जलयुक्त शिवाराला

**जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कंपार्टमेंट बंडिंग, ढाळीचे बांध, सलग समतल चर, खोल सलग समतल चर, माती नाला बांध, साखळी सिमेंट नाला बांध, सिमेंट नालाबांध दुरुस्ती, के.टी.वेअर दुरुस्ती, पाझरतलाव दुरुस्ती, गाव तलाव, नाला सरळीकरण/खोलीकरण, गाळ काढणे, शेततळे, ओढा जोड प्रकल्प, विहीर/बोअर पुनर्भरण, रिजार्च शाफ्ट, ठिबक सिंचन, तुषार सिंचन या सर्व योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. जिल्हानिहाय १० जुलैपर्यंतच्या कामांची माहिती पुढीलप्रमाणे:**

| जिल्हा | निवडलेली गावे | लोकसहभागातून कामे सुरू झालेली गावे | कामांची अंदाजित रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ |
| अहमदनगर | २७९ | २७९ | २.५९ |
| धुळे | १२९ | २६ | ४.५६ |
| जळगाव | २३२ | ७१ | ५.४७ |
| नंदुरबार | ७२ | ७० | १.४ |
| नाशिक | २२९ | १२८ | ११.८९ |
| अमरावती | २५३ | २२ | १.५९ |
| अकोला | २०० | ११७ | २६.६४ |
| बुलडाणा | ३३० | २०६ | १५.२४ |
| वाशिम | २०० | ६८ | ३.३३ |
| यवतमाळ | ४१३ | ४६ | ५.४६ |
| नागपूर | ३१३ | १३४ | ०.०६ |
| भंडारा | ८६ | ८६ | ० |
| गोंदिया | ९४ | ५२ | ५.०३ |
| चंद्रपूर | २१८ | ३० | ० |
| गडचिरोली | १५२ | ५८ | ०.६९ |
| वर्धा | २१४ | २४ | ०.५७ |
| पुणे | १९८ | १५९ | २१.३१ |
| सातारा | २१५ | १५३ | ४.८१ |
| सांगली | १४१ | ९३ | १.७८ |
| सोलापूर | २८० | २८० | २७.३ |
| कोल्हापूर | ६९ | ६९ | ०.०००५ |
| ठाणे | २६ | ० | ० |
| पालघर | ५० | २५ | ०.०५२८ |
| रायगड | ४५ | १ | ०.५९४३ |
| रत्नागिरी | ४७ | ४७ | ०.००३ |
| सिंधुदुर्ग | ३५ | ९ | ०.०७०५ |
| औरंगाबाद | २२८ | १३५ | १८.११ |
| जालना | २०९ | ९० | ३.८ |
| बीड | २७१ | २२ | ५.६६ |
| परभणी | १७० | ११५ | ७.४ |
| हिंगोली | १२४ | ३४ | ४.२२ |
| नांदेड | २६१ | ८५ | १५.९७ |
| लातूर | २०२ | १६२ | ४७.८५ |
| उस्मानाबाद | २१७ | १३० | १०.४८ |
| **एकूण** | **६२०२** | **३९९३** | **२५३.९३११** |

## पाच गावे टंचाईमुक्त



वर्धा जिल्ह्यातील गिरोली परिसरातील मृत तीन नाल्यांचे खोलीकरण करून ४९० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यासोबतच भूगर्भातील जलसाठ्यात वाढ करणाऱ्या माथा ते पायथा या पाणलोट विकासाचा यशस्वी प्रकल्प लोकसहभागातून यशस्वीपणे पूर्ण केला आहे. पाणलोट विकासाचा हा अभिनव उपक्रम प्रथमच भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस)वर अपलोड होत आहे. ममदापूर, टाकळी (चना), चिंचाळा, सरूळ आणि गिरोली ही पाच गावे या प्रकल्पामुळे कायमस्वरूपी टंचाईमुक्त होत आहेत.

या गावातील भवानी मातेच्या मंदिर टेकडीवरून वाहणाऱ्या तीन नाल्यावर माथा ते पायथा पाणलोट विकासाचा प्रकल्प यशस्वीपणे राबवल्यामुळे गिरोलीसह ममदापूर, चिंचाळा, टाकळी (चना) यासह पाच गावांना प्रत्यक्ष लाभ झाला आहे. या प्रकल्पामुळे भूजलातील पाण्याच्या पातळीमध्ये प्रत्यक्ष वाढ होणार असून २७६ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होणार आहे. नालाखोलीकरणामुळे १९ जलसाठे तर दोन बंधारे निर्माण झाले आहेत. यामध्ये सुमारे ४ कोटी ७० लक्ष लिटर म्हणजेच ४७ टीएमसी पाणी साठविण्याची क्षमता निर्माण झाली आहे. माथा ते पायथा या जलसंधारण तसेच पाणलोट विकास प्रकल्पासाठी गिरोली शिवारातील यशोदा नदीला मिळणाऱ्या तीन नाल्यांची निवड करून या नाल्यांमध्ये वर्षानुवर्षे साचलेला गाळ काढण्यासोबतच नाला सरळीकरण तसेच पाणी साठवण्यासाठी बांध बांधण्याचा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमामध्ये गिरोली शिवारातून सुरू होणाऱ्या चार किलोमीटर नाल्याचे खोलीकरण, सरळीकरण तसेच ममदापूर शिवारातील नाल्याचे तीन किमी तर टाकळी (चना) शिवारातील सहा किलोमीटर नाल्यावर पाणलोट विकासाचा हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. हे तीनही नाले गिरोलीच्या टेकडीपासून निघून यशोदा नदीला मिळतात. मृत पावलेल्या या नाल्यांमुळे पावसाचे पाणी वाहुन जाण्याची क्षमता नसल्यामुळे सभोवतालच्या शेतात पुराच्या पाण्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या संपूर्ण प्रकल्पामुळे २७६ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. पाच गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई आता कायमस्वरूपी संपणार आहे. या अभियानातील लोकसहभागातून पूर्ण झालेला हा पहिला प्रकल्प.

**– अनिल गडेकर**

## हिंगोली जिल्ह्यातील १२४ गावांची शाश्वत पाणी उपलब्धतेकडे वाटचाल

जलयुक्त शिवार अभियानांतर्गतच्या पहिल्या टप्प्यात हिंगोली जिल्ह्यातील १२४ गावांची निवड झालेली असून या सर्व गावांमध्ये शासकीय यंत्रणांमार्फत जलसंधारणांची विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. या १२४ गावांपैकी बहुतांश गावांमध्ये जलसंधारणांची, पाणलोटाची कामे पूर्ण झाली आहेत.

प्रगतिपथावर असलेली कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याकरिता प्रशासन गतिमान झालेले होते. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील या १२४ गावांमधील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला जाऊन सदर गावांची वाटचाल ही शाश्वत पाणी उपलब्धतेकडे झाली आहे.

जून २०१५ अखेर पर्यंत जिल्ह्यात पडलेल्या १६४ मी. मी. पावसामुळे या जलसंधारणाच्या कामांमध्ये लाखो लीटर पाणी साठले आहे. हे जलयुक्त शिवार अभियान मोहिमेचे मोठे यश आहे.

## ओढा जोड प्रकल्प

सातारा जिल्ह्यात आणि कराड तालुक्यातील पूर्वेकडे वसलेले किवळ गाव हे पूर्णपणे टंचाईमुक्त ठरले आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत मुख्य ओढा ते लेंडोरी ओढा हे दोन ओढे जोडल्याने १८० हेक्टर क्षेत्रास लाभ होणार आहे. हे या अभियानाचे खूप मोठे यश म्हणावे लागेल. किवळ हे गाव कायमस्वरूपी कोरडवाहू टंचाईग्रस्त व डोंगराळ गाव आहे. तेथील संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून आहे. तेथील सरासरी पर्जन्यमान ६१५ मि.मी. आहे. १७०४ हेक्टर भौगोलिक क्षेत्र असणाऱ्या या गावात जलसिंचनाची कोणतीही मोठी योजना कार्यरत नव्हती.

## जालना : दोन हजार कामे पूर्ण

जालना जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत आठ तालुक्यातील एकूण २१२ गावांची निवड करण्यात आली. या गावांमधून मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात येऊन १ हजार ९८७ कामे पूर्ण करण्यात आले.

**(सुरेश वांदिले, कीर्ती पांडे, प्रवीण टाके आणि टीम लोकराज्य)**



## टंचाईमुक्त किटा

यवतमाळपासून किटा हे गाव केवळ १४ किलोमीटर अंतरावर आहे. केवळ ८०० इतकी लोकसंख्या असूनही या गावात पाणी टंचाई होती. पिण्याच्या पाण्यासह सिंचनाची कोणतीही सोय गावात उपलब्ध नसल्याने बहुतांश कोरडवाहू शेतीवरच गावाची मदार होती. जलयुक्त शिवारने गावकऱ्यांच्या आशा पल्लवित केल्या. पाहतापाहता काही महिन्यातच सिंचनासोबत गाव टँकरमुक्त झाले.

किटा या गावाशेजारी असलेल्या नाल्यावर १९९६-९७ मध्ये सात सिमेंट नाला बांध बांधण्यात आले होते. तसेच १३ मातीनाला बांधही गावात होते. परंतु हे बांध मुबलक पाणी साठविण्याच्या अनुषंगाने पुरेसे खोल व रुंद नसल्याने या नाल्यांमध्ये थोडेफार पाणी साचून उर्वरित सर्व पाणी पाहून जात होते. जलयुक्त शिवार अभियान सुरू झाल्यानंतर सर्व सातही सिमेंट नाला बांधातून गाळ काढण्यासोबत खोलीकरण व रुंदीकरणाचे काम घेण्यात आले. या कामामुळे यावर्षी झालेल्या पहिल्या पावसात सर्व नाले भरून वाहू लागले. गावाच्या शिवारात जवळपास १४० हेक्टर इतकी शेतजमीन असून सर्व शेती बंधाऱ्याच्या पाण्यामुळे ओलिताखाली आली आहे. बांध भरल्याने पाणी पुरवठ्याच्या विहिरीची पातळी चांगलीच वाढली. त्यामुळे यावर्षी पहिल्यांदाच टँकर लावण्याची वेळ गावावर आली नसल्याचे गावाचे सरपंच इंद्रपाल डहाणे यांनी सांगितले. यवतमाळ जिल्ह्यात जलयुक्तची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली असून अद्यापही कामे सुरू आहे. नऊ विविध प्रकारच्या सात यंत्रणा जलयुक्तची कामे करीत आहेत. पहिल्या वर्षात जिल्ह्यात ४१३ गावांमध्ये १६२५८ कामे प्रस्तावित करण्यात आली होती. या कामांमधून १ लाख २ हजार इतके हेक्टर क्षेत्र शाश्वत सिंचनाखाली येणार आहे.

**- मंगेश वरकड**

## जलपुनर्भरण स्तंभाचा नांदेड पॅटर्न

नांदेड जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान वैशिष्ट्यपूर्णरीत्या राबवण्यात येत आहे. स्थानिक निकड, त्यासाठी लोकसहभाग, नावीन्यपूर्ण उपक्रम अशी सांगड घातली जात आहे. अभियानात जिल्ह्यातील २६१ गावांचा समावेश आहे. या अभियानांतर्गत विविध यंत्रणांकडून विविध छोट्यामोठ्या स्वरूपाची सुमारे १२ हजार ३८९ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यापैकी आतापर्यंत ३ हजार १२१ कामे पूर्ण झाली आहेत.

४७१ कामे प्रगतिपथावर आहेत. जलपुनर्भरणाच्या विविध कामांवर जिल्हाधिकारी श्री. काकाणी यांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचे स्रोत असणारे सार्वजनिक स्रोत तसेच विहिरींचे जलपुनर्भरण व्हावे यासाठी त्यांनी यंत्रणांना प्रोत्साहित केले आहे.

# शेतकऱ्यांना दिलासा

**सत्तेत झालेला बदल प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वारंवार येत आहे. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्याच्या घरात मुक्काम केला होता. त्या एका रात्रीच्या मुक्कामानंतर जलयुक्त शिवार योजनेला गती मिळाली आहे. असाच एक सुखद धक्का जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी नुकताच दिला. त्यांनी पुढाकार घेऊन आत्महत्याग्रस्त ७० शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी करून दिली. मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सहकारी, परिवहन मंत्री दिवाकर रावते यांच्या हस्ते एका शेतकऱ्याच्या शेतात थेट पेरणी करण्याच्या कामाला सुरुवात करून दिली.**



**आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये पेरणी करताना परिवहन मंत्री दिवाकर रावते आणि महसूल राज्यमंत्री संजय राठोड.**

मंगेश वरकड

यवतमाळ जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. विदर्भातील या हवालदिल शेतकऱ्यास मानसिक, आर्थिक आधार देण्याचे काम गेल्या काही वर्षात शासनाकडून होत आहे. याचाच एक भाग म्हणून शासन आपल्या पाठीशी असल्याची जाणीव शेतकऱ्यांना करून देण्याची मोहीम सध्या पालकमंत्री संजय राठोड यांनी हाती घेतली आहे.

पालकमंत्री यांना आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सांत्वन भेटी देते वेळी कुटुंबाकडे पेरणीचीही सोय नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आर्थिक अडचणीमुळे पेरणी रखडायला नको, याची जाणीव झाल्याने त्यांनी लोकसहभागातून पेरणीचा व्यापक कार्यक्रम जिल्ह्यात घेतला. जिल्ह्यात आतापर्यंत शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबांची माहिती घेतली. ज्या कुटुंबाने आर्थिक अडचणीमुळे पेरणी केली नाही, अशांची माहिती घेतल्यानंतर त्यांच्या शेतावर लोकसहभागातून पेरणीस सुरुवात झाली. यवतमाळपासून काही अंतरावर असलेल्या इचोरी गावापासून पेरणीस सुरुवात झाली आतापर्यंत ७० आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी करून देण्यात आली आहे. बी-बियाणे, रासायनिक खते यासह पेरणी व सर्व आनुषंगिक खर्च पालकमंत्री संजय राठोड लोकसहभागातून करीत आहे. दारव्हा येथे नुकत्याच घेतलेल्या एका कार्यक्रमात परिवहन मंत्री दिवाकर रावते व पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ६५० शेतकऱ्यांना बी-बियाणे, खतांचे वाटप करण्यात आले.

दारव्हा तालुक्यात कुंभारकिन्ही शिवार आहे. या शिवारात उत्तमराव चौधरी यांचे पाच एकर शेत आहे. नापिकी आणि कर्जबाजारीपणाने उत्तमरावने २००५ मध्ये आत्महत्या केली होती. कुटुंबाची आर्थिक स्थिती अतिशय हलाखीची आहे. त्यामुळे उत्तमरावच्या निधनानंतर त्यांची शेती सांभाळीत असलेल्या त्यांच्या पत्नी मंदा यांना आपल्या शेतात पेरणी करता आली नाही. पालकमंत्री संजय राठोड यांना पेरणीअभावी शेत पडिक राहिल्याचे कळल्यानंतर त्यांनी श्री. रावते यांच्यासह जाऊन स्वत:शेतात राहुन सर्व चार एकरावरील पेरणी पूर्ण करून दिली. यावेळी मंदाबाईंना गहिवरून आले. पालकमंत्र्यांच्या पुढाकाराने या कुटुंबात हास्य फुलले आहे, दिलासा मिळाला आहे. हा दिलासा त्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्यास मोलाचा ठरणार आहे.

संपर्क : ०९४०४१४०६६१

अमेरिका दौरा

# नवी गुंतवणूक, नव्या संधी

**राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणारी हजारो कोटींची गुंतवणूक, प्रमुख उद्योगसमूहांनी महाराष्ट्रातील आपले प्रकल्प विस्तारित करण्याचा घेतलेला निर्णय, ब्लॅकस्टोन, सिस्को आणि कोकाकोला यासारख्या आघाडीच्या उद्योगसमूहांसोबत झालेले महत्त्वाचे सामंजस्य करार, मायक्रोसॉफ्टसारख्या उद्योगसमूहाने महाराष्ट्राच्या पुढील वाटचालीत दिलेले भरीव सहकार्याचे आश्वासन, यासोबत महाराष्ट्रात सुरू झालेल्या नव्या विकासपर्वाबाबत संपूर्ण अमेरिकेत झालेली जोरदार प्रतिमा निर्मिती ही वैशिष्ट्ये आहेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नुकत्याच पार पडलेल्या अमेरिका दौऱ्याची !**

जागतिकीकरणानंतर तसेच अलीकडच्या काळात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे स्वत:च्या विकासाबाबत राज्यांच्या भूमिका अधिक सक्रिय झाल्या आहेत. आर्थिक-औद्योगिक हित जोपासण्यासाठी विविध राज्यांकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वत:ची प्रतिमा निर्मिती करण्यासह जागतिक समुदायाशी समन्वय-संवाद साधण्यासाठी एक व्यापक प्लॅटफॉर्म तयार करण्याचे प्रयत्न होत आहेत. देशात अग्रेसर असणारा महाराष्ट्र आपले जोरदार 'ब्रँडिंग' करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांच्या अमेरिका दौऱ्याबाबत मोठे औत्सुक्य होते.

### यशस्वी दौरा

हा दौरा अनेक अर्थाने यशस्वी झाला असे म्हणता येईल. हजारो कोटींची गुंतवणूक आणणारे सामंजस्य करार, उपलब्ध होणाऱ्या रोजगाराचे आकडे या रूढ निकषापलीकडे जाऊन या दौऱ्याच्या यशाकडे पाहावे लागेल. काही बाबतीत तातडीने प्रत्यक्ष गुंतवणूक होत आहे, तर काही बाबतीत ती भविष्यात होऊ घातली आहे. यासोबतच आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वात प्रतिष्ठेचा

**हेमराज बागूल**

आणि महत्त्वाच्या असणाऱ्या अमेरिकेमध्ये प्रभावीपणे झालेले महाराष्ट्राचे ब्रँडिंग जास्त महत्त्वाचे आहे. त्याचे अनेकविध फायदे राज्याला होणार आहेत.

महाराष्ट्राची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुख्यमंत्री प्रथमच अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले. त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात उद्योगमंत्री सुभाष देसाई, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीणसिंह परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव अपूर्व चंद्रा, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भूषण गगराणी, उद्योग विभागाचे विकास आयुक्त सुरेंद्रकुमार बागडे आदींचा समावेश होता.

### 'डिजिटल इंडिया वीक'

महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या माहिती तंत्रज्ञानविषयक नवीन धोरणाचा




मुख्यमंत्र्यांची मॉयक्रोसॉफ्ट सायबरक्राइम सेंटरला भेट



**न्यू जर्सीचे गव्हर्नर ख्रिस ख्रिस्ती यांच्यासमवेत मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री सुभाष देसाई**

दृश्य परिणाम अमेरिका दौऱ्याच्या प्रारंभीच दिसून आला. देशभरात 'डिजिटल इंडिया वीक' या अभियानास प्रारंभ होत असताना न्यूयॉर्क या अमेरिकेच्या आर्थिक राजधानीत महाराष्ट्राने प्रसिद्ध ब्लॅकस्टोन उद्योगसमूहाशी सामंजस्य करार करून या सप्ताहाचा सातासमुद्रापार जोरदार शुभारंभ केला. या करारानुसार ब्लॅकस्टोन उद्योगसमूह राज्यात ४५०० कोटी रुपयांची घसघशीत गुंतवणूक करणार आहे. हिंजेवाडी (पुणे) येथे १२०० कोटी, मध्य मुंबईतील आयटी पार्कमध्ये १५०० कोटी, मुंबईतीलच इतर आयटीपार्कमध्ये १०५० कोटी आणि इऑन फ्री झोन सेझमध्ये ७५० कोटी याप्रमाणे ही गुंतवणूक होणार आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात तब्बल ५० हजार रोजगार निर्माण होतील. ब्लॅकस्टोन ही वित्तीय सल्लागार आणि गुंतवणूक व्यवस्थापनविषयक जागतिक पातळीवरील आघाडीची संस्था आहे.

ब्लॅकस्टोनपाठोपाठ कोकाकोला कंपनीशीही राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने सामंजस्य करार केला. त्यानुसार कोकाकोला समूह महाराष्ट्रातील लोटे परशुराम (चिपळूण, जि. रत्नागिरी) येथे ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. तसेच मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत जागतिक पातळीवरील अग्रगण्य सिटी बँकेने मुंबई आणि पुण्यातील प्रस्तावित कार्यविस्ताराची व त्या माध्यमातून नव्याने ४ हजार रोजगार निर्माण करण्याच्या योजनेची माहिती दिली. या बँकेचे प्रबंध संचालक (ऑपरेशन्स) जगदीश राव यांच्या नेतृत्वातील एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची याबाबत भेट घेतली होती.

### उद्योग परिषदेत मुख्यमंत्र्यांची प्रशंसा

अमेरिका आणि भारत उद्योग परिषदेच्या निमित्त (यूएसआयबीसी) अमेरिकेच्या उद्योग जगतातील अनेक दिग्गजांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. अमेरिका व भारत सरकारच्या संयुक्त प्रयत्नातून १९७५ मध्ये स्थापन झालेली ही परिषद दोन्ही देशातील उद्योग-व्यापारविषयक संस्थांना व्यवसाय वृद्धीसाठी साहाय्य करते. यावेळी उपस्थित उद्योजकांना मुख्यमंत्र्यांनी संबोधित केले. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे असलेले वेगळेपण, जाचक अटींमधून उद्योगांची करण्यात येत असलेली मुक्तता, इज ऑफ डुईंग बिझनेस या मोहिमेंतर्गत सरकारने घेतलेला पुढाकार आदींची मुख्यमंत्र्यांनी उपस्थितांना माहिती दिली. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर, स्मार्ट सिटी, उत्पादनक्षम उद्योग, कृषी, नागरी उड्डयण, अभियांत्रिकी आणि आयटी क्षेत्रात भरीव गुंतवणुकीची प्रतीक्षा आहे, असे सांगून महाराष्ट्राच्या यशात भागीदार होण्याचे आवाहनही त्यांनी उद्योजकांना केले. उद्योग परिषदेचे अध्यक्ष मुकेश अघी यांनी औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर होऊ शकण्याची क्षमता

## 'क्रिसलर'ची वाहननिर्मिती दुप्पट होणार

डेट्रॉइट येथील जनरल मोटर्स आणि क्रिसलर या वाहन निर्मिती उद्योगातील आघाडीच्या समूहांच्या मुख्यालयास शिष्टमंडळाने भेट दिली. त्यावेळी सकारात्मक चर्चा झाली. क्रिसलर उद्योग समूहाचे अध्यक्ष माइक मॅन्ले यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. जीप हा प्रसिद्ध ब्रँड तयार करणारा क्रिसलर समूह महाराष्ट्रात फियाट क्रिसलर ऑटोमोबाइल्सच्या माध्यमातून यापूर्वीच कार्यरत आहे. समूहाच्या पुण्याजवळच्या रांजणगाव येथील प्रकल्पाची उत्पादन क्षमता दुप्पट करून २०१८ पर्यंत २ लाख ४५ हजार वाहनांची निर्मिती केली जाईल, असे श्री. मॅन्ले यांनी या भेटीत सांगितले.

जनरल मोटर्सचे उपाध्यक्ष मॅट हॉब्ज आणि मुख्य अर्थतज्ज्ञ जी. मुस्तफा मोहतरेन यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली. हा उद्योगसमूह राज्यात अधिक गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे. नवीन वाहनांच्या आराखड्यांच्या निर्मितीच्या अनुषंगाने जनरल मोटर्स राज्यातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात गुंतवणूक करण्याबाबत विचार



करीत आहे. तसेच नियमित वाहन निर्मितीशिवाय महामार्गावरील संपर्क यंत्रणेबाबतच्या तंत्रज्ञान निर्मितीत या समुहास रस आहे. त्या दृष्टीने या भेटीत अनुकूल चर्चा झाली. डेट्रॉइट येथील महाराष्ट्र मंडळ आणि बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आयोजित महाराष्ट्र व्यापार विकास परिषदेतही मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रात असल्याचे सांगतानाच मुख्यमंत्र्यांच्या उद्योगविषयक भूमिकेची प्रशंसा केली.

### मुंबई मीट्स मॅनहॅटन !

न्यूयॉर्कमध्ये आयोजित 'मुंबई मीट्स मॅनहॅटन' या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. जागतिक अर्थव्यवस्थेत आणि विकासाच्या प्रक्रियेत जगभरात विखुरलेल्या भारतीयांचे मोठे योगदान असल्याचे गौरवोद्गार काढतानाच मुख्यमंत्र्यांनी आता देशाप्रती आपले कर्तव्य बजावण्याची वेळ आहे, असे आवाहन मराठी बांधवांना केले. न्यूयॉर्कमधील वास्तव्यादरम्यान मुख्यमंत्र्यांनी न्यू जर्सीचे गव्हर्नर ख्रिस क्रिस्टी यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. त्यात राज्यात इज ऑफ डुईंग बिझनेस अंतर्गत करण्यात आलेल्या उपाययोजना, सोशल मीडिया, सौर ऊर्जा आदी विषयांचा समावेश होता. श्री. क्रिस्टी यांनी महाराष्ट्र सरकारने केलेल्या विविध उपाययोजनांची प्रशंसा केली.

### सुरक्षित आणि स्मार्ट नागपूरसाठी 'सिस्को'ची साथ

महाराष्ट्र अधिक सुरक्षित आणि स्मार्ट करण्याच्या निर्धाराच्या पहिल्या टप्प्याचा प्रारंभ सॅनफ्रान्सिस्को येथे झाला. नागपूर शहर अधिक सुरक्षित आणि स्मार्ट करण्यासाठी राज्य सरकारने सिस्को या नेटवर्किंग क्षेत्रातील प्रसिद्ध कंपनीशी सॅनफ्रान्सिस्को येथे सामंजस्य करार केला. सिस्को ही नेटवर्किंग संदर्भातील साधनांची निर्मिती, संशोधन आणि विक्री करणारी अमेरिकेतील आघाडीची बहुराष्ट्रीय कंपनी आहे. ही कंपनी सीसीटीव्ही, इंटरनेट, दळणवळणाच्या प्रगत साधनांसह अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षिततेविषयक उपाययोजना करते. नागपूर महापालिकेशी समन्वय व सहकार्याने सिस्को विविध उपाययोजना करणार आहे. त्यात अतिप्रगत दळणवळण यंत्रणा, एकात्मिक नियंत्रण, पर्यावरणविषयक तपासणी, सुधारित आरोग्य सुविधा आदींचा समावेश आहे. बहुउद्देशीय स्मार्ट नेटवर्किंग उभारणे हे सरकार, संस्था आणि समाजाच्या फायद्याचे आहे. संपूर्ण

## औद्योगिक विकासासाठी अमेरिका दौरा यशस्वी



अमेरिका दौऱ्याच्या माध्यमातून महाराष्ट्रात जागतिक गुंतवणूक वाढविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न फलदायी झाले असून विविध बहुराष्ट्रीय कंपन्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक आहेत. या दृष्टीनेच उद्योजकांच्या भेटी घेतल्या. न्यूयॉर्कमधील स्थानिक उद्योजकांच्या प्रतिनिधींसोबत उद्योग परिषद झाली. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी स्वत: उपस्थित होतो. या परिषदेमध्ये राज्यातील औद्योगिक प्रगती कशी होत आहे, याबद्दल माहिती दिली. राज्याचा समतोल विकास साधण्यासाठी पायाभूत सुविधा क्षेत्रात आर्थिक गुंतवणूक करण्यास राज्य शासन प्रयत्न करत आहे. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक वाढीवर शासन भर देत आहे.

परिषदेत उद्योजकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. काही उद्योजकांनी तर तिथेच आम्हाला सांगितले की, आम्ही महाराष्ट्रात येऊन उद्योग उभे करायला जागेची पाहणी करणार आहोत. ब्लॅक स्टोन या कंपनीने साडेचार हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात करायचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर सॅनफ्रान्सिस्को मध्ये काही बैठका घेण्यात आल्या त्यातसुद्धा काही कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक करण्यासंदर्भात निर्णय घेतले आहेत. काही (स्टार्टअप) नवे उद्योग उदयाला येतात, त्यांना उत्तेजन द्यावे असे तेथील उद्योजकांचे मत होते आम्ही त्यांना सांगितले की, आमचे नवीन धोरण उद्योजकांना प्रोत्साहन देणारे आहे. जनरल मोटर्स आणि क्रिसलर या कंपन्यांनी महाराष्ट्रात उद्योगात वाढ करण्याचे आश्वासन दिले आहे. राज्य शासनाने उद्योग वाढीला चालना देण्यासाठी उचलेल्या पावलांमुळे अमेरिकेतील उद्योग जगतात विश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र या दौऱ्यात दिसले.

**शब्दांकन: काशीबाई थोरात**

## गुगलमध्ये मुख्यमंत्री



**मुख्यमंत्र्यांनी 'गुगल'च्या मुख्यालयास भेट देऊन कंपनीच्या ज्येष्ठ प्रतिनिधींसोबत चर्चा केली. स्ट्रीट व्ह्यू, ॲक्सेस आणि शिक्षण या क्षेत्रात रचनात्मक भागीदारी करण्यासंदर्भात चर्चा झाली. यावेळी गुगलच्या विविध सेवांबाबत व आगामी तंत्रज्ञानाबाबत सादरीकरण करण्यात आले. राज्यासाठी उपयुक्त व पथदर्शी ठरू शकणाऱ्या तंत्रज्ञानाची निश्चिती करण्यासाठी गुगलचे एक पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर पाठविण्यात येईल, अशी माहिती या वेळी कंपनीतर्फे देण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी 'सिक्युरिटी सेंटर ऑफ एक्सलंस' स्थापन करण्यासंदर्भात सिमॅन्टेक समूहाशी चर्चा केली.**

## अमेरिकेत महाराष्ट्र परिचय केंद्र होणार

मुख्यमंत्र्यांच्या अमेरिका दौऱ्यामागचे एक प्रमुख प्रयोजन म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १७ वे अधिवेशन. या निमित्ताने तेथे स्थायिक झालेल्या मराठी माणसाशी संवाद साधण्याची मुख्यमंत्र्यांना उत्सुकता होती. अमेरिका आणि कॅनडा या देशांमध्ये स्थायिक झालेल्या महाराष्ट्रातील मराठी बांधवांच्या बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे लॉस एन्जेलिस येथे हे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न करत असून त्यात अमेरिकेसारख्या देशाच्या भूमीवर कर्तृत्व गाजवलेल्या मराठी मंडळींनी योगदान दिल्यास महाराष्ट्र हे एक सर्वोत्तम राज्य म्हणून नावारूपास येईल, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी केले. अमेरिकेतील मराठी मंडळींनी केलेल्या प्रगतीची मुख्यमंत्र्यांनी विशेष प्रशंसा केली. महाराष्ट्रात परिवर्तनाचे पर्व सुरू झाले असून राज्यात आता वेगाने सकारात्मक बदल



होत असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या अधिवेशनातील मराठीजनांना दिली.

मातृभूमी, कर्मभूमी आणि जन्मभूमी यांना समान न्याय देण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करायला हवा, असे आवाहन करून मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र आणि अमेरिका जोडण्याचा प्रयत्न येथील मराठी मंडळींच्या माध्यमातून केला जाईल. त्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने अमेरिकेत महाराष्ट्र परिचय केंद्र निश्चितपणे कार्यान्वित करण्यात येईल. या केंद्राच्या माध्यमातून अमेरिकेतील मराठी मंडळींचा महाराष्ट्राशी असलेला समन्वय-संवाद प्रभावीपणे विकसित केला जाईल. यासोबतच बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि प्रस्तावित महाराष्ट्र परिचय केंद्राच्या माध्यमातून महाराष्ट्रात पर्यटनासाठी येऊ इच्छिणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून २५ टक्के सवलत दिली जाईल.

मुख्यमंत्र्यांच्या आश्वासक भाषणानंतर उपस्थित मराठीजनात उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. महाराष्ट्राच्या नव्या नेतृत्वाबद्दल जाणवणारा अभिमानास्पद आशावाद त्यांनी 'स्टँडिंग ओव्हेशन'सह उस्फूर्तपणे दीर्घकाळ केलेल्या टाळ्यांच्या कडकडाटातून स्पष्टपणे जाणवत होता.

## हजारो कोटींची गुंतवणूक

- ब्लॅकस्टोन उद्योगसमूह राज्यात ४५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हिंजेवाडी (पुणे) येथे १२०० कोटी, मध्य मुंबईतील आयटी पार्कमध्ये १५०० कोटी, मुंबईतीलच इतर आयटीपार्कमध्ये १०५० कोटी आणि ईऑन फ्री झोन सेझमध्ये ७५० कोटी याप्रमाणे ही गुंतवणूक होणार आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात तब्बल ५० हजार रोजगार निर्माण होतील.
- जीप हा प्रसिद्ध ब्रँड तयार करणारा क्रिसलर समूह आपल्या रांजणगाव येथील प्रकल्पाची उत्पादन क्षमता दुप्पट करून २०१८ पर्यंत २ लाख ४५ हजार वाहनांची निर्मिती करणार आहे.
- नागपूर शहर अधिक सुरक्षित आणि स्मार्ट करण्यासाठी राज्य सरकारने सिस्को या नेटवर्किंग क्षेत्रातील प्रसिद्ध कंपनीशी सॅन फ्रान्सिस्को येथे सामंजस्य करार.
- मायक्रोसॉफ्ट कंपनी राज्यात एक स्मार्ट औद्योगिक वसाहत आणि पुणे येथे सायबर सुरक्षा केंद्र उभारण्यासह शासनाच्या डिजिटल व्हिलेज उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करणार आहे.
- बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने अमेरिकेत महाराष्ट्र परिचय केंद्र कार्यान्वित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन.

महाराष्ट्र स्मार्ट करण्यासाठी आम्ही अधिक सहकार्याची अपेक्षा करीत आहोत. पंतप्रधानांनी डिजिटल इंडिया सप्ताहाचा प्रारंभ केल्यानंतर पहिल्याच दिवशी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. हा एक अनोखा सुवर्णयोग असल्याचे असे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. सिस्कोचे कार्यकारी उपाध्यक्ष पंकज पटेल यावेळी उपस्थित होते.

### 'स्मार्ट एमआयडीसी'सह सायबर सुरक्षा केंद्र

राज्यात एका स्मार्ट औद्योगिक वसाहतीसह पुणे येथे सायबर सुरक्षा केंद्र उभारण्याचे तसेच राज्य शासनाच्या डिजिटल व्हिलेज या उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक पातळीवरील आघाडीच्या मायक्रोसॉफ्ट कंपनीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेत जाहीर केले. सिॲटलमधील मायक्रोसॉफ्टच्या सायबर क्राइम सेंटरच्या भेटीदरम्यान मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांच्याशी राज्याच्या शिष्टमंडळाची अतिशय सकारात्मक चर्चा झाली. लघु व मध्यम उद्योगांसाठी तंत्रज्ञानविषयक साहाय्य, क्लाउड सर्व्हिसेस, सेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर आदी विषयांवर या भेटीत विचारविनिमय करण्यात आला.

लेखक मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.

❐ ❐



# सारे काही शेतकऱ्यांसाठी

**जून महिन्यातील पावसानंतर महिनाभराची उघडीप मिळालेल्या महाराष्ट्रावर दुबार पेरणीचे संकट असताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलायला २० जुलै रोजी उभे राहिले. अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष या भाषणावर होते. सभागृहात त्यांचे भाषण सुरू असताना खोळंबलेला पाऊस महाराष्ट्राच्या अनेक भागात सुरू झाला.. तर दुसरीकडे त्यांच्या भाषणातूनही शेतकऱ्यांबद्दलची कणव शब्दाशब्दांतून व्यक्त झाली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वस्तुनिष्ठरीत्या समजून घेणारे नेतृत्व मिळाल्याचा संदेश या भाषणाने राज्यभर दिला. शाश्वत शेती, शाश्वत सिंचन आणि आत्मनिर्भर असणारा कर्जमुक्त शेतकरी हे मुख्यमंत्र्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी राज्य शासन पुढे काय करणार? गेल्या आठ महिन्यात काय केले, याचा गोषवारा त्यांनी आपल्या भाषणात मांडला. महाराष्ट्रामध्ये शेती आणि शेतकरी यांच्याबद्दल नजीकच्या काळात करण्यात आलेले सकारात्मक चिंतन आणि नेमक्या उपाययोजनांचे मंथन अशा शब्दात मान्यवरांनी या भाषणाचे कौतुक केले आहे. या भाषणात केवळ समस्येची मलमपट्टी नव्हती तर ठोस उपाययोजना त्यांनी सांगितल्या. शेतकऱ्याच्या मूलभूत गरजांसाठी अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, पाल्यांना मोफत शिक्षण आदी योजना जाहीर करून त्यांनी शेतकऱ्यांना कौटुंबिक आणि सामाजिक चिंतेतून मुक्त केले.**

**सोबतच शाश्वत कृषी उपाययोजनांच्या २५ हजार कोटी रुपयांच्या घोषणेतून शेती व्यवसायाला नवी उभारी दिली आहे.**



## विधिमंडळातून

राज्यातील बहुसंख्य भागात मोसमी पावसानंतर मध्येच पावसाचा बराच खंड पडणे, अपुरा पाऊस पडल्याने निर्माण झालेली दुबार पेरणीची परिस्थिती, निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई, चाऱ्याचा अभाव निर्माण होणे यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे, यासाठी आर्थिक मदत आवश्यक आहे असा प्रस्ताव विधिमंडळात नियम मांडण्यात आला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी पुढच्या काळातील उपाययोजनांचा रोडमॅपच सादर केला.

राज्यातील शेतीच्या शाश्वत विकासासाठी शेतीमध्ये गुंतवणूक करणे गरजेचे असून त्यासाठी शासन दरवर्षी ५ हजार कोटी रुपये याप्रमाणे पुढील पाच वर्षात एकूण २५ हजार कोटी रुपये जास्तीचे खर्च करणार. हा निधी केवळ शेतीवरच खर्च करण्यात येणार असून त्या दृष्टीने निधी उभा करण्यासाठी आवश्यकता भासल्यास अतिरिक्त कर लावणार.

### सिंचनासाठी

येत्या ३ वर्षात १ लाख ५० हजार शेततळी उभारणार, नरेगा अंतर्गत दरवर्षी ३५ हजार याप्रमाणे १ लाख विहिरी. तसेच आश्वासित सिंचन सुविधेंतर्गत ८ हजार धडक/जवाहर सिंचन विहिरी पूर्ण करण्यात येतील. जलसंधारणाची तरतूद ८०० वरून २२०० कोटी रुपये केली आहे.

नोव्हेंबर २०१४ पासून आतापर्यंत विदर्भ आणि मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना ४७ हजारांहून अधिक जोडण्या. इतर प्रलंबित जोडण्यांचे उद्दिष्ट मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करणार. राज्यातील १ लाख ६६ हजार पेड पेंडिंग कृषी पंपांपैकी विदर्भ आणि मराठवाड्यात ९३ हजार २१६ पेड पेंडिंग पंप. त्याचप्रमाणे आणखी १ लाख शेतकऱ्यांची पंपाची मागणी आहे. ती दूर करण्यासाठी सरकारची या भागात विद्युतीकरणाची विशेष मोहीम.

### प्रमुख निर्णय

- **शेती विकासासाठी दरवर्षी ५ याप्रमाणे पाच वर्षात २५ हजार कोटींचा कार्यक्रम**
- **शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील २२ लाख शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा**
- **आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण**
- **शेतकऱ्यांना वैद्यकीय उपचारांसाठी भरीव तरतूद**
- **राज्यात दीड लाख शेततळी, एक लाख विहिरींचा धडक कार्यक्रम**

### पाऊस न आल्यास उपाययोजना

कोरडवाहु क्षेत्रातील सिंचनाच्या सुविधा मर्यादित असल्याने जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड केलेल्या ५ हजार गावांमध्ये नोंदणी केलेल्या शेतकरी बचत गटांना भाडे तत्त्वावर सिंचन सुविधा उपलब्ध करून देणार. त्याअंतर्गत प्रत्येक गावात ५ डिझेल पंप पाइपलाइनसह स्प्रिंकलर संच (पोर्टेबल) देण्यात येतील. यामुळे २५ हजार तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. या संचांमुळे एका महिन्यात १७.५० लाख एकर क्षेत्रावर संरक्षित पाणी देऊन उत्पादन वाढीस मदत. पाच हजार गावांसाठी १३८ कोटींचा खर्च.

२७ जुलैपर्यंत पाऊस न पडल्यास दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना

### अन्नसुरक्षा

- **शेतकऱ्यांवर आता कुठल्याही परिस्थितीत उपासमारी वा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहणार नाही. यासाठी १४ जिल्ह्यांतील २२ लाख शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ दिला जाईल. या शेतकऱ्यांना २ रुपये प्रति किलो या दराने गहू तर ३ रुपये दराने तांदूळ दिला जाईल. या १४ जिल्ह्यांमध्ये वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा, वाशीम, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर आणि उस्मानाबाद यांचा समावेश.**



### शैक्षणिक हमी

- **मुलांच्या शिक्षणाची चिंता आता जीवघेणी ठरणार नाही, याची हमी या सरकारने दिली आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. आत्महत्याग्रस्त सर्व जिल्ह्यांमधील अशा प्रकरणातील शेतकरी कुटुंबांना याचा लाभ होणार आहे. या मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होणार नाही, याची काळजी घेण्यासोबतच दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शासन प्रयत्न करणार.**



### आरोग्यसुरक्षा

- **आजारात कर्जबाजारीपणा आणि हताशपणा येतो. शेतकऱ्यांच्या कुटुंबाला यातून बाहेर काढण्याचा निर्णय राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या कक्षेत राज्यातील शेतकरी आत्महत्या व कृषी संकटाने ग्रस्त असलेल्या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा निर्णय. त्यासाठी १ लाख रुपये उत्पन्नाच्यासह सर्व अटी शिथिल करून या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यासाठी अतिरिक्त प्रिमिअम शासनाकडून विमा कंपनीकडे भरला जाईल. या योजनेत आणखी काही आजारांचा समावेश करण्यात येईल.**



# कर्जमुक्तीच्या दिशेने...



कर्जमाफीच्या निर्णयामुळे खरोखर सर्व शेतकऱ्यांना त्याचा फायदा होतो काय? असे असते तर यापूर्वीच्या कर्जमाफीनंतरही परिस्थिती तशीच का? असे अनेक प्रश्न यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित केले. कर्जमुक्त शेतकरी हे नवे आवाहन कसे आवश्यक आहे हेदेखील सभागृहाला पटवून दिले. ते म्हणाले, कर्जमाफीच्या निर्णयांचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर झाल्याचा यापूर्वीचा इतिहास नाही त्यामुळे कर्जमाफीनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली आहे. कर्जमाफी दिली तरीही शेतकरी आत्महत्याग्रस्त विदर्भात एक तृतीयांश तर मराठवाड्यातील केवळ निम्म्या शेतकऱ्यांना लाभ मिळू शकतो. त्यामुळे कर्जमाफी व्यवहार्य प्रस्ताव नाही. कर्जमुक्तीनंतरही सहा वर्षात शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होतो, ही बाब आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. कॅगनेही कर्जमाफीच्या निर्णयाबाबत ताशेरे ओढले असून पात्र लाभार्थ्यांना कर्जमाफी न मिळणे, पात्र शेतकऱ्यांऐवजी कर्जदार संस्थांना लाभ होणे, चुकीच्या पद्धतीने कर्जमाफी, काही बँकांकडून कर्जमाफीचा दुहेरी लाभ आदी गैरप्रकार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे आणि उपाययोजनांसंदर्भात नेमलेल्या चार समित्यांनी नमूद केली आहे. कर्जमाफीऐवजी कर्जाची उपलब्धता, सिंचन सुविधा, आरोग्याच्या सुविधा, अन्न सुरक्षा, जोडधंदे, बाजारभाव, पणन आदी सुविधा देणे आवश्यक असल्याचे ही या समित्यांनी नमूद केले आहे. यावेळी त्यांनी शासनाने काही निर्णय घेतल्याचे सभागृहाच्या लक्षात आणून दिले. यामध्ये

- कर्जाच्या सापळ्यातून मुक्त करण्यासाठी २५ हजार ६४ गावातील सुमारे २० लाख शेतकऱ्यांच्या सुमारे ६ हजार कोटींच्या पीक कर्जाच्या रूपांतरणाचा निर्णय या सरकारने यापूर्वीच घेतला.
- पहिल्या वर्षी पूर्ण १२ टक्के तर पुढील चार वर्षात प्रतिवर्षी सहा टक्के व्याजाचा भार सरकारने उचलला असून त्यापोटी १५२६ कोटी रुपये खर्चास मंजुरी दिली आहे.
- राज्यस्तरीय बँकिंग समितीच्या बैठका घेऊन सर्व बँकांना शेतकऱ्यांना तातडीने कर्ज वाटपाचे निर्देश
- दुधाला हमी भाव मिळविण्यासाठी प्रयत्न करणार. त्यासाठी राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठपुरावा.

सोबतच शासन नेमक्या काय उपाययोजना करणार आहे, नवीन धोरण व योजना काय आहेत, याबाबत सभागृहाला अवगत केले. त्यांनी सुचवलेल्या काही उपाययोजना पुढीलप्रमाणे:

### उपाययोजना

- कृषीपूरक उद्योग मोठ्या प्रमाणावर उभारण्यासाठी सरकार प्रयत्न करणार.
- कापूस उत्पादक नऊ जिल्ह्यात टेक्सटाइल पार्क उभारणार. जैन इरिगेशन आणि कोकण कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने कोकणातच आंतरराष्ट्रीय दर्जाचा निर्यातक्षम आंबा प्रक्रिया उद्योग उभारण्याचा प्रयत्न.
- उसाच्या एफआरपीसाठी केंद्राच्या पॅकेजनुसार साखर कारखान्यांना २००० कोटींचे कर्ज. या कर्जावरील पुढील चार वर्षांच्या व्याजापोटी ४०० कोटी रुपये राज्य शासन देणार.
- कृषी क्षेत्रातील अनिश्चितता संपविण्यासाठी आतापर्यंत ६ उत्पादने मूल्य साखळीमध्ये (व्हॅल्यू चेन) आणली.
- गेल्या आठ महिन्यात शासनाने शेतकऱ्यांना ७ हजार कोटीपेक्षा जास्त रकमेची मदत केली आहेत. त्यापैकी बँक खात्याद्वारे ४७८५ कोटी रुपयांची थेट मदत केली आहे. याचा लाभ १ कोटी ३ लाख शेतकऱ्यांना झाला आहे.

प्रतिहेक्टर १५०० रूपये याप्रमाणे प्रतिशेतकरी दोन हेक्टरपर्यंत बियाणे खरेदीकरिता अर्थसाहाय्य देण्याची तरतूद. यासाठी ३६० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत चारा पिकांसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद, चारा डेपोंसह जनावरांच्या छावण्यांचे नियोजन.

राज्यातील पावसाने दिलेला ताण लक्षात घेऊन आणीबाणीची परिस्थिती उद्‌भवल्यास आकस्मिकता आराखडा (Contingency Plan).

जोडधंद्यांना प्रोत्साहन. त्याअंतर्गत विदर्भ आणि मराठवाडा विभागातील १४ जिल्ह्यांत कंत्राटी पद्धतीने कुक्कुटपालन कार्यक्रम राबवण्यासाठी १०० कोटी, तर शेततळ्यात मत्स्यबीज व कोळंबी संचयन कार्यक्रम राबवण्यासाठी ४० कोटी रुपयांचा निधी.

**टीम लोकराज्य**



# माळराने फुलताहेत हिरवाईने...

**'वृक्षवल्ली आम्हा, सोयरी वनचरे,' या अभंगातून संत तुकाराम महाराजांनी वृक्षांशी केवळ नाते जोडले नाही तर वनराईचे आपल्या जीवनातील महत्त्वही स्पष्ट केले... वनरक्षणाची हीच भावना वनक्षेत्रालगत स्थापन झालेल्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फतही सुरू आहे. उत्तम वन व्यवस्थापनाने वनांचे पुनरुज्जीवन शक्य आहे. त्यासाठी या समित्या महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.**

डॉ. सुरेखा मुळे

राज्यात सध्या २६ लाखांहुन अधिक संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे सभासद आहेत. त्यात २५ टक्के महिला सदस्य आहेत. संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमात महिला बचतगटांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत काम देण्यात येत आहे.

या कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहुन शासनाने या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवली तसेच त्यात चांगल्या घनदाट वनांचा (०.४ पेक्षा अधिक घनता असलेली वने) समावेश केला आहे. संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या बळकटीकरणालाही शासनाने प्राधान्य दिले आहे

संयुक्त वन व्यवस्थापन समितीला मिळणाऱ्या रकमेपैकी २/३ रक्कम वनांच्या शास्त्रशुद्ध व्यवस्थापनाकरिता (आग प्रतिबंधक उपाययोजना, जलसंधारण, वृक्षलागवड आणि स्वंयपाकाचा गॅस वापर) मंजूर आहे.

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रात निसर्ग पर्यटनस्थळ असेल तर पर्यटनापासून मिळणारे प्रवेश शुल्क, कॅमेरा शुल्क असे उत्पन्न संयुक्त वन व्यवस्थापन समितीला दिले जाते. एल.पी.जी कनेक्शन, बायोगॅस तसेच दुभती जनावरे व रोपवनांच्या संरक्षणासाठी समितीचे सदस्य व ग्रामस्थांची निवड केली जाते. त्यामुळे वनावरील जळाऊ लाकडाचा ताण कमी होण्यास मदत झाली आहे.

संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कामात सतत सुधारणा व्हावी, समित्यांमध्ये चुरस निर्माण होऊन त्यातून शाश्वत वन व्यवस्थापनावर आधारित वनसंरक्षण आणि संगोपनाच्या माध्यमाद्वारे गावांचा आर्थिक आणि सामाजिक विकास व्हावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवून संत तुकाराम वनग्राम योजना सुरू करण्यात आली आहे. या वनग्रामात सहभागी झालेल्या आणि बक्षीस मिळविलेल्या काही गावांच्या यशकथा...

### श्रमदानातून वनसंरक्षण

गडचिरोलीच्या कुरखेडा तालुक्यातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती गोठणगाव. २००८ ला या समितीची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्य

ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कृत्रिम पुनर्निर्मिती योजनेखाली समितीने २०१२ मध्ये मिश्र रोपवनाचे काम केले. तेराव्या वित्त आयोगाकडून मिळालेल्या निधीतून नैसर्गिक पुनर्निर्मितीचे रोपवन ३५ हेक्टर क्षेत्रात करून व्यापक स्वरूपात वनीकरण कार्यक्रम राबवला. यातील ७५ टक्क्यांहुन अधिक रोपे जिवंत आहेत. समितीने नालाबंडिग तसेच नवीन वनतलाव निर्मितीचे काम केले. अवैध वृक्षतोड रोखली. आगीपासून वनाच्या संरक्षणासाठी जाळरेषेचे काम, वन जमिनीवर अतिक्रमणास प्रतिबंध तसेच अवैध चराईस प्रतिबंध इत्यादी कामे केली आहेत.

### ग्रामसभेने केला चराई-कुऱ्हाड आणि शिकारबंदीचा ठराव

अहमदनगर जिल्ह्यात धावडेवाडी अर्थात गुंडेगाव संयुक्त वन व्यवस्थापन समिती २००८ साली स्थापन झाली. समितीचे वनक्षेत्र एकूण ३९.८४ हेक्टरचे आहे असून या राखीव वनक्षेत्रात समितीमार्फत विविध योजनेंतर्गत कामे झाली आहेत. चराई बंदी, कुऱ्हाडबंदी आणि



शिकारबंदीचा ठराव ग्रामसभेत मंजूर झाला. मृद आणि जलसंधारणाची कामे, वनांचे आगीपासून संरक्षण, अतिक्रमणास प्रतिबंध यामुळे वन्यजीवांना संरक्षण मिळाले आहे. वन्यप्राण्यांकरिता पाणवठे बांधले आहेत.

### निमजीत बांबू वन...

नागपूर जिल्ह्याच्या कळमेश्वर तालुक्यातील निमजी गावच्या संयुक्त वन व्यवस्थापन समितीची ही गोष्ट. २००२ साली गावात संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन झाली आणि समितीने ग्रामस्थांच्या मदतीने एकूण २५ हेक्टर क्षेत्रावर २७५०० रोपांची लागवड केली... एवढेच नाही तर ८० टक्के रोपे जिवंत ठेवण्यात समितीला यश आले. यातील बांबू रोपांची टक्केवारी ६० ते ७० टक्के आहे.

रोपवनात वाहणाऱ्या नाल्यावर दगडाचे नालीबांध घालून जल आणि मृदसंधारणाची कामे समितीने केली असून उन्हाळ्यात नाल्याच्या पात्रात खड्डे करून वन्यजीवांसाठी पाणी साठवण्याचे काम केले जाते. चराई आणि कुऱ्हाडबंदी घातल्याने वनक्षेत्रात वृक्षतोड होत नाही.

### दगडी बंधाऱ्याने बागायती शेती

२००३ साली स्थापन झालेल्या पुण्याच्या जुन्नर तालुक्यातील बुचकेवाडी अर्थात वैष्णवधाम संयुक्त वन व्यवस्थापन समितीने वनक्षेत्रात दगडी बंधारे बांधून शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला आहे. रोपवनात केलेल्या वृक्ष लागवडीतील ७० टक्के रोपे जिवंत ठेवण्यात समितीला यश मिळाले असून अवैध वृक्षतोड रोखण्याची जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे. वन रक्षणासाठी वणवा प्रतिबंधक टीम समितीने तयार ठेवली आहे. जल व मृद संधारणाच्या कामांमुळे गावात बागायती शेती करणे शक्य झाले याची जाणीव ठेऊन ग्रामस्थ उत्पादित मालानुसार निधी गोळा करून तो निधी ग्रामविकासासाठी वापरतात.

### हिरवेगार शिवाजीनगर

रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील एक हिरवगार गाव शिवाजीनगर. गावात संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या ताब्यात ८६.५५ हेक्टर वनक्षेत्र आहे. २०१३-१४ मध्ये नैसर्गिक पुनर्निमिती अंतर्गत २५ हेक्टरवर रोपवन उभारण्यात आले. यातील जिवंत रोपांची टक्केवारी ८५ टक्क्यांच्या आसपास आहे. ग्रामस्थांनी श्रमदानातून वाहणारे ओहळ, नाले यावर दगड-मातीचे बांध घातले आहेत. त्यामुळे पाणी साठा होऊन मातीची धूप थांबली आहे. गावातील पुरुष-महिला, विद्यार्थी यांचाही वनसंरक्षणाच्या कामात पुढाकार असतो.

### वनश्री पुरस्कार

वनक्षेत्रालगतच्या गावांबरोबरच वनेतर क्षेत्रात वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन व्हावे यासाठी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. अमरावती वृत्तामध्ये काम करणारे अमर कैजीनाथ दिनकर हे बोथबोडणचे रहिवासी. १८ वर्षापासून ते पर्यावरण आणि जलभूसंधारणाचे काम करतात. त्यांनी स्वखर्चाने ३० एकर क्षेत्रात वृक्षलागवड आणि जलभूसंधारणाची कामे केली आहेत. इतर शेतकऱ्यांनीही वृक्ष लागवड करावी म्हणून ते प्रयत्न करत आहेत. अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर आणि वृक्ष न तोडण्याचे आवाहन करून त्यांनी यवतमाळ जिल्ह्यात पर्यावरण व जलसंधारण जागृती यात्रा काढली. वनविकास हा खऱ्या अर्थाने लोकसहभागातून शक्य होणारी गोष्ट आहे त्यामुळे व्यक्ती, संस्था आणि शाळा-महाविद्यालये यांचे या क्षेत्रातील काम तेवढेच महत्त्वाचे आहे. अशाच प्रकारचे काम बुलडाण्याच्या एडेड हायस्कूलने केले. राष्ट्रीय हरित सेनेच्या माध्यमातून तीन वर्षाच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी घरोघरी ११३० रोपवाटिका तयार केल्या. त्यातून १ लाख ९ हजार ५४१ रोपांची निर्मिती केली. शाळेच्या दुरध्वनी क्रमांकासह वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली. फोन करा- मोफत रोप मिळवा असे आवाहन करण्यात आले. तयार केलेल्या रोपांपैकी १ लाख ५ हजार ५४३ रोपे नागरिकांना, शेतकऱ्यांना आणि इतर संस्थांना दिली. भंडारा जिल्ह्याच्या साकोली तालुक्यातील लावरी गावचे रामधन नकटू धकाते यांनी २०१२ मध्ये शालेय रोपवाटिका तयार करून दरवर्षी त्यांनी या रोपवाटिकेतून ११७०० रोपे तयार केली आणि ती गावात मोफत वाटली. श्री. धकाते जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक आहेत. 'एक व्यक्ती एक झाड' हा उपक्रम राबवताना त्यांनी विविध स्पर्धा, शाळेची स्वच्छता, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची उपलब्धता, स्नेह संमेलनाचे आयोजन यासारखे विविध उपक्रम

राबवले आहेत.

### पुरस्कार ग्रामपंचायतींना

२०१३ मध्ये ग्रामपंचायत संवर्गात ज्या ग्रामपंचायतीला वनश्री पुरस्कार मिळाला ती ग्रामपंचायत म्हणजे वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट तालुक्यातील सिरूड ग्रामपंचायत. ग्रामपंचायतीने ८ रोपवाटिकेतून तीन वर्षात ७८,६९० रोपांची निर्मिती केली, त्यातील ५९,२३५ रोपे गावातील लोकांना वाटली. अपारंपरिक ऊर्जा साधनाचा वापर करताना ग्रामपंचायतीने लोकसहभागातून गावाच्या विकासाला गती दिली आहे.

हिंगणघाट तालुक्यातीलच वडनेरच्या निळकंठ मुरार घटवाई विद्यालय व विज्ञान/कला कनिष्ठ महाविद्यालयाने तीन वर्षात ५ रोपवाटिका तयार करून ७०२५० रोपे तयार केली. त्यातील ४३०५३ रोपे गावातील लोकांना वितरित करण्यात आली.

भंडारा जिल्ह्यातील प्रगती मागासवर्गीय महिला सेवाभावी संस्थेने अशाच प्रकारचे काम केल्याने छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कारासाठी पात्र ठरली आहे. ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजना पोहोचवून गाव विकासाला गती देण्याचे काम ही सेवाभावी संस्था करत आहे. ग्राम स्वच्छता अभियान अक्षय प्रकाश योजना किंवा ओसाड भागात वन विभागाच्या मदतीने केलेली ५० हजार वृक्षांची लागवड या सर्व कामात प्रगती सेवाभावी संस्थेचा मोलाचा वाटा आहे.

नागपूर वृत्तामधून विनोद विद्यालय, (सिल्ली- ता. जि. भंडारा) ही अशीच वनक्षेत्राच्या विकासासाठी महत्त्वाचे काम करणारी शैक्षणिक संस्था आहे. शाळेने तीन वर्षात ३ रोपवाटिका तयार केल्या त्यातून २१५०० रोपे निर्माण केली. त्यातील २०६५० रोपे लोकांना वाटण्यात आली. यांच्याबरोबरीनं वर्ध्यातील हिंगणघाट तालुक्याच्या शेगाव (कुंड) गावातील सरस्वती विद्यालयाने वृक्ष संवर्धनाचे काम केले आणि वृक्षमित्र पुरस्कार पटकावला. याशिवाय वृक्ष लागवडीच्या कामात खाजगी संस्थांना प्रोत्साहित करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्काराच्या धर्तीवर वृक्षमित्र पुरस्कार दिले जातात. २५ हजार रुपये आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून यासाठी कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक आणि सरस्वती विद्यालय, शेगाव (कुंड ), ता. हिंगणघाट जि. वर्धा या दोन संस्थांची निवड करण्यात आली आहे.

**संपर्क : ०९९६९००१४०६**



### संत तुकाराम वनग्राम योजनेंतर्गत उत्कृष्ट गावे २०१३-१४

गोठणगाव, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली, प्रथम बक्षीस विभागून; गुंडेगाव (धावडेवाडी), ता. अहमदनगर, जि. अहमदनगर, प्रथम बक्षीस विभागून; निमजी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर, प्रथम बक्षीस विभागून; बुचकेवाडी (वैष्णवधाम), ता. जुन्नर, जि. पुणे, दुसरे बक्षीस विभागून; शिवाजीनगर, ता. दापोली, जि. रत्नागिरी (चि.) दुसरे बक्षीस विभागून; पेढरी, ता. मुरबाड, जि. ठाणे, तिसरे बक्षीस विभागून; तिडका, ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया, तिसरे बक्षीस विभागून; डोंगरगाव, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर, तिसरे बक्षीस विभागून; शेकापूर, ता. बुलढाणा, जि. बुलढाणा, तिसरे बक्षीस विभागून; चोरजवळा, ता. मराठवाडा, जि. हिंगोली, प्रशासकीय विभागासाठी प्रोत्साहनात्मक बक्षीस.

### छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार विजेते २०१३

**पुणे वृत्त**: सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, मौजे मोहरे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, प्रथम पुरस्कार.

**ठाणे वृत्त**: आदर्श शिक्षण संस्थेचे विद्याभवन, एडवण, ता. पालघर, जि. ठाणे, प्रथम पुरस्कार; माध्यमिक विद्यालय, विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, द्वितीय पुरस्कार.

**नाशिक वृत्त**: अनिल अमृत पाटील, नंदूरबार, प्रथम पुरस्कार; सुरेश सोपानराव खामकर, अहमदनगर, द्वितीय पुरस्कार; ग्रामपंचायत पिंप्री सैय्यद, ता. जि. नाशिक, प्रथम पुरस्कार; मालेगाव एज्युकेशन सोसायटी, मालेगाव, जि. नाशिक, प्रथम पुरस्कार; हस्ती पब्लिक स्कुल, दोंडाईचा, ता. शिंदखेडा. जि. धुळे, द्वितीय पुरस्कार.

**औरंगाबाद वृत्त**: विनोद अच्युतराव कुटे पाटील, झरी विष्णुपुरी. ता.जि. नांदेड, प्रथम पुरस्कार; अमन विश्व हायस्कूल, औरंगाबाद, प्रथम पुरस्कार; कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण संस्था, उदगीर, जि. लातूर, द्वितीय पुरस्कार.

**अमरावती वृत्त**: अमर कैजीनाथ दिनकर, मौजा बोथबोडन, ता.जि.यवतमाळ, प्रथम पुरस्कार; एडेड हायस्कुल व उच्च माध्यमिक विद्यालय, चिखली रोड, बुलढाणा, द्वितीय पुरस्कार.

**नागपूर वृत्त**: रामधन नकटू धकाते, मु.पो. लवारी, ता. साकोली, जि.भंडारा, प्रथम पुरस्कार; ग्रामपंचायत सिरुड, ता.हिंगणघाट, जि. वर्धा, प्रथम पुरस्कार; निळकंठ मुरार घटवाई विद्यालय व विज्ञान/कला कनिष्ठ महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, प्रथम पुरस्कार; विनोद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सिल्ली, ता. जि.भंडारा, द्वितीय पुरस्कार; प्रगती मागासवर्गीय महिला सेवाभावी संस्था, भंडारा, प्रथम पुरस्कार.

### राज्यस्तरीय विजेते

अनिल अमृत पाटील, नंदुरबार, प्रथम पुरस्कार; अमर कैजीनाथ दिनकर, बोथबोडन, ता.जि. यवतमाळ, द्वितीय पुरस्कार; रामधन नकटू धकाते, मु.पो लवारी, जि. भंडारा, तृतीय पुरस्कार; ग्रामपंचायत सिरूड, ता. हिंगणघाट, जि. वर्धा, प्रथम पुरस्कार; ग्रामपंचायत पिंप्री सैय्यद, ता.जि. नाशिक, द्वितीय पुरस्कार.

एडेड हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, बुलडाणा, प्रथम पुरस्कार; सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, मोहरे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर, द्वितीय पुरस्कार; निळकंठ मुरार घटवाई विद्यालय व विज्ञान/कला कनिष्ठ महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि.वर्धा, तृतीय पुरस्कार.

प्रगती मागासवर्गीय महिला सेवाभावी संस्था, भंडारा, प्रथम पुरस्कार.

## विशेष मुलाखत



# लोकसहभागातून वनसंवर्धन

**वन विकास आता शासनाच्या प्राधान्यक्रमावर आलेला विषय आहे. वनांचे जतन आणि संवर्धन हे शासनाचे कर्तव्य असले तरी ते लोकसहभागाशिवाय अशक्य आहे असे मत व्यक्त करताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी वन विकासातले संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या कार्याचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.**

**वन विकासाविषयी आपला दृष्टिकोन काय?**

लहानपणी मी शाळेत असताना कधी क्लायमॅट चेंज, ग्लोबल वॉर्मिंगसारखे शब्द ऐकले नव्हते. आपण पर्यावरणाचे संतुलन योग्य पद्धतीने ठेवण्यात अपयशी ठरलो आहोत. एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनक्षेत्र असावे असे म्हटले जाते. चांगले घनदाट जंगल ज्याला म्हणतात ते आपल्याकडे १३ ते १४ टक्क्यांच्या आसपास आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २० टक्क्यांच्या आसपास आपल्याकडे वनक्षेत्र आहे. म्हणून ज्या गोष्टी वनमंत्री म्हणून केल्या पाहिजेत त्या आणि वित्तमंत्री म्हणून त्याला पैसे दिले पाहिजेत त्या सगळ्या तरतूदी मी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून केल्या. ही तरतूद ५५० कोटी रुपयांपर्यंत जाईल, जी नेहमीच्या तरतूदीपेक्षा दोन-अडीचपट अधिक आहे. वन संरक्षणासाठी कायदे कडक केले, न्यायप्रक्रिया जलद करण्याचा निर्णय घेतला. दोषींना दंडित करण्याची कार्यवाही जलद केली. एखाद्या गाडीमध्ये चोरीचे वनोपज किंवा चोरीचे लाकूड जात असेल तर ते सुपूर्द करण्यासाठी गाडी कोणाकडे द्यायची हा प्रश्न होता. मग मी निर्णय केला की ३ लाखांपेक्षा जास्त किंमतीचे लाकूड जर त्या गाडीत असेल तर ती गाडी सरकार जमा करायची.

सर्व अधिकाऱ्यांना शास्त्रीय पद्धतीने वनसंगोपन आणि वनांचा विस्तार करण्याचे प्रशिक्षण देत आहोत. वन्यजीव ही जैवविविधतेतील एक महत्त्वाची कडी आहे. यासाठी आता आपण चंद्रपूर येथे नवीन वन अकादमी उघडत आहोत.

१२५५६ गावात आपण संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांच्या माध्यमातून गावाच्या आसपास असलेल्या जंगलाचे संरक्षण केले जाते.

**वन्यजीव रक्षणासाठी वन विभाग काय काम करत आहे.**

लोक आणि वन्यजीव दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी आहेत. वन्यजीव या सृष्टीशंखलेतील महत्त्वाची कडी आहे. वाघ नष्ट झाले की तृणभक्षी प्राण्यांची वाढ होते, त्यांची वाढ झाली की शेती धोक्यात येते म्हणून ही साखळी महत्त्वाची आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांचे रक्षण आणि त्यांची होणारी शिकार थांबवणे हा महत्त्वाचा विषय ठरतो. त्यादृष्टीने वनाधिकाऱ्यांना शस्त्र परवाने दिले, वायरलेस सेट दिले. विशेष पोलीस दलाची निर्मिती केली आहे.

हल्ल्यात जखमी झालेल्या किंवा मृत्यू पावलेल्या व्यक्तींला किंवा त्याच्या नातेवाईकांना जी मदत केली जायची ती देखील वाढवली आहे. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जर आता व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबियांना आठ लाख रुपयांची मदत दिली जाते. ही देशातील सर्वाधिक रक्कम आहे. तसेच वन्यप्राण्यांमुळे जर शेतपिकाचे, फळबागाचे नुकसान झाले तर त्याची नुकसानभरपाईची रक्कम ही आपण वाढवली आहे. माणसे जळणासाठी लाकडे आणायला जंगलात जातात आणि तिथे त्यांच्यावर वन्य प्राण्यांचे हल्ले होतात हे लक्षात घेऊन आम्ही ६४,६०९ गॅस जोडण्या उपलब्ध करून दिल्या आणि त्याला सबसिडी दिली. बांबूवर आधारित असलेला मोठा रोजगार महाराष्ट्रात आहे त्यादृष्टीने आम्ही अर्थसंकल्पात श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना आणली. यामुळे वनांच्या आसपास असलेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांसोबत रोजगार निर्मितीला प्रोत्साहन मिळेल.

**वन अकादमी आणि बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र याविषयी माहिती द्या?**

बांबूपासून साधारणत: १६० ते १६७ वस्तू तयार होतात. ४० टक्के बिल्डिंग मटेरियल बांबूपासून तयार होऊ शकते. बांबूपासून उत्तम लाकूड तयार होते. थीक वूडला पर्याय असणारा बांबू आहे. पण आपल्या राज्यात बांबू धोरण नव्हते. त्याला डिसेंबरमध्ये मान्यता दिली. शास्त्रीय पद्धतीने बांबू लागवडीचे प्रशिक्षण आम्ही देणार आहोत. बांबूपासून उत्तम वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देणे तेवढेच गरजेचे आहे. म्हणून आपण चिचपल्लीत हे केंद्र सुरू करत आहोत.

भविष्यात जर आम्ही याला चांगल्या पद्धतीने विकसित केले तर मला विश्वास आहे. आमच्या निर्यात व्यवसायामध्ये बांबू देखील महत्त्वाचा घटक होऊ शकतो. १९९७ पासून बांबू कामगारांची नोंदणी बंद झाली होती. ती आपण सुरू केली त्याचबरोबर त्यांचे सर्व कर आपण माफ केले.

**तरुणपिढी निसर्गपर्यटनाला जाईल यासाठी आपण काय करत आहात?**

निसर्ग पर्यटन हे आनंद देणारे तर आहेच पण ते उत्पन्न वाढवणारे, रोजगार संधीची निर्मिती करणारे क्षेत्र आहे. पर्यटनातून साधारणत: सोळा प्रकारच्या लोकांना रोजगार मिळतो. म्हणून आता आपण निसर्ग पर्यटन मंडळ स्थापन केले आहे. या मंडळाच्या माध्यमातून आम्ही पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास करणार आहोत.

मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगभरातून ४० टक्के पर्यटक येतात आणि त्यातील ३२ टक्के पर्यटक पुढच्या २४ तासात इतर पर्यटनस्थळाला भेटी देण्यासाठी निघून जातात. विमानतळाच्या इतक्या जवळ असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानापर्यंत त्यांना पोहोचवू शकलो नाही, हीच गोष्ट डोळ्यासमोर ठेवून संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, ताडोबा आणि गोरेवाडा प्राणी संग्रहालय यासाठी अर्थसंकल्पात १९१ कोटी रुपये ठेवले आहेत. या तीनही पर्यटनक्षेत्राला आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्थान मिळवून देणे, यासाठी आम्ही पूर्ण शक्तीने काम करणार आहोत.

**बल्लारपूर येथे वनस्पती उद्यानाचा आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करू इच्छिता, तो कशाप्रकारे ?**

अर्थमंत्री चांद्याचा आहे आणि अर्थराज्य मंत्री बांद्याचा आहे. म्हणून चांदा ते बांदा असा विकास करण्याची संकल्पना मी मांडली. याची सुरुवात बंगलोरच्या धर्तीवर बल्लारपूर येथे बॉटिनिकल गार्डन तयार करून करतो आहोत. कारण तिथे साधारणत: ९७ हेक्टर एवढी जागा आहे. सिंधुदुर्गमध्ये आपण सी वर्ल्ड विकसित करतो आहोत. वन



विभागाची किंवा महसूल विभागाची प्रत्येक जिल्ह्यात जागा आहे याठिकाणी आपण नक्षत्र उद्यानासारखी संकल्पना राबवणार आहोत. सामाजिक वनीकरण संचालनालय आता वन विभागात विलीन झाले आहे. त्यामाध्यमातून आम्ही प्रत्येक जिल्ह्यात एक हायटेक नर्सरी करत आहोत.

**वन्यप्राण्यांची शिकार होऊ नये म्हणून आपण काय काळजी घेतो?**

राष्ट्रीय वन्यजीव प्राधिकरण असते त्या धर्तीवर राज्यातही प्राधिकरण असावे. यात मुक्या जनावरांची योग्य निगा राखली जाईल, त्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास उपलब्ध करून दिला जाईल.

वाघांची शिकार टाळण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समित्या उपयुक्त ठरत आहेत. त्यांना संशयास्पद गोष्ट आढळल्यानंतर ती त्यांनी वन विभागाला कळवली तर आपण त्यांना बक्षीसही देतो. काही ठिकाणी आपण कॅमेरे लावून नजर ठेवतो आहोत. आपण विशेष व्याघ्र संरक्षण दलही स्थापन केले आहे.

**मुलाखत – डॉ. सुरेखा मुळे**

एक दिवस मंत्र्यांसोबत

# परखड आणि अभ्यासू

आदल्या दिवशी रात्री झोपायला उशीर झाला तरी, सकाळी आपल्या नेहमीच्या वेळी ते उठणारच. त्यानंतर सकाळचे फिरणे, व्यायाम, खेळणे आदी वेळेवर करून सकाळी १० च्या दरम्यान त्यांची दिवसाच्या कामांना सुरूवात होते. जनतेला भेटण्यापूर्वी वॉट्सअप तसेच एसएमएसच्या माध्यमातून जनतेकडून आलेल्या संदेशाचे वाचन करतात. तसेच विविध वृत्तपत्रांमध्ये आलेल्या त्यांच्या विभागाशी संबंधित व जनसामान्यांच्या समस्यांवरील बातम्या, लेखांचे वाचन करून संबंधित अधिकारी तसेच पदाधिकारी यांना कामाबाबत सूचना देतात. अत्यंत महत्त्वाच्या बाबींची नोंद करून ठेवण्याची त्यांची स्वत:ची सवय आहे. विभागातील कार्यालयात भेटण्यास आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा तसेच अधिकाऱ्यांचा वेळ बहुमूल्य असल्याची जाणीव त्यांना असल्याने भेटण्यास आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नेमके काय काम आहे? याची माहिती त्यांच्यासोबत असलेल्या अधिकाऱ्यांकडून घेतात. मग ते स्वत: प्रत्येक व्यक्तीला भेटून त्यांच्या कामांचे समाधान करतात. व्यक्तींना भेटत असताना मोबाइलवर येणाऱ्या फोनवरही संवाद साधतात. प्रत्येक व्यक्तीची आस्थेने चौकशी करण्याबरोबरच त्यांना चहापाणी दिले की नाही याची कर्मचाऱ्यांकडे न चुकता विचारणाही करतात. विभागात सुरू असलेल्या कामांचा आढावाही ते दरदिवशी न चुकता घेतात. विभागातील भेटी घेताना आपल्या सोबतच्या अधिकाऱ्यांना फोन करून आज करावयाच्या अतिरिक्त कामांची कल्पना देतात.

**दिवसरात्र जनतेच्या भल्याचा विचार करणाऱ्या गृहनिर्माण, उच्च आणि तंत्र शिक्षण, राज्यमंत्री, रविंद्र वायकर यांच्यासोबत काम करताना दिवसाची रात्र कधी होते ते कळत नाही. दिवसभर अथक काम करूनही त्यांच्या चेहऱ्यावर थकल्याचा लवलेश नसतो. दिवसभर सारखेच कार्यक्षम राहण्यामागचे रहस्य हे त्यांच्या दिनचर्येचा स्वानुभव घेतल्यावर लक्षात आले.**



### वेळेचे नियोजन

दिवसभरात घेतलेल्या बैठका वेळेवर घेण्यावर त्यांचा कटाक्ष असतो. त्यामुळे विभागातील भेटीगाठी तसेच कामांचा निपटारा केल्यानंतर ते मंत्रालयात जाण्यासाठी निघतात. तत्पूर्वी विभागात त्यांनी उभारलेल्या इच्छापूर्ती गणेश मंदिरात गणपतीचे दर्शन घेऊन ते मंत्रालयाकडे कूच करतात. मंत्रालय गाठताना रस्त्याच्या आजूबाजूचे ते बारकाईने निरीक्षण करतात. त्यांची स्मरणशक्ती तल्लख असल्याने ते विविध गोष्टींची सातत्याने माहिती सोबतच्या अधिकाऱ्यांना देतात. प्रवासात एखाद्या कामाची आठवण झाली तर ते सोबतच्या अधिकाऱ्याला त्याची माहिती घेण्याच्या सूचनाही करतात. गाडीत फाइलींचे वाचन करतात. मंत्रालयातील आपल्या दालनामध्ये पोहोचल्यावर संबंधित बैठकांसाठी अधिकारी आले आहेत का? बैठकांची काटेकोरपणे तयारी झाली आहे की नाही? याची माहिती सोबतच्या अधिकाऱ्यांकडून घेतात. ते स्वत: बैठकांशी संबंधित विषयाचा अभ्यास करून पूर्ण तयारीनिशी बैठकीत सहभागी होतात. बैठकीशी निगडित खात्याकडून आलेल्या प्रत्येक टिपणीचे बारकाईने वाचन करतात. कुठल्याही समस्यांचे निराकरण करताना ते नाण्याच्या दोन्ही बाजूंचा विचार करतात. कुठल्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून ते पाहत असल्याने तक्रारदार तसेच संबंधित खात्याचे अधिकारी या दोघांचे



म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच यातून सुवर्णमध्य काढत निर्णय घेण्यावर ते अधिक भर देतात. सर्वच निर्णय ते कायद्याच्या चौकटीत राहुनच घेतात.

### सदैव तत्पर

शासनाने पूर्वी घेतलेल्या काही धोरणात्मक निर्णयामुळे सद्य:स्थितीत एखाद्या समस्येवर निर्णय घेणे अशक्य होत असेल तर वेळ पडल्यास धोरणात्मक निर्णय बदलण्यास आवश्यक ती पावले उचलण्यास ते सदैव तत्पर असतात. एखाद्या समस्येवर ते आपली परखड मते बेधडकपणे मांडतात. एखाद्या विषयावर पुन्हा बैठक बोलविण्यास आल्यास पहिल्या बैठकीत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कुठल्या सूचना केल्या होत्या याची आठवणही ते करून देतात. संबंधित अधिकाऱ्यांना ते प्रॅक्टिकल सूचना देत असल्याने, बऱ्याचदा समाधानकारक तोडगा काढणे शक्य होते. बैठका संपण्यापूर्वीच भेटण्याची पूर्वनियोजित वेळ न घेता येणाऱ्यांची संख्या कितीही असो, प्रत्येकाची भेट घेतल्यानंतरच मंत्रालय सोडण्याचा त्यांचा शिरस्ता आहे. एवढेच नाही तर दिवसभरात उच्च व तंत्रशिक्षण तसेच गृहनिर्माण विभागाकडून आलेल्या फाइल्सचे वाचन करून त्या तत्काळ निकाली काढण्यावर ते अधिक भर देतात. मग संध्याकाळचे कितीही वाजू देत. आणखीन काही कामकाज राहिले आहे का? आणखीन कोणी भेटण्यास थांबले आहेत का? याची खातरजमा करूनच ते मंत्रालयाच्या बाहेर पडतात. निघतानाही संध्याकाळचे कार्यक्रम काय आहेत? दुसऱ्या दिवशीच्या बैठका किती व कुठे आहेत? याची माहिती न विसरता घेतात. नुसत्या बैठकांवर ते भर देत नाही तर तो प्रश्न तडीस नेण्यावर त्यावर लक्ष ठेऊन असतात.

संध्याकाळी एखाद्या कार्यक्रमाला हजेरी लावायची असेल तर कार्यक्रमाचा विषय बघून ते टिपणी मागवतात. राजकीय तसेच सामाजिक जीवनात विविध पदावर काम करताना आलेल्या अनुभवाची जोड ते आपल्या भाषणात देतात. ते उत्स्फूर्तपणे भाषण करतात. आपल्या भाषणात संबंधित विषयाच्या क्षेत्रात शासन म्हणून कुठले बदल होणे आवश्यक आहे, याचा गरज असेल तर ते उल्लेख करतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या भाषणाआधी आधीच्या वक्त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या असतील किंवा काही वेगळे मुद्दे उपस्थित केले असतील तर त्यांची दखल ते आपल्या भाषणात घेतात.

### कार्यकर्त्यांशी संवाद

मंत्रालयातील कामकाज संपवून घराकडे जाताना मोबाइलवरून विभागातील कार्यकर्त्यांशी संपर्क सुरू होतो. सकाळी अधिकारी तसेच विभागातील कार्यकर्त्यांना दिलेल्या सूचनांचा पाठपुरावा मोबाइलवरून करतात. मंत्रालय ते मतदारसंघ गाठेपर्यंत जोगेश्वरीतील जुन्या आठवणी तसेच रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून राबवायच्या विविध योजना, सध्या जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा ते माध्यमातून घेतात. विभागात पोहोचल्यावर पुन्हा त्यांच्या विभागातील सेवालय येथील कार्यालयात भेटण्यासाठी आलेल्या व्यक्तींची भेट घेतात. भेटायला आलेल्या प्रत्येकाचे गाऱ्हाणे ऐकून, ते काम होणार असेल तर हो म्हणायचे नाही तर नाही म्हणायचे? असा त्यांचा शिरस्ता आहे. दिवसभराचे काम संपण्याला किमान रात्रीचे बारा वाजतात. तरी देखील विभागातील कार्यालयातून निघत असताना कार्यालयात येणाऱ्या कार्यकर्त्यांशी ते संवाद साधतात. एवढे श्रम करूनही त्यांच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता कमी होत नाही. सकाळी त्यांचा जो उत्साह असतो तो रात्री उशिरापर्यंत कायम असतो, हे बघून आश्चर्यचकित व्हायला होते. एक अभ्यासू, परखड मते मांडणारी व्यक्ती, कुठल्याही कामाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची वृत्ती तसेच जनतेच्या हितासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या नेत्यासोबत काम करण्याची संधी मिळणे ही खरोखरच भाग्याची गोष्ट आहे.

सचिन निमकर

संपर्क : ०९८६७५२१०६०

# ॥ जाता पंढरीसी, सुख वाटे जीवा॥

**'पंढरीची वारी ' हा एक वेगळाच अनुभव आहे. हा सुखाचा सोहळा असतो. ऊन, वारा, पाऊस कशाचीही पर्वा न करता लाखो वारकरी मोठ्या भक्तिभावाने दरवर्षी आषाढी वारीसाठी पंढरपूरला येतात. 'जाऊ देवाचिया गावा घेऊ तेथेचि विसावा..' या ओढीने येतात. येथे येणाऱ्या वारकऱ्यांचा विसावा सुखद व्हावा, 'जाता पंढरीशी सुख वाटे जीवा' चा प्रत्यय यावा, वारी अधिक सुकर व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात आले.**



गोविंद अहंकारी

या वर्षी प्रथमच आषाढी वारीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण अंतर्गत आयआरएस (IRS) घटना प्रतिसाद प्रणालीचा प्रभावीरीत्या उपयोग करण्यात आले. जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली याचे नियोजन केले.

यामुळे सर्व यंत्रणा स्वतंत्रपणे काम न करता एका छताखाली आल्या. कोणी कोणाला सांगावे हा गुंता दूर होवून समन्वयाने काम करण्यात आले. जिल्ह्यांमध्ये संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरु तुकाराम महाराज व अन्य महत्त्वाच्या पालख्यांच्या आगमनापासून प्रस्थानापर्यंतचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले. पालखी मार्गावरील खड्डे भरणे, झाडेझुडपे काढणे, पालखीतळ सुस्थितीत ठेवणे, शुद्धीकरण केलेले पिण्याचे पाणी पुरविणे. आरोग्य सुविधेपासून, वाळवंटातील स्वच्छता, पंढरपूर शहरातील शौचालयाची व्यवस्था, स्वच्छता या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात आले.

### निवास व्यवस्था

उच्च न्यायालयाने पंढरपूर येथील वाळवंटात राहुट्या घालण्यास मनाई केली. त्यामुळे वाळवंटात रस्त्यापासून जवळच असलेल्या शासनाच्या ६५ एकर जागेत वारकऱ्यांची निवास व्यवस्था करण्यात आली. काळी माती असलेल्या जागेत मुरूमीकरण, मजबुतीकरण करण्यात आले. यामध्ये ५ विभाग करून १ हजार चौरसफुटाचे ४२९ भूखंड पाडण्यात आले. यात अंतर्गत रस्ते, प्रत्येक १०० मीटर अंतरावर शुद्धीकरण केलेले पिण्याच्या पाण्याची नळव्यवस्था, शौचालयाचे युनिट, विद्युत पुरवठा, २४ तास वैद्यकीय सेवेसाठी पथक, रुग्णवाहिका, अग्निशामक वाहन, पोलीस नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले. वारकऱ्यांच्या सोयीसाठी शेजारीच एस.टी. महामंडळाचे वाहनतळ आदी कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यात आली.

या परिसरातील व्यवस्थेसाठी उपजिल्हाधिकारी दिनेश भालेदार यांच्यासह ११ विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक कार्यरत ठेवण्यात आले. येथील जागा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी दिंडी चालकांकडून अर्ज भरून घेऊन दिंडीतील लोकांच्या संख्येनुसार जागा निश्चित करून देण्यात आली. येणाऱ्या वारकऱ्यांना येथे उपलब्ध असलेल्या सुविधांबाबत जिल्हा प्रशासन सातत्याने वारकऱ्यांशी संवाद साधून माहिती देत होते. कोठेही घाण होणार नाही याची काळजी घेण्याबाबत आवाहन करीत होते.

### मोफत सुविधा

दरवर्षी येणारे वारकरी मठ, धर्मशाळा, वाळवंट, मिळेल त्या जागेत गर्दीत राहत होते. तेथे पिण्याचे पाणी, शौचालयाबाबत गैरसोयी असायच्या, यावर्षी शासनामार्फत मोफत या सर्व मूलभूत सोयीसुविधा मिळाल्याने वारकऱ्यांमध्ये समाधानाची भावना होती. अनेक वारकऱ्यांनी या जागेत राहुट्या उभ्या करून धार्मिक कार्यक्रम सुरू केल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

येथे येणाऱ्या वारकऱ्यांनासाठी नदीत पाणी उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. ही गरज भागविण्यासाठी बंधारा बांधणे गरजेचे होते. यासाठी प्रशासनाने बंधाऱ्याचे अल्पावधीत काम पूर्ण केले. १८ महिन्यांची मुदत असताना केवळ ९९ दिवसात हे काम पूर्ण केले. त्यामुळे स्नान करण्याची चांगली सोय झाली.

पंढरपूरला येणारे वारकरी चंद्रभागा नदीत स्नान करण्यात धन्यता मानतात. यावर्षी नदीपात्रात विष्णूपद बंधारा उभारून पाणी अडविण्यात आले. त्यामुळे निम्मे वाळवंट पाण्याने व्यापले होते.



**चंद्रभागेत स्नान, तुका मागे हेचि दान :** बंधाऱ्यामुळे स्नानाची चांगली सोय झाल्याने वारकरी समाधानी दिसत होते. नदीपात्रातील वाळवंटात त्यामुळेच स्वच्छता राखण्यावर भर देण्यात आला. वाळवंट नेहमीच्या तुलनेने स्वच्छ दिसत असल्याबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

### नदीप्रदूषण थांबले

बंधाऱ्यातील पाण्यामुळे नदीपात्र वाहते राहुन नदीप्रदुषण रोखण्यासाठी, तसेच पाण्यामुळे होणाऱ्या आजाराचे प्रमाण कमी होण्यासही मदत झाली. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार



**आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात चंद्रभागेतीरी आलेला भक्तांचा पूर**

नदीप्रवाह प्रदूषणविरहीत ठेवण्यासाठी बंधारा उपयुक्त ठरला आहे.

**स्वच्छतेचा जागर –** या वारीनिमित्त जिल्ह्यातील प्रमुख पालखीचे आगमन, विसावा व मुक्कामाची ठिकाणे तेथे उपलब्ध असलेली कायमस्वरूपी शौचालयाची व्यवस्था लक्षात घेऊन करण्यात आली. तात्पुरती गावातील उपलब्ध होणारी शौचालये, फिरती शौचालय



**पंढरपुरात भाविकांसाठी प्रशासनाने अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या.**

व्यवस्था करून देण्यात आली. स्वच्छता राखण्यासाठी कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले होते.

### स्वच्छतेस साहाय्य

अनेक दिंड्या व पालख्यांनी स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेला हातभार लावण्याचे आवाहन केले. पंढरपूर शहरात स्वच्छताविषयक व्यापक उपाययोजना राबवण्यात आल्या. नगरपरिषद, मंदिर समितीमार्फतही मोठया प्रमाणावर तात्पुरती फिरती शौचालये उपलब्ध करून देण्यात आली. स्वच्छतेसाठी जिल्ह्यातील इतर नगरपरिषदेचे अधिकारी– कर्मचारी, सफाई कामगार उपलब्ध करून देण्यात आले होते. मंदिर परिसरातील अतिक्रमणे काढण्यात आली. वाहतुकीच्या कोंडीमुळे होणारा त्रास यामुळे कमी झाला. रस्त्यावर चालणे सुखकर झाल्याचे वारकरी समाधान व्यक्त करत होते. या विविध उपाययोजनांद्वारे पंढरपूरची यात्रा वारकऱ्यांना अधिक सुखकर वाटली. || जाता पंढरीसी, सुख वाटे जीवा || याचा प्रत्यय त्यांना आला. यासाठी प्रशासनाचे प्रयत्न यशस्वी झाले. ६५ एकरातील वारकऱ्यांची निवासव्यवस्था, बंधाऱ्यामुळे स्नानाच्या व्यवस्थेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केले. तसेच पुढील वर्षी वारकऱ्यांसाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवण्याची ग्वाही दिली.

**संपर्क : ०९८५००९७१७३**

❑ ❑

नवे आयटी धोरण

# नवी आघाडी... उंच झेप

**महाराष्ट्र हे देशातील पुरोगामी व उद्योजकांची पहिली पसंती असलेले राज्य आहे. राज्याचा समतोल गतीने विकास, भविष्यातील गरज डोळ्यासमोर ठेवून नवीन माहिती धोरण जाहीर झाले आहे. यामुळे राज्याची औद्योगिक विकासातील आघाडी कायम राहील. औद्योगिक विकासाशी माहिती तंत्रज्ञानांची योग्य सांगड या धोरणात घालण्यात आली आहे. नुकतेच राज्य मंत्रिमंडळाने माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण २०१५ मंजूर करून मेक इन महाराष्ट्र संकल्पनेला बळ देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.**



राज्य शासनाने १९९८ मध्ये पहिले माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर केले होते. त्यानंतर रोजगार निर्मिती, कार्यक्षमतेत वाढ व जीवनमान सुधारण्यासाठी माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण २००३, २००९ मध्ये माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण जाहीर केले. या धोरणास ३० जून २०१५ पर्यंत वाढीव मुदत देण्यात आली होती. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विकासक, तज्ज्ञ प्रतिनिधी, विविध कंपन्यांचे संचालक, नॅसकॉम, टेलिकॉम उद्योगांचे प्रतिनिधी, इतर संबंधित संस्था व राज्यातील कुशल मनुष्यबळ या सर्व बाबींचा अभ्यास करून नव्या माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा धोरण २०१५ चा मसुदा तयार करण्यात आला आहे. या धोरणास मंत्रीमंडळाने मान्यता दिली.

काशीबाई थोरात

### ५० हजार कोटी गुंतवणुकीचे लक्ष्य

या धोरणाच्या माध्यमातून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ५० हजार कोटी गुंतवणूक अपेक्षित असून १० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर प्रतिवर्षी रुपये एक लाख कोटींच्या निर्यातीचे लक्ष्यदेखील ठेवण्यात आले आहे.

नवीन औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून एकात्मिक औद्योगिक क्षेत्र ( इंटिग्रेटेड इंडस्ट्रियल एरिया) ही संकल्पना विकसित करण्यात येत आहे. विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित केलेल्या जमिनीवर ६० टक्के क्षेत्र निव्वळ औद्योगिक वापरासाठी आणि ४० टक्के क्षेत्र त्यातच औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी निवासस्थान, संकुल, बाजारपेठ, रुग्णालये, शाळा अशा सुविधा एकाच विभागात देऊन 'वॉक टू वर्क' ही

### माहिती तंत्रज्ञान धोरणाची वैशिष्ट्ये:

- राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात ५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दहा लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य
- प्रतिवर्षी रुपये एक लाख कोटींच्या निर्यातीचे लक्ष्य
- वॉक टू वर्क आणि स्मार्ट सिटी विकसित करण्यासाठी एकात्मिक माहिती तंत्रज्ञान नगराची संकल्पना प्रस्तावित
- ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस, गेमिंग व कॉमिक्स क्षेत्राच्या वाढीसाठी विशेष प्रोत्साहने
- भारतात पहिल्यांदाच डाटा सेंटर्ससाठी प्रोत्साहने प्रस्तावित
- माहिती तंत्रज्ञान उद्योगवाढीसाठी ग्रामीण व निमशहरी विभागात बिझनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग संकल्पना राबवणार

संकल्पना राबवण्यात येत आहे. यासाठी राज्यात स्मार्ट सिटी प्रकल्प विकसित करण्यासाठी विविध बहुराष्ट्रीय कंपन्या उत्सुक आहेत. या सर्व बाबींचा विचार करून वॉक टू वर्क ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी व स्मार्ट सिटीज् विकसित करण्यासाठी एकात्मिक माहिती तंत्रज्ञान नगराची संकल्पना प्रस्तावित करण्यात आली आहे.

'एकात्मिक माहिती तंत्रज्ञान नगरे' या संकल्पनेबाबत अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक आणि अधिमूल्य आकारण्याच्या संदर्भात पुणे, पिंपरी-चिंचवड, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, उल्हासनगर या महानगरपालिका आणि अंबरनाथ नगर परिषद या क्षेत्रात स्थित एकात्मिक माहिती तंत्रज्ञान नगरामध्ये २.५ इतका चटईक्षेत्र निर्देशांक व राज्यातील उर्वरित क्षेत्रासाठी २.०० इतका चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील. असे या धोरणात निर्दिष्ट करण्यात आले आहे.

तसेच या धोरणात माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवेच्या व्याख्येमध्ये सुधारणा करुन केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (Central Board of Direct Taxes) वेळोवेळी आयकर कायद्याच्या कलम १० अन्वये निर्देशित केलेल्या सेवेशी सांगड घालण्यात आलेली आहे.

### अधिमूल्य आकारावयाच्या पद्धतीत सुसूत्रता

पूर्वीच्या माहिती तंत्रज्ञान धोरणामध्ये अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून देण्यासाठी विविध बाबींवरील अधिमूल्य आकारावयाची पद्धत क्लिष्ट स्वरूपाची होती. त्यामुळे याबाबतची प्रकरणे निकालात काढण्यास विलंब होत होता. म्हणून आकारावयाच्या अधिमूल्य दरामध्ये व इतर अनुषंगिक बाबींमध्ये सुसूत्रता आणून पुणे, पिंपरी-चिंचवड, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, उल्हासनगर या महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपरिषद आणि राज्यातील विनाउद्योग जिल्हे तसेच नक्षलग्रस्त भाग (सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अन्वये घोषित केलेले) वगळून इतर सर्व ठिकाणी प्रचलित रेडीरेकनर दराच्या १० टक्के अधिमूल्य आकारण्यात येईल. आणि पुणे, पिंपरी-चिंचवड, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, उल्हासनगर या महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपरिषद याकरिता ३० टक्के अधिमूल्य आकारणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

त्याचबरोबर या धोरणामध्ये पहिल्यांदाच पूरक न ठरणाऱ्या बाबींची यादी (Negative List) तयार करण्यात आली आहे. त्यात मॉल्स, सिनेमागृहे, रहिवासी सदनिका इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे. राज्यात आयटी उद्योग वाढविण्यासाठी कमी भाड्याने किंवा कमी किंमतीने बांधीव मिळकत उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी बेस एफएसआयवर २०० टक्के पर्यंत अधिमूल्य आकारून अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाइंदर, उल्हासनगर महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपरिषद या ठिकाणच्या सार्वजनिक तसेच खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्याने, एव्हीजीसी उद्याने यांना एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या किमान ८० टक्के क्षेत्र माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवांसाठी व उर्वरित कमाल २० टक्क्यांपर्यत क्षेत्र (पार्किंग क्षेत्र वगळून) पूरक सेवांसाठी राहील. याव्यतिरिक्त उर्वरित ठिकाणच्या सार्वजनिक तसेच खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्याने, एव्हीजीसी उद्याने यांना एकुण बांधकाम क्षेत्रफळाच्या किमान ६० टक्के क्षेत्र माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवांसाठी व उर्वरित कमाल ४० टक्क्यांपर्यत क्षेत्र (पार्किंग क्षेत्र वगळून) पूरक सेवांसाठी राहील असेही नमूद करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योगांना आवश्यक असणारे Critical Infrastructure (उदा. महामार्गाला जोडण्यासाठी पोच रस्ता) तसेच जी माहिती तंत्रज्ञान उद्याने काही मूलभूत सुविधा स्वत: निर्माण करत असतील, तर त्यासाठी झालेला खर्च मालमत्ता करातून अथवा अतिरिक्त चटई क्षेत्रासाठी देय अधिमूल्यातून वळता करण्याबाबतची तरतूद प्रस्तावित केली आहे.

### ग्रामीण बी.पी.ओ. सुरू करणार

या धोरणात डाटा सेंटर्स या क्षेत्रासाठी भारतात पहिल्यांदाच महाराष्ट्राने प्रोत्साहने प्रस्तावित केली आहेत. ग्रामीण तसेच निमशहरी विभागात आयटी उद्योग वाढीसाठी Rural BPO ही संकल्पना राबवण्यात येणार आहे. बिझनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण करण्याची प्रचंड क्षमता आहे. ग्रामीण व निमशहरी भागात संगणक क्षेत्राची तीव्रता वाढविण्यासाठी संगणक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाला त्यांच्या राहत्या ठिकाणीच रोजगार उपलब्ध करून देता येईल याचाही विचार करण्यात आला आहे. ग्रामीण बी.पी.ओ. साठी कर्मचाऱ्यांच्या कामाच्या गुणवत्तेमध्ये उणीव राहू नये यासाठी ग्रामीण व निमशहरी भागात स्थापित होणाऱ्या नवीन बी. पी. ओ. कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी, आर्थिक मदत देण्यात येणार असून यासाठी नामांकित संस्थांकडून प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करण्यात येणार आहेत. माहिती तंत्रज्ञान तसेच माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा घटकांसाठी आर्थिक प्रोत्साहन म्हणून मुद्रांक व विद्युत शुल्क भरण्यापासून सूट, औद्योगिक दराने वीज पुरवठा, वीज दर अनुदान देण्यात येतील.

संपर्क : ०९५०३२८०३७०

- **माहिती तंत्रज्ञान नगरे वसविताना नागरी भागात २.५ चटई निर्देशांक तर उर्वरित क्षेत्रासाठी २.०० चटई निर्देशांक अनुज्ञेय**
- **माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान साहाय्यभूत सेवा घटकांसाठी आर्थिक प्रोत्साहने**
- **मुद्रांक शुल्कात सूट**
- **विद्युत शुल्क भरण्यापासून सूट**
- **औद्योगिक दराने वीज पुरवठा**
- **वीज दर अनुदान**
- **निवासी दराच्या सममूल्य दराने मालमत्ता कर**
- **कार्यकंत्राट करात सवलती**
- **मूल्यवर्धित करामध्ये सवलत**

# महाराष्ट्राची 'स्मार्ट शहरे'

**राज्यातील दहा शहरे केंद्र शासनपुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानासाठी निवडण्यात आली आहेत. या शहरांमध्ये पायाभूत सुविधांसह अनेक प्रकल्प राबवले जाणार आहेत. स्मार्ट शहरांमध्ये भौतिक, संस्थात्मक, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा सर्वंकष विकास होणार आहे.**

Smart City
MISSION TRANSFORM NATION
स्मार्ट सिटी मिशन

देशात शंभर स्मार्टसिटी निर्माण करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. या शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी निधीही पुरविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक राज्याने आपापल्या शहरांची निवड करायची होती. राज्य मंत्रिमंडळाच्या २३ जुलै २०१५ रोजी झालेल्या बैठकीत स्मार्ट सिटी अभियानाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली होती. या अभियानासाठी स्थापन करण्यात आलेल्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीकडून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्पर्धात्मक पद्धतीने दहा शहरांची निवड करण्यात आली. त्यासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध निकष लावण्यात येऊन गुणात्मक पद्धतीने ही निवड झाली आहे. स्मार्ट सिटी अभियान देशातील १०० शहरांमध्ये ५ वर्षांच्या कालावधीसाठी राबवण्यात येणार असून त्यासाठी ४८ हजार कोटींचे आर्थिक साहाय्य केंद्राकडून उपलब्ध करून दिले जाणार आहे, हे प्रमाण सरासरी प्रतिवर्ष प्रतिशहर १०० कोटी इतके आहे. तितकाच निधी संबंधित राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी एकत्रितपणे उभा करावयाचा आहे. निवडलेल्या शहरांमध्ये या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी विशेष हेतू यंत्रणा (Special Purpose Vehicle) स्थापन करण्यात येईल. तसेच स्मार्ट सिटी सल्लागार फोरमचीही स्थापना करून त्या माध्यमातून विविध घटकांचा सहयोग घेतला जाणार आहे. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील निवड झालेली शहरे केंद्र स्तरावरील स्मार्ट चॅलेंज स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. या अभियानाच्या संनियंत्रणासाठी राज्य स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य उच्चाधिकार समिती गठित करण्यात आली आहे. तसेच नगरविकास (२) विभागाचे सचिव राज्य अभियान संचालक म्हणून काम पाहणार आहेत.

## विकासाचे नवे चक्र

देशातील वाढते नागरीकरण लक्षात घेऊन शहरांमधील भौतिक, संस्थात्मक, सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधांचा सर्वंकष विकास करण्याचा केंद्र सरकारचा निर्धार आहे. या पायाभूत सुविधा शहरातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. त्यासोबतच या शहरांच्या विकासाचे एक नवे चक्रही या अभियानाच्या माध्यमातून गतिमान करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न केला जाणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून स्मार्ट शहरांच्या सर्वंकष नागरी विकासासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. त्यात स्थानिक क्षेत्र आधारित विकास व उपयुक्त स्मार्ट तंत्रज्ञानाचा उपयोग करून शहराची आर्थिक प्रगती करणे, वाढती लोकसंख्या विचारात घेऊन विद्यमान शहरांभोवती नवीन शहरे विकसित करणे, मिश्र जमीन वापर, सर्व रहिवाशांना घरांची संधी उपलब्ध करून देणे, नैसर्गिक स्रोतांचा ऱ्हास थांबविण्यासह शहरातील गर्दी-वायू प्रदूषण कमी करणे, मोकळ्या जागांचे जतन व विकास, वाहतुकीचे विविध पर्याय उपलब्ध करणे आदी उद्दिष्टे गाठण्याचा सुनियोजित प्रयत्न केला जाणार आहे.

अभियानातील सहभागासाठी संबंधित शहरांमध्ये समाधानकारक पाणी पुरवठा व्यवस्था, विद्युत पुरवठा, स्वच्छताविषयक व्यवस्था, प्रभावी नागरी दळणवळण व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, नागरी गरिबांना परवडणाऱ्या घरांची उपलब्धता, सक्षम माहिती तंत्रज्ञान व डिजिटलायझेशन यंत्रणा, सुप्रशासन-ई गव्हर्नन्स व नागरी सहभाग, शाश्वत पर्यावरण व्यवस्था, महिला व बालकांची सुरक्षितता, आरोग्य व शिक्षण आदी पायाभूत सुविधा आवश्यक ठरवण्यात आल्या आहेत.

**टीम लोकराज्य**



मुंबई



नागपूर



ठाणे



नवी मुंबई



कल्याण-डोंबिवली



पुणे-पिंपरी चिंचवड



सोलापूर



नाशिक



औरंगाबाद



अमरावती

# एलबीटी अंशत: रद्द

राज्यातील २५ महानगरपालिकातील ५० कोटी रुपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांवरील स्थानिक संस्था कर अर्थात एलबीटी १ ऑगस्टपासून रद्द करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

**या निर्णयाची वैशिष्ट्ये**

- सध्या २५ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये एकूण ८,०९,५५३ व्यापारी नोंदित असून त्यापैकी ८,०८,३९१ व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करापासून सूट देण्यात आली आहे. त्यांचे प्रमाण ९९.८५ टक्के एवढे आहे.
- २५ महानगरपालिकांचे मागील ५ वर्षातील सर्वोच्च आधारभूत उत्पन्नावर ८ टक्के वाढ गृहीत धरून सन २०१५-१६ मध्ये महानगरपालिकांना रु.७,६४८.८२ कोटी देय ठरत आहेत.
- नागरी भागातून मुद्रांक शुल्कापासून प्राप्त होणारे उत्पन्न महानगरपालिकांकडे वळते करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- महानगरपालिकांची आर्थिक स्वायतत्ता अबाधित राखण्यासाठी महानगरपालिकांना देय होणारा निधी राज्याच्या एकत्रित निधीमधून न देता त्यासाठी स्वतंत्रपणे नुकसान भरपाई निधी निर्माण करून त्यामधून नियमित वितरित करण्यात येईल.
- स्थानिक संस्था कर रद्द झाल्याने महानगरपालिकांना आर्थिक अनुदानाकरिता तातडीची उपाययोजना म्हणून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील पहिल्या ५ महिन्यांकरिता रु.२०४८.४४ कोटी रुपयांची तरतूद पूरक मागणीद्वारे करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ जुलै २०१५ रोजी समाप्त होणाऱ्या अभय योजनेस दिनांक १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून अभय योजनेंतर्गत आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील माहे एप्रिल ते जुलै २०१५ पर्यंतचा कालावधीसुद्धा अंर्तभूत करण्यात येईल.

# जनरल मोटर्सची ६ हजार ४०० कोटींची गुंतवणूक



जनरल मोटर्स व महाराष्ट्र शासन यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विधानभवन येथे नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.

या करारानुसार जनरल मोटर्स ही अमेरिकन कंपनी महाराष्ट्रात एकूण ६४०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करणार आहे. कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेरी बॅरा यांनी याबाबत भारत आणि सिंगापूरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी उद्योग मंत्री सुभाष देसाई, राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील, उद्योग विभागाचे प्रधान सचिव अपूर्व चंद्रा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भूषण गगराणी आदी उपस्थित होते.

जगातील वाहन उत्पादनात आघाडीवर असलेल्या जनरल मोटर्स कंपनीने महाराष्ट्रात अधिकाधिक वाहनांची निर्यात करता यावी यासाठी पुणे जिल्ह्यातील तळेगांव येथील प्रकल्पाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ६४०० कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करण्याचे ठरवले आहे.

## तारांकित ★★★★★

### मुख्य सचिवांचे यश

आवड असेल तर सवड मिळतेच या उक्तीचा वस्तुपाठ राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी घालून दिला आहे. वयाच्या ५८व्या वर्षी त्यांनी एलएलबी पदवी उत्तीर्ण केली आहे. मुख्य सचिव म्हणजे राज्यातील सर्वात व्यस्त शासकीय अधिकारी. राज्याच्या अनेक घटनात्मक समित्यांचे ते प्रमुख आहेत. सर्व सचिवांच्या कामाचा आढावा घेण्याचे



काम त्यांना करावे लागते. मुख्यमंत्र्यांचे पथदर्शी प्रकल्प यशस्वी होण्यासाठी सातत्याने संनियंत्रण करावे लागते. त्यामुळे त्यांच्याकडे अत्यल्प वेळ उपलब्ध असूनही त्यांनी एलएलबीचा अभ्यास करून त्यात यश मिळवले. हे यश इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. स्वाधीन क्षत्रिय यांनी राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले असून लोकप्रशासन या विषयात एमफिल केले आहे. १९८० च्या बॅचचे आयएएस असणारे स्वाधीन क्षत्रिय हे तेव्हा राज्यातून पहिले आले होते. ते नेहमी म्हणतात,'ज्ञान मिळविणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून ज्ञानार्जन सातत्याने जगण्याला नवी उमेद देते.'

# मुंबई ते नागपूर सुसाट



महाराष्ट्राच्या दळणवळण क्षेत्रात क्रांतिकारी ठरू शकणाऱ्या व राज्याची राजधानी व उपराजधानी जोडणाऱ्या ८०० कि.मी. अंतराच्या नागपूर-अमरावती-औरंगाबाद-घोटी-मुंबई या नव्या दळणवळण द्रुतगती महामार्गाची (कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेस वे) घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली. सुमारे ३० हजार कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणारा हा महामार्ग २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचा निर्धारही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

राज्याच्या मागास भागांच्या विकासाची तहान भागविणारी योजना महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा महामार्ग ठरणार आहे. या निर्णयाचे विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील जनता स्वागतच करील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. सध्याच्या मुंबई-पुणे या द्रुतगती महामार्गाप्रमाणेच नवीन महामार्गावरही नियंत्रित प्रवेश (कंट्रोल्ड क्सेस) असेल. हा महामार्ग सहा पदरी असून पहिल्या टप्प्यात त्यातील चार पदरी मार्ग तयार केला जाणार आहे. ऑप्टिकल फायबर नेटवर्क, सीसीटीव्ही, वायफाय अशा संपर्काच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असल्याने हा मार्ग खऱ्या अर्थाने 'कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेस वे' ठरणार आहे. मार्गालगत ज्या ठिकाणी शक्य आहे अशा ठिकाणी माहिती तंत्रज्ञान उद्याने, स्मार्ट सिटी, शैक्षणिक संकुले उभारण्याचा शासनाचा मानस आहे. या मार्गामुळे नागपूर-मुंबई हा राज्याच्या राजधानी-उपराजधानी दरम्यानचा प्रवास १० तासांपर्यंत आणणे शक्य होईल. या मार्गाचे काम दोन टप्प्यांमध्ये केले जाणार असून पहिल्या टप्प्यात भूसंपादनासह चार पदरी रस्ता तयार केला जाईल. दुसऱ्या टप्प्यात सहा पदरी क्राँक्रीट रस्ता, आवश्यक तेथे सेवा रस्ते आणि महत्वाची शहरे-गावांजवळ बाह्यवळण रस्ते, भुयारी मार्ग, उड्डाण पूल आदी कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

# चिचपल्ली येथे बांबू संशोधन केंद्र



बांबूची शास्त्रोक्त लागवड आणि औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. बांबू प्रोसेसिंग, सेकंडरी बांबू प्रोसेसिंग, बांधकामासाठी बांबूचा उपयोग, बांबू हँण्डीक्राफ्ट वस्तुंची निर्मिती, बांबू फर्निचरची निर्मिती यासारख्या प्रशिक्षणाबरोबरच प्रशिक्षणार्थींच्या स्वंयरोजगारासाठी बांबू टर्निंग पॉईंट, फाइन बांबू प्रॉडक्ट हे अभ्यासक्रमदेखील येथे सुरू करण्यात येतील.

नुकतेच दोन गट यासाठी त्रिपूरा येथे प्रशिक्षण घेऊन आल्याचेही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. बांबूमध्ये हजारो हातांना रोजगार देण्याची क्षमता आहे हे लक्षात घेऊनच शासनाने हा निर्णय घेतला असून नुकतीच यासंबंधीची एक कार्यशाळा संपन्न झाली आहे.

## तारांकित

### परमवीरचक्रप्राप्त वीरांचे स्मारक

मुंबईतील महापालिकेच्या जागेतील बिर्ला क्रीडा केंद्रात परमवीरचक्रप्राप्त वीरांचे देशातील पहिले स्मारक उभारण्यात येत असल्याचे वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. राज्य अर्थसंकल्पात वित्तमंत्र्यांनी यासंबंधीची घोषणा केली होती. त्या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

यासाठी राज्य अर्थसंकल्पात ५ कोटी



रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे सांगून श्री. मुनगंटीवार म्हणाले की, देशासाठी आपल्या प्राणांची बाजी लावून लढणाऱ्या भारतीय सैन्यदलातील वीरांना परमवीर चक्र देऊन गौरविण्यात येते. अशा वीरांचे मुंबईत भव्य स्मारक असावे हा शासनाचा मानस राज्य अर्थसंकल्पातून व्यक्त करण्यात आला होता. यामुळे या शूरवीरांची ओळख महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील जनतेला विशेषत: विद्यार्थ्यांना होईल आणि अनेकांसाठी हे स्मारक स्फूर्तिस्थान ठरेल.

# स्वच्छतेची लोकचळवळ



**जालना येथे स्वच्छता अभियानात सहभागी झालेले राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर.**

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव लोणीकर हे लोकसहभागातून संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ करण्याबरोबरच जालना शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहेत.

जालना जिल्हा कायमस्वरूपी स्वच्छ व सुंदर करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. जालना शहरात आजमितीला जवळपास ५० हजार टन कचरा साठलेला असून तो दिवसेंदिवस वाढतच होता. नगरपालिकेमार्फत नियमितपणे शहराची साफसफाई जरी करण्यात येत असली तरी त्यांच्याकडे असलेले अपुरे मनुष्यबळ तथा यंत्रसामग्रीच्या अभावामुळे पाहिजे त्या प्रमाणात शहराची स्वच्छता होत नाही. या बाबीची पालकमंत्री लोणीकर यांनी गांभीर्याने दखल घेत लोकसहभागातून महास्वच्छता अभियान राबवण्याचा निर्णय घेतला. या अभियानासाठी शहरातील प्रत्येक नागरिकाने एक दिवस श्रमदान करून सहभाग नोंदवावा यासाठी वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडिया व चित्रपटगृहे या माध्यमातून जनतेला आवाहन करण्यात आले.

शहरात असलेल्या ५४ वार्डांमध्ये स्वच्छतेसाठी टीम तयार करण्यात आल्या. या टीममध्ये एका पर्यवेक्षकाच्या नियंत्रणाखाली ३० ते ४० लोकांचा सहभाग होता. या टीमला शहरातील विविध वार्ड स्वच्छतेसाठी विभागून देण्यात आले.या स्वच्छता अभियानामध्ये नगरपालिकेचे २८७ कर्मचारी, पोलीस प्रशिक्षण संस्थेतील व राज्य राखीव पोलीस दलातील असे ५६४ जवान, सामाजिक संस्था तसेच महिला बालविकास विभागाचे १४४ अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका ११९ , एनएसएस चे ५० विद्यार्थी यांच्यासह शहरातील विविध विभागाचे शासकीय अधिकारी, कर्मचारी, प्रतिष्ठित नागरिक, महिला, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी, बचतगटाच्या महिला असे जवळपास ४ ते ५ हजार नागरिक या महास्वच्छता अभियानात हिरिरीने सहभागी झाले व त्यांनी शहराची स्वच्छता केली.

# यूपीएससीच्या निकालात मुलींची बाजी

संघ लोकसेवा आयोगाच्या २०१४ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून पहिल्या चारही स्थानावर मुली आहेत. इरा सिंघलने देशातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला तर पुण्याची अबोली नरवणे राज्यात पहिली आली असून देशात ती ७८ व्या स्थानावर आहे. या परीक्षेत पहिल्या पाचमध्ये चार क्रमांकावर मुली आहेत. इरा सिंघल, रेणू राज, निधी गुप्ता आणि वंदना राव यांनी घवघवीत यश मिळवले. मुलांमधून सुहर्ष भगत पहिला आला असून देशभरातून पाचवा आला आहे. राज्यातील सुमारे शंभर उमेदवारांची निवड झाली आहे. पहिल्या शंभर उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील चार उमेदवारांना स्थान मिळाले आहे. महाराष्ट्रात अबोली नरवणे (७८), स्वप्नील ठेंबे (८४), अभिजीत शेवाळे (९०), अनिकेत पाटणकर (९२) आणि संदीप घुगे (१०५) यांनी पहिल्या पाच जणांमध्ये स्थान मिळवले आहे.

## तारांकित

### दुर्गा देवरेचे कौतुक...

चीनमधील वूहान येथे नुकत्याच झालेल्या जागतिक शालेय मैदानी स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारी दुर्गा देवरे हिचा क्रीडामंत्री विनोद तावडे यांनी आपल्या निवासस्थानी सत्कार करून तिचे कौतुक केले. दुर्गा देवरे हिने शालेय जीवनात संपादित केलेले हे यश कौतुकास्पद आहे. भविष्यातही दुर्गाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन यश संपादित करावे आणि 'भारताचा ध्वज जगाच्या नकाशावर



फडकवत ठेवावा', अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. या सत्काराच्या वेळी श्री. तावडे यांनी दुर्गाला क्रीडा क्षेत्रातील भावी करिअरसाठी शुभेच्छा दिल्या. दुर्गा देवरेचे चीनहून भारतात आगमन झाल्यानंतर तिने श्री. तावडे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. नाशिकची रहिवाशी असलेल्या दुर्गा देवरेने पंधराशे मीटरचे अंतर ४.३३.६६ मिनिटे या विक्रमी वेळेत पूर्ण केले. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदार्पणातच पहिले सुवर्णपदक मिळवून महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर झळकवले आहे. आगामी काळात महाराष्ट्राबरोबरच देशाच्याही तिच्याकडून अपेक्षा आहेत. दुर्गाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होईल असा विश्वास श्री. तावडे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी दुर्गाचे आई-वडील, भाऊ आणि इतर कुटुंबीय उपस्थित होते.

# हरित राजभवन




डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते राजभवन येथे झाला. यावेळी राज्यपालांनी आंब्याचे रोपटे लावून त्याला पाणी घातले. राज्यपालांच्या पत्नी विनोदा व नात रिया यांनीदेखील यावेळी आंब्याचे रोपटे लावले. या मोहिमेंतर्गत राजभवनात २०५ झाडे लावण्यात येणार आहेत.

अलीकडेच मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात आलेल्या वृक्षगणनेमध्ये राजभवनातील वृक्षांची संख्या ५५९० इतकी झाली असल्याचे आढळले होते. सन २००८ साली झालेल्या वृक्षगणनेनंतर येथील वनसंपदेत २५०० पेक्षा अधिक वृक्षांची वाढ झाल्याचे दिसून आले होते. नव्याने होत असलेल्या वृक्षारोपणामुळे त्यामध्ये आणखी वाढ होऊन राजभवन अधिक हरित होणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची मार्गदर्शिका



राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि त्यांच्या उत्तरांची चार पुस्तके प्रकाशित केली आहेत. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते राजभवनात त्यांचे नुकतेच प्रकाशन झाले. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली ही पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत वारंवार विविध प्रश्न संबंधितांच्या मनात उपस्थित होतात. या प्रश्नांचे अत्यंत सोप्या भाषेत निरसन करण्याचा प्रयत्न या पुस्तकांद्वारे केला आहे. महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद/पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणूक एफएक्यू अशी एकूण चार पुस्तके आहेत. आयोगाच्या http://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ही पुस्तके पीडीएफच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

## तारांकित

### मातामृत्यूचे प्रमाण कमी महाराष्ट्राला पारितोषिक

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केलेल्या प्रयत्नामुळे राज्यातील मातामृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. याचे फलित म्हणून केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. जे. पी. नड्डा यांच्या हस्ते राज्याला पहिले पारितोषिक प्रदान



करण्यात आले. शिमला येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राज्य शासनाच्या वतीने आरोग्य विभागाच्या प्रधान सचिव सुजाता सौनिक यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

विभागाच्या कामगिरीबद्दल बोलताना सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत म्हणाले की, मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने विदर्भातील मेळघाट येथे प्रायोगिक तत्त्वावर गरोदर मातांचा शोध घेतला. त्यांची बाळंतपणाची संभाव्य तारीख लक्षात घेऊन त्यांच्याबरोबर 'आशा' सेविकेला मदतीसाठी नियुक्त केले. डॉक्टरमार्फत गरोदर मातांची सोनोग्राफी, रक्तातील लोहप्रमाण, रक्तगट आदी बाबींची तपासणी करून त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यात आले. ज्या गरोदर मातांना रक्ताची आवश्यकता होती, त्यांना रक्त देण्याची सोय केली. त्यामुळे मेळघाट सारख्या आदिवासीबहूल दुर्गम भागात मातामृत्यूचे प्रमाण या महिन्यात शून्यावर आणण्याची किमया साध्य झाली. त्यामुळे मदर ट्रॅकिंग सिस्टिम आता राज्यभर लागू करण्याचा शासनाचा मानस आहे.

# ताडोबा पर्यटन



यंदा पावसाळ्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प पर्यटकांसाठी अंशत: सुरू ठेवण्याचा निर्णय वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला आहे. पावसाळ्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पर्यटन सुरू ठेवावे अशी मागणी पर्यटकांनी केली होती. मागील वर्षीदेखील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये अंशत: उपक्रम चालू होते. त्यामुळे यावर्षी पावसाळ्यात या व्याघ्रप्रकल्पात अंशत: पर्यटन सुरू ठेवण्यास हरकत नसल्याच्या शिफारसीसह प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर यांनी वनमंत्र्यांकडे पाठवला होता. त्यानुसार पावसाळ्यात या व्याघ्र प्रकल्पास भेट देणाऱ्या पर्यटकांना अंशत: पर्यटनाचा लाभ घेता यावा या दृष्टीने या प्रस्तावाला वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मान्यता दिली आहे.

# 'नागपूर आयआयएम'च्या पहिल्या सत्राचा शुभारंभ




'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची एक शाखा नागपूर येथे सुरू होत असून या संस्थेसाठी येत्या तीन वर्षात मिहान येथे सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. भविष्यात आयआयएम नागपूर ही संस्था देशातील सर्वोत्कृष्ट आणि अग्रगण्य संस्था म्हणून नावलौकिक मिळवेल,' असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आयआयएम नागपूर या संस्थेचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चिटणवीस सेंटर येथे आयोजित एका समारंभात झाले. आयआयएम नागपूर संस्थेच्या पहिल्या बॅचमध्ये देशातील ६० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून पहिल्या सत्राचा शुभारंभ झाला आहे.

या वेळी ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आयआयएम अहमदाबादचे संचालक आशीष नंदा, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय चहांदे, विभागीय आयुक्त अनूप कुमार, आयआयएमचे अधिष्ठाता प्रा. अजय पांडे आदी उपस्थित होते. नागपूर येथे भारतीय प्रबंधन संस्था सुरू व्हावी यासाठी केलेल्या प्रयत्नाला यश प्राप्त झाल्याचा आनंद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

## तारांकित

### उनिकी

विविध वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या विविध लेखांचे संकलन असलेल्या 'उनिकी'(अस्तित्व) या तेलुगू पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या प्रमुख उपस्थितीत हैद्राबाद येथे झाले.


राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे सार्वजनिक तसेच संसदीय जीवनातील योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. त्यांनी



आंध्र प्रदेश विधानसभेत मांडलेले व एकमताने पारित झालेल्या द्विभार्या प्रतिबंधक सुधारणा खासगी विधेयकामुळे बहुभार्यात्व (Bigamy) हा दखलप्राप्त गुन्हा झाला. तेलंगणा राज्य निर्मितीसाठी त्यांनी भरीव प्रयत्न केले. 'उनिकी' या पुस्तकातून विद्यासागर राव यांचा जीवनाकडे पाहण्याचा तत्त्वनिष्ठ दृष्टिकोन अधोरेखित होतो, असे गौरवोद्गार राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी काढले. आपल्या भाषणात राष्ट्रपती म्हणाले की, सन १८८५ साली काँग्रेसचे अध्यक्ष असलेले व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्यापासून तर पट्टाभी सिताराम यांच्यापर्यंत बहुतेक काँग्रेस अध्यक्षांनी राजकीय लिखाण केले होते. हे लिखाण आपल्याकरिता आज बहुमोल ठेवा झाले आहे. अशा प्रकारच्या लिखाणातून तत्कालीन सामाजिक व राजकीय घडामोडींवरील त्या नेत्यांचा दृष्टिकोन दिसून येतो, असे सांगून राष्ट्रपतींनी श्री. विद्यासागर राव यांना यापुढेही लिखाण सुरू ठेवण्याची सूचना केली.




# सिंहस्थाचे ध्वजारोहण



नाशिक येथील कुंभपर्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आयुष मंत्री श्रीपाद नाईक, जगदगुरू हंसदेवाचार्यजी महाराज, जगदगुरू नरेंद्राचार्यजी महाराज, महंत ग्यानदास महाराज आदींच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर सुरुवात झाली. या कुंभाचे नाव सिंहस्थ कुंभ असले तरी तो 'हरितकुंभ' म्हणून ओळखला जावा, यासाठी शासनाबरोबरच सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा महापर्वाचा प्रारंभ केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंह यांच्या उपस्थित झाला.









नाशिक त्र्यंबकेश्वर

सिंहस्थ कुंभमेळा

२०१५ - २०१६











# ओळख पुण्याची: पगडी अभिमानाची

कीर्ती पांडे

अगदी पुरातन काळापासून भारतात पगडी बांधली जाते. पगडीचा अगदी सर्वप्रथम उल्लेख आढळतो तो अथर्ववेदात. तेव्हा पगडीला अर्थातच उष्णीय म्हटले जायचे. भारतातील प्राचीन शिल्पांमध्येही माणसांच्या डोक्यावर विविध प्रकारच्या पगड्या बांधलेल्या दिसतात. देवांच्या डोक्यावर मुकुट तर गंधर्व आणि किन्नरांच्या डोक्यावर पगड्या घालून त्यांचे वेगळेपण या शिल्पांतून दाखवले आहे.

### पगडीची नवी रूपे

डोक्याचे रक्षण हाच पगडीचा मुख्य उद्देश असला तरी बदलत्या सामाजिक परिस्थितीने या पगडीला अनेक नवी रूपे तसेच आयाम दिले. प्राचीन काळी समाजातील प्रतिष्ठा, मानसन्मान आदी अधिकारानुसार पगडी बांधण्याच्या वेगवेगळ्या पद्धती होत्या. प्रसंग, सणवार, घटना यानुसार पगड्यांचे रंगही बदलत असत. महाराष्ट्रात विविध प्रकारच्या पगड्या प्रचारात होत्या. या पगड्यांनी आपले वैशिष्ट्य आधुनिक काळात जपले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जिरेटोप ही एक प्रकारची पगडीच होती. पगडी बांधण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने अनेक मराठी सरदारांची नावेही या पगड्यांना मिळाली. शिंदेशाही, होळकरी, गायकवाडी, पेशवाई अशा विविध घराण्यांनुसार पगड्यांचे प्रकार पडले. चक्री पागोटे हा अजून एक प्रकार अस्तित्वात होता. चक्री पागोटे म्हणजे गोल गोल चक्रासारखी पगडी. या पगडीला भला मोठा व्यास असायचा. गावातली विद्वान, प्रतिष्ठित मंडळी असे चक्री पागोटे वापरत असत.

### सामाजिक स्थानानुसार पगड्या

व्यक्तीच्या सामाजिक स्थानानुसार पगड्या बांधल्या जाऊ लागल्याने पगडी म्हणजे प्रतिष्ठा असे समीकरण रूढ झाले. यामुळेच हिंदीमध्ये पगडी उछालना सारखे वाक्प्रचार रूढ झाले. काळ बदलला तसा पगडीचा वापर कमी झाला पण म्हणून त्यांचे महत्त्व कमी झाले नाही. या पगड्या आजही त्यांचे वैशिष्ट्य जपून असल्याने त्या महाराष्ट्राची ओळख ठरल्या आहेत. पुणेरी पगडी या प्रकाराला जिओग्रॉफिक इंडिकेशन २०१३ ला मिळाले. लोकमान्य टिळक, आगरकर जी पगडी वापरत ती पगडी आता पुणेरी पगडी म्हणून ओळखली जाते, असे गिरीश भुरूडकर यांनी सांगितले. पुण्याच्या बुधवार पेठेतले मुरूडकर झेंडेवाल्यांचे हे दुकान गेल्या तीन पिढ्यांपासून पगडीच्या व्यवसायात आहे.





पुणेरी पगडीचे वैशिष्ट्य सांगताना ते म्हणाले, दीड-दोनशे वर्षांपूर्वी पुण्यामध्ये बुधवार पेठेत आज जिथे त्यांचे दुकान आहे, त्या परिसरात कित्येक पारंपरिक पगडबंद व्यावसायिक होते, ज्यांचा पगडी बांधणे हाच व्यवसाय होता.





### पेशवाई पगडी

आज जी पुणेरी पगडी मिळते ती तयार स्वरूपात असते, पण पूर्वी ती बांधली जायची. यासाठी प्रत्येक गावातल्या बारा बलुतेदारांमध्ये एक कोष्टी समाजाचा प्रतिनिधी असायचा आणि तो घरोघरी जाऊन दर आठ दिवसांनी ही पगडी बांधायचा. आज सॅटीन, सिल्कसारख्या चमकणाऱ्या कपड्यांमध्ये या पगड्या बनत असल्या तरी सुरुवातीला बली नावाचे चार इंच रुंद असलेले सुती कापड यायचे, या कापडाला गुडघ्याभोवती गुंडाळून

**लोकमान्य टिळक, नामदार गोपाळ गणेश आगरकर, न्या. महादेव गोविंद रानडे यांचे नाव घेतले की, नेमके काय आठवते सांगा? बरोबर ! पगडी ! भारतीय पेहरावाचा अविभाज्य घटक असलेली ही पगडी प्रत्येक प्रांतातील हवामान आणि भौगोलिक, आर्थिक स्थितीनुसार व बांधण्याच्या पद्धतीप्रमाणे पटका, फेटा, पागोटे, पगडी अशा विविध नावाने प्रचारात आली मात्र एखाद्या गावाची ओळखच पगडीने होण्याचे भाग्य पुण्याला मिळाले.**





पगडी तयार केली जायची. कापडाचे पट्टे सरळ गुंडाळून सपाट मोठा घेर असलेली आणि मध्यभागी उंचवटा असलेली पगडी बांधली जायची. विसाव्या शतकात या पगडीचा घेर थोडा कमी झाला आणि तिला आजचे स्वरूप प्राप्त झाले. आजची पुणेरी पगडी ही पेशवाई पगडीचेच थोडे बदलेले रूप आहे. पगडीचा हा प्रकार १९ व्या शतकात अधिक लोकप्रिय होता. महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, जे. एस. करंदीकर, डॉ. डी. डी. साठ्ये, तात्यासाहेब केळकर, दत्तो वामन पोतदार ही काही समाजप्रिय व्यक्तीमत्त्वे ही पगडी नेहमी वापरीत.



आजच्या पगडीचे वैशिष्ट्य सांगताना गिरीश मुरुडकर म्हणाले, ''आज पगडी बांधावी लागत नाही तर ती तयार स्वरूपात असते. कागदाच्या लगद्यापासून आधी मोल्ड तयार केला जातो आणि मग त्यावर कापडाच्या पट्ट्या आणि जरी गुंडाळून पगडी तयार करतात. सारेच काम अतिशय बारकाईने आणि कुशलतेने करावे लागते. यात चूक झाली तर आतला मोल्ड पापडासारखा कडक होतो आणि पगडी डोक्यात नीट बसत नाही. पगडी बांधण्याचे हे काम तसे वेळखाऊ आहे. त्यामुळे दिवसाला साधारणपणे दोन पगड्या तयार होऊ शकतात.

पगडीची एक आणखी आठवण मुरुडकर सांगतात,'' ती म्हणजे ब्रिटनचे प्रिंस चालर्स यांच्या विवाहानिमित्त मुंबईच्या डबेवाल्यांनी त्यांना मराठी पद्धतीने अहेर करायचे ठरवले. यात या पुणेरी पगडीचा समावेश होता.

आजही ही पुणेरी पगडी ब्रिटनच्या प्रिन्सच्या संग्रहात आहे. हे सांगताना त्यांचा चेहरा अभिमानाने फुलून गेला होता.

### पगडीचा रुबाबदारपणा

पुणेरी पगडीच्या रुबाबदारपणाचा मोह गणपती बाप्पालाही झाला त्यामुळेच दगडूशेट हलवाई मंदिराच्या विश्वस्तांनी गिरीश मुरुडकरांना बाप्पासाठी ३-४ प्रकारच्या पगड्या बनवायला सांगितल्या होत्या. यातून जय गणेश, शिवशंभो, मयूर, पुणेरी, शिंदेशाही अशा पगड्या बाप्पासाठी बनवण्यात आल्या आणि बाप्पाचे हे नवे रूप भक्तांना अधिकच भावले.

पुणेरी पगडी आता रोज घालणारे कुणी दिसत नाहीत पण या पगड्यांचे आकर्षण आजही तरुण पिढीला आहे. फिलाडेल्फिया इथे झालेल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला पुण्याहुन पगड्या गेल्या होत्या. परदेशातल्या गणेश मंडळाकडून पुणेरी पगड्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आपल्याकडेही तरुण मंडळींची पसंती पुणेरी पगड्यांना असतेच. लग्नसमारंभात पुणेरी पगडी घातलेला नवरदेवही अलीकडे बघायला मिळतो. पुणेरी पगडीचे हे बदलेले स्वरूप अभिमान वाटावा असेच आहे.

### पगडीचे वैशिष्ट्य

भारतीय पेहरावाचे पगडी हे एक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक राज्यात वेगवेगळया पद्धतीने पगडया बांधल्या आणि घातल्या जातात. उत्तरप्रदेश, राजस्थान, मारवाड इथे तर पगडी फार प्रतिष्ठेची समजली जाते.

- पुणेरी पगडी घालायची कशी ?

पुणेरी पगडीला एका बाजूने जरीचा गोंडा लावलेला असतो. ही पगडी घालताना वरचा उंचवटा दोन्ही डोळ्यांच्या मध्ये आणि जरीचा गोंडा उजव्या डोळ्याच्या बरोबर वर येईल अशा पद्धतीने घालावी लागते.

- पुणेरी पगडीला जीआय स्टेटस क्लास २५ या सदराखाली मिळाले आहे. या सदरामध्ये साधारणपणे वेशभूषा, पादत्राणे, शिरोभूषण इ. प्रकारची भौगोलिक वैशिष्ट्ये लक्षात घेतली जातात. श्री पुणेरी पगडी संघाने पुणेरी पगडी या प्रकाराला जी आय ३ इंडीकेशन मिळावे यासाठी प्रयत्न केले.

१९ व्या शतकात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, जे. एस. करंदीकर, तात्यासाहेब केळकर, दत्तो वामन पोतदार यांसारख्या समाजप्रिय व्यक्तींच्या वेशभूषेत पुणेरी पगडीला स्थान होते.

- भारताच्या इतर प्रांतातही विविध प्रकारच्या पगड्या प्रचलित होत्या. कारण राजे रजवाडे त्यांच्या आवडीप्रमाणे वेगवेगळया प्रकारच्या पगड्या बनवून घेत आणि त्या समाजात, त्या राजांच्या नावाने लोकप्रिय व्हायच्या. जसे जोधपुरी, मेवाडी, करौली, फतेशाही, सलीमशाही, गजशाही, भीमशाही मुस्लीम राजे सरदारही वैशिष्ट्यपूर्ण पगड्या बांधत. या पगड्या तलम रेशमी कापडापासून बनवल्या जात. शिवाय या पगड्यांना हिरे, माणके लावून सुशोभित केले जात असे.

संपर्क: ०९५९४९४४८००

# किल्ले शिवछत्रपतींचे

**शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत अनेक किल्ले नव्याने बांधले गेले. फक्त सह्याद्रीतच नव्हे तर कोकण किनाऱ्यावर आणि समुद्रातही किल्ले बांधण्यात आले. सह्याद्रीच्या मुख्य रांगेवर किल्ले बांधण्यामागाचे मुख्य कारण म्हणजे कोकण व देश यांना जोडणाऱ्या घाटमार्गांवर लक्ष ठेवणे, कर जमा करणे आणि शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवणे, हे प्रमुख उद्देश होते.**

शिवाजी महाराजांच्या उभ्या आयुष्यात त्यांचा संबंध कायमच गड किल्ल्यांशी येत होता. महाराजांचा जन्मदेखील शिवनेरी या किल्ल्यावर आणि मृत्यूदेखील रायगड या किल्ल्यावरच झाला. या त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी अनेक गडकिल्ले जिंकून घेतले. महाराजांनी जास्तीत जास्त किल्ल्यांची पुनर्बांधणी केली. बरेचसे किल्ले बेवारस पडलेले होते, त्यांची दुरुस्ती करवून स्वराज्यात सामील करून घेतले.

मोहनगड या किल्ल्याच्या दुरुस्तीच्या संदर्भात महाराजांनी अफजलखान वधाच्या अंदाजे सहा महिने आधी बाजीप्रभू देशपांडे यांना पत्र लिहिले होते. पत्रामध्ये असा उल्लेख होता की 'मोहनगड उर्फ जासलोडगड हा हिरडस मावळमध्ये आहे, तो ओस पडला आहे, त्याची डागडूजी करून घ्यावी, तेथे २५ माणसे ठेवावीत, किल्लेदाराला घर बांधून द्यावे' असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. सह्याद्रीतील तुंग, लोहगड, कोरिगड, यासारख्या गडकिल्ल्यांचे बांधकाम अहमदनगरची निजामशाही आणि विजापूरची आदिलशाही यांच्या काळात झाले. नंतर निजामशाहीच्या अस्तानंतर त्यांचे काही किल्ले आदिलशाहीत समाविष्ट झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी साम्राज्याचा उदय झाल्यावर त्यांनी निजामशाही व आदिलशाहीतील अनेक किल्ले जिंकून घेतले. तसेच जे किल्ले बेवारस पडलेले होते त्यांचा स्वराज्यात समावेश केला. याच किल्ल्यांनी छत्रपतींना अनेक लढ्यांमध्ये मोलाची साथ दिली.

डॉ. सचिन जोशी

### स्वराज्याची राजधानी

शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या लढ्याची सुरुवात करण्यापूर्वी शहाजीराजांकडे पुणे, सुपे, चाकण व इंदापूर असे चार परगणे होते. शिवाजी महाराजांनी प्रथम बारा मावळाचा प्रदेश व तेथील किल्ले घेण्यास सुरुवात केली. यादरम्यान गुंजण मावळातील राजगड हा महत्त्वाचा किल्ला महाराजांनी घेतला. याच किल्ल्याची त्यांनी स्वराज्याच्या राजधानीसाठी निवड केली. राजगडावर तीन माच्या व अनेक दरवाजे बांधून घेतले. आज जेव्हा आपण या किल्ल्यांचा अभ्यास करतो तेव्हा हे कळून येते की महाराजांनी किल्ले बांधताना तेथील भूरचना व त्याचे संरक्षण या दृष्टीने असलेले महत्त्व याचा निश्चितच अभ्यास केलेला होता.

### रायगड

जावळीच्या मोऱ्यांचा पराभव केल्यानंतर महाराजांनी जावळी परिसरात किल्ला बांधण्याचे निश्चित केले. पार या गावाजवळ भोरप्या नावाचा एक उंच डोंगर होता. मोरोपंत पिंगळे यांना त्याठिकाणी किल्ला बांधण्याचे आदेश महाराजांनी दिले. महाराजांनी बांधलेला सर्वात उत्तम किल्ला म्हणजे रायगड. हा किल्ला बांधण्याची जवाबदारी महाराजांनी हिरोजी इंदुलकर यांना दिली होती. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे गडावर तलाव, सदर, वाडे, दरवाजे, रस्ते यांचे बांधकाम हिरोजींनी केले. तसा उल्लेख रायगडावरील जगदीश्वर मंदिराबाहेरील शिलालेखात केलेला आहे. शांताराम विष्णू आवळसकर यांच्या पुस्तकामध्ये रायगडावरील बांधकामांची माहिती असलेला शिलालेख आहे.

या शिलालेखावरून रायगड किल्ल्यावर कोणकोणती बांधकामे केली गेली होती याची माहिती मिळते. रायगड बांधताना आणि इतर किल्ले उभे करताना महाराजांनी निश्चितच वेगवेगळा विचार केला असावा. कारण रायगड हे राजधानीचे ठिकाण असल्याने त्याला नैसर्गिक आणि कृत्रिम असे दोन्ही प्रकारचे संरक्षण असणे गरजेचे होते. याशिवाय तेथे सदर, अंबरखाना, कोठारे, वसाहती, मंत्र्यांचे वाडे, धार्मिक वास्तू, तलाव, मनोरे, इ. बांधकामे करणे आवश्यक होते. पण इतर किल्ल्यांवर एवढ्या प्रकारच्या वास्तूंची गरज नव्हती. त्यामुळे इतर किल्ल्यावर तेथील गरजांनुसार वास्तू उभ्या केल्या गेल्या. उदाहरणार्थ लिंगाणा, सोनगड, वासोटा, भैरवगड यासारख्या किल्ल्यांवर कैदी ठेवले जायचे त्यामुळे तेथील वास्तू व बांधकामे भव्य नव्हती. सोनगिरी, मुडागड, शिवगड, नृसिंहगड, कावळ्या हे अगदी छोटे आणि चौकी नाक्याचे किल्ले होते.

**महाराजांच्या काळात मराठ्यांचे राज्य किती दूरवर पसरले होते त्याबद्दल सभासद बखरीत नोंद आहे.**
**ती अशी,**
**''आपले राज्य सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदीअलीकडे कुल देश वरघाट तळघाट तुंगभद्रा पोवेतो हा एक प्रांत, व तुंगभद्रे पलीकडे देखील कोल्हार, बाळापूर, चांदी, एलूर सारङ कावेरी पोवेतो हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून राज्य आहे.''**

विजयदुर्ग




रायगड


लिंगाणा


राजगड






त्या परिसरातील हालचालींवर नजर ठेवायला आणि तेथील लोकांना संरक्षण देण्यासाठी हे किल्ले बांधले होते. त्यामुळे साहजिकच या किल्ल्यांवर तटबंदी व दरवाजे वगळता पक्की बांधकामे नव्हती.

### वैशिष्ट्यपूर्ण जलदुर्ग

महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यामध्ये सर्वात वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम हे जलदुर्गांचे होते. त्यांनी कुरटे, कासा, खांदेरी या बेटांवर अनुक्रमे सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग व खांदेरी हे किल्ले बांधले. हे किल्ले बांधत असताना त्यांच्याकडे अशा प्रकारे बेटांवर किल्ले बांधण्याचा कोणताही अनुभव नव्हता. तरीदेखील त्यांनी बांधलेले किल्ले आज ३५० वर्षानंतरदेखील समुद्राशी झुंज देत उभे आहेत.

शिवाजी महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत बांधलेल्या किल्ल्यांची यादी सभासद बखरीमध्ये दिलेली आहे. पण त्या यादीमध्ये एकाच किल्ल्याची तीन वेगवेगळी नावे येतात. तसेच इतर ऐतिहासिक कागदपत्रातील नोंदीनुसार काही किल्ले पूर्वीच अस्तित्वात होते अशी माहिती मिळते. तरीदेखील महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत अंदाजे १०० किल्ले बांधले असण्याची शक्यता जास्त आहे. हे सर्व किल्ले बांधताना त्यांनी अवास्तव खर्च करून किल्ल्याची उभारणी केली नाही. किल्ल्यावर ज्या ठिकाणी कातळकडे आहेत तेथे त्यांनी तटबंदी बांधलेली नाही. ज्या डोंगरावर किल्ला बांधायचे निश्चित केले त्या डोंगरांच्या घळी, उतार, कातळकडे, नाळ, पाण्याच्या वाटा यांचा पुरेपूर वापर करून ते किल्ले अभेद्य बनविले. गोमुखी किंवा एडक्याच्या शिंगासारख्या आकाराच्या दरवाजाची बांधणी हे या दुर्गबांधणीचे वैशिष्ट्य ठरले.

### दक्षिणेतील किल्ले

शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयादरम्यान कर्नाटक, तामिळनाडू या प्रांतातदेखील काही गड वसविले. साजरा, गोजरा, या किल्ल्यांव्यतिरिक्त शारंगगड, मदोन्मत्तगड, कृष्णगिरी असे ७९ किल्ले महाराजांनी बांधल्याचा सभासद बखरीत उल्लेख आहे. या बखरीतील नोंदींप्रमाणे महाराजांच्या कारकिर्दीत त्यांनी जिंकलेले किल्ले व महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व तामिळनाडू या भागात बांधलेले किल्ले यांची संख्या २४० आहे. प्रत्यक्षात ही संख्या ३०० च्या आसपास असावी असे इतर बखरी व शिवकालीन पत्रव्यवहारातून लक्षात येते.

शिवाजीमहाराजांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी एवढे किल्ले बांधूनही कधीही कोणत्याही किल्ल्यांवर आपले नाव लिहुन ठेवले नाही. महाराजांनी नव्याने बांधलेल्या, जिंकलेल्या आणि दुरुस्त केलेल्या अनेक किल्ल्यांचा वापर जवळ जवळ पुढे ५० वर्षे झाला. याच गडकिल्ल्यांच्या आधारावर मराठी साम्राज्य उभे राहिले.

(लेखक डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)
**संपर्क :** ०९८२२१०९३६२

# पावसाळ्यातील आजार

पावसाळा आला रे आला, की मग हळूच चाहुल लागते ती पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या रोगांची. पावसामुळे वातावरणात तत्काळ झालेल्या बदलांमुळे रोगराईला बळी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



डॉ. महेश पुरी

पावसाळ्यातील काही प्रमुख आजार म्हणजे मलेरिया, कावीळ, तसेच अतिसार, टायफॉइड त्याचबरोबर सर्दी, खोकल्यासारखे गोड पाहुणेही सोबतीला असतातच. लेप्टोस्पायरोसिस व डोळे येण्याचे प्रमाणही साथीच्या रूपात याच काळात दिसून येते.

साधारणत: पावसाळ्यात मसालेदार, तळलेले आणि चरबीयुक्त खाणे टाळावे आणि खाण्याची मात्राही कमी असावी, जेणेकरून मंदपणा कमी जाणवेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

पाण्याला झालेला जंतुसंसर्ग आणि अस्वच्छता हे पावसाळ्यातील आजारांचं प्रमुख कारण आहे. तसेच आर्द्रता वाढल्याने त्वेचेचे रोग, संधिवात आणि दम्यासारखे आजार बळावतात.

केसांच्या बाबतीत काळजी घेताना शॅम्पू आणि त्यानंतर कंडिशनर वापरणे फार गरजेचे आहे. त्यामुळे केसांच्या मुळाशी जमा झालेली माती साफ होऊन कोंडा होण्याचा धोका टळतो. तसेच वाढलेल्या आर्द्रतेमुळे केसांना लावले जाणारे तेल टाळावे.

पाण्यामुळे होणारे आजार टाळण्यासाठी पाणी उकळूनच प्यावे. न उकळलेले आणि न गाळलेले पाणी पिणे, यासारखे पावसाळ्यातील आजाराला दुसरे निमंत्रण नाही. यादरम्यान साखरेचा आजार असणाऱ्या रुग्णांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. या रुग्णांनी कुठल्याच परिस्थितीत अनवाणी पायांनी चालू नये. कारण पावसाळ्यात जखम झाल्यास ती चिघळण्याची शक्यता जास्त असते.

**लक्षणे आणि उपचार**

**मलेरिया :** मादी नोफिलिस डासामुळे होणारा आजार

**लक्षणे :** ठरविक अंतराने येणारा थंडीताप, कमजोरी, अंगदुखी

**आजार टाळण्याचे उपाय :** मच्छरदाणी, डासांना मारणारे औषध व त्यांना दूर ठेवणारे क्रिम, डी.डी.टी. इत्यादी

**कॉलरा :** जंतूजन्य अन्न व पाण्यामुळे होणारा आजार

**लक्षणे :** तांदळाच्या पाण्यासारखी पातळ हगवण (प्रमूख लक्षण) क्वचित उलटी व अंगदुखी

**आजार टाळण्याचे उपाय :** लसीकरण (सहा महिन्यांसाठी परिणामकारक) स्वच्छ पाणी, उकळलेले पाणी पिणे.

**टायफॉइड :** जंतुजन्य अन्न व पाण्यामुळे होणारा आजार

आजार बरा झाल्यावरही गाल ब्लॅडरमध्ये (पित्ताशय) या रोगाचे जंतू राहत असल्याने धोकादायक आजार

**लक्षणे :** खूप काळ व जास्त ताप, पोटदुखी व डोकेदुखी

**आजार टाळण्याचे उपाय :** रुग्णाला त्याच्या घरातील लोकांपासून वेगळे ठेवणे

- शक्यतो आजार होण्याची शक्यता असल्यास आधीच लस घेणे
- रुग्णास भरपूर पाणी देणे
- दोन आठवड्यात पुन्हा उलटण्याची शक्यता असल्याने व्यवस्थितपणे काळजी घेणे आवश्यक

## अशी घ्या काळजी

- पावसाळ्यात अगदी सुरुवातीला प्राथमिक गरजेच्या गोष्टी ज्या सोबत बाळगाव्यात त्या म्हणजे छत्री/रेनकोट, मोठी पाण्याची बाटली व थंडीपासून बचावासाठी शाल/चादर. ह्या गोष्टी प्रवासात किंवा अगदी साधे बाहेर फिरून येतानासुद्धा सोबत असाव्यात.
- पावसात भिजणे या आनंदाला उपमा नाही, पण नेहमी नेहमी भिजल्याने रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊन सर्दीपडशाने व इतर बारीकसारीक आजाराने त्रास होऊ शकतो. त्यासाठी प्रवासात औषध बाळगल्यास उत्तमच. डॉक्टरांच्या सल्ल्याने सगळ्या औषधाचा एक संच बनवून ठेवल्यास वेळेवरची धावपळ वाचेल.
- पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे खूप सारे आजार बळावतात. त्यामुळे प्रवासात व शेतात घरचे पाणी घेऊन जावे.
- नाला, ओढा किंवा विहिरीचे पाणी दूषित असू शकते. गावातील विहिरीचे शुद्धीकरण करून घेण्याची जबाबदारी सरकारची असते. त्यामुळे पावसाळ्याच्या अगदी सुरुवातीला आणि त्यानंतर योग्य अंतराने जलसुरक्षकाकडून विहिरींचे नियमित शुद्धीकरण होईल याची काळजी घ्यावी.
- पाण्यात क्लोरिनची योग्य मात्रा घालून त्यानंतर पाण्याची क्लोरिनची मात्रा तपासून शुद्धतेची पारख करणे जरुरी ठरते. तसेच गावात उघड्यावर शौचास बसू नये व इतरांना बसू देऊ नये. जेणेकरून पाण्याचे दूषितीकरण टळेल.
- परिसरात नाले व डबके साचू न देता आठवड्यात एक कोरडा दिवस पाळावा. असे केल्याने डासांच्या अळ्या पाण्यामध्ये होणार नाहीत आणि मलेरियासारख्या आजाराचा नायनाट व्हायला मदत होईल.
- कोरड्या दिवशी पिण्याच्या पाण्याची सर्व भांडी धुऊन पुसून कोरडी केली पाहिजेत. सांडपाण्यासाठी शोषखड्डा व परसबाग निर्माण करावी. तसेच आजारी व्यक्ती, लहान मुले आणि वृद्धांना जंतुसंसर्ग टाळण्यासाठी उकळलेलेच पाणी द्यावे.
- विहीर, तळे यांच्याजवळ कपडे-भांडी धुऊ नये व चिखल होऊ देऊ नये. तुंबलेले पाणी लगेच वाहते करावे.
- साथीचे आजार बळावल्याची चिन्हे दिसू लागताच लगेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचित करावे. त्याचप्रमाणे गावातील 'आशा' आरोग्यसेविका, ग्रामसेवक व जलसुरक्षक यांनाही साथीची सूचना द्यावी. साथरोगाची लागण टाळण्यासाठी क्लोरिनयुक्त पाणी वापरावे. अनोळखी तथा नवीन विहीर अथवा अन्य स्रोताचे पाणी त्याच्या शुद्धतेची खात्री झाल्याशिवाय पिऊ नये. त्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्याची मदत घ्यावी.

# निरामय

**कावीळ (हिपेटायटीस ए) :** माशांमुळे पसरणारा आजार

**लक्षणे :** उच्च ताप, उलट्या, सांधेदुखी, डोकेदुखी

**उपाय :** लसीकरण (अत्यंत महत्त्वाचे) जास्त कर्बोदके असणारा आहार, चरबीयुक्त व तेलयुक्त पदार्थ टाळावे.

**सर्दी :** सर्वाधिक होणारा आजार

**लक्षणे :** सर्दी खोकला व ताप

**उपाय :** पावसात भिजणे टाळावे. शक्य नसल्यास भिजल्यावर अंग कोरड्या कपड्याने पुसून घ्यावे.

– एअर कंडीशनर सामान्य तापमानावर ठेवावा व आइसक्रीम व इतर थंड पदार्थ टाळावे.

– सर्दी झाल्यास हळद घालून कोमट दूध पिणे आरोग्यास उत्तम

– मीठ घालून कोमट पाण्याने गुळण्या केल्याने घशाला आराम मिळतो.

**पावसाळ्यात पूर, अतिवृष्टी घरांची पडझड, वीज पडणे तथा घातक परिस्थिती उद्‌भवल्यास आरोग्य अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी किंवा संबंधित अधिकाऱ्यांना सूचित करून मदतकार्यास हातभार लावणे, हे प्रत्येक जबाबदार नागरिकाचे कर्तव्य ठरते. स्वच्छतेच्या बाबतीत भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात योगदान देऊन व स्वच्छता बाळगून या पावसाळ्यात आपण विविध संसर्गजन्य आजारांना आपल्यापासून दूर ठेवू शकतो.**



**पावसाळ्यात दूषित पाण्यापासून होणारे आजार जास्त संभवतात. त्यामुळे उकळलेले पाणी पिणे हितावह असते.**

**पावसाळ्यात लेप्टोसारख्या जंतूचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होत असल्याने बाहेरून आल्यानंतर हात स्वच्छ पाण्याने धुवावे.**





**काही कारणाने सर्दी झाली तर शिंकताना नाका-तोंडासमोर कपड्याचा वापर करावा आणि अशा कपड्यांचे निर्जंतुकीकरण करावे.**

(लेखक हे जे.जे. रुग्णालयात
निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)
**संपर्क :** ०९३३०११६१८७



# ढगांसोबत ट्रेकिंग

**सह्याद्री हा महाराष्ट्राचा खजिना आहे. दोन्ही हातांनी आनंद भरभरून देणारा सह्याद्री पावसाळ्यात तर निसर्गप्रेमींना साद घालत असतो. उंचावरून धबाबा कोसळणारे धबधबे, चिखलाने माखलेल्या पायवाटा आणि डोंगरावर उतरलेले ढग दगडमनाचे रूपांतर कविमनात करून जातात. पावसाळ्यात बहुतेक जंगलांतील प्रवेश निषिद्ध केलेला असतो अशावेळी तरुणाईचे पाय वळतात ते डोंगरांच्या शिखरांकडे. महाराष्ट्रात असे अनेक किल्ले आहेत जे ट्रेकिंगचाही अनुभव देतात. पुणे जिल्ह्यातील लोहगड पावसाळ्यात अंगावर पांढरेशुभ्र वस्त्र घेऊन हटयोग करणाऱ्या योग्यासारखा भासतो. येथे ढग मुक्कामाला उतरतात असे वाटून जाते.**

प्रवीण कुलकर्णी

पावसाळ्यात ट्रेकिंगचा आनंद घ्यायचा असल्यास लोहगडसारखा चांगला पर्याय नाही. जवळच्या नातेवाईकांशी फटकून राहणाऱ्या पाहुण्यासारखा लोहगड लोणावळ्याशी आपले नाते सांगतो. मुंबईहुन निघाल्यावर लोणावळ्याच्या पुढचे स्थानक म्हणजे मळवली. लोहगडला जाण्यासाठी येथे उतरावे लागते. भुरभुरणारा पाऊस समोर मळवली गावचा रस्ता आणि नजर वर केल्यावर दिसणारा लोभसवाणा लोहगड.

लोहगडाच्या रस्त्यावरच भाजे लेणी आहेत. प्रोफेशनल गिर्यारोहकांसाठी लोहगडची चढण फारशी वाटणार नाही, मात्र तुम्ही जर पहिल्यांदाच ट्रेकिंग करत असाल तर पाय भरून येतात. लोहगडावर जाण्यापूर्वीची ही चढण चढणे यातच खरी गंमत आहे. गडाच्या पायथ्यापर्यंत आता गाडी जाऊ शकते आणि डांबरी रस्ताही आहे. पण या डांबरी रस्त्याला वाकुल्या दाखवत पायवाटेनेच जाण्यात खरा आनंद आहे. निसर्गाची सभोवताली गर्द हिरवाई, अंगावर सरसरून येणारा पाऊस आणि पायाखाली चिखल असलेला रस्ता हा आनंद शब्दात व्यक्त करणे अशक्यच.

एकदा पायथ्याशी आलात की वर गडावर जायला पायऱ्या आहेत. साधारण दीडशे पायऱ्या असाव्यात. या पायऱ्या चढताना आपण किती उंचावर आलो आहोत याची जाणीव होते. निसर्गाचा ठेवा आपल्या नजरेखाली असतो. इथून तुंगा-तिकोना आणि तिकोना डॅमदेखील पाहता येते. एक-एक पायरी चढत गडाजवळ गेल्यावर दुखणारे पायही आपले श्रम विसरून जातात आणि आपणच गड जिंकलो असा आनंद होतो.

गडाला एकूण पाच दरवाजे आहेत. त्यातील गणेश दरवाजा हा प्रमुख. नारायण आणि हनुमान दरवाज्यातून खाली जाता येते. किल्ल्यावर एक दर्गा आणि एक देऊळ आहे. इथे पाण्याची बारमाही टाकी आहे. त्यातील पाणी अजूनही पिऊ शकतो. नाना फडणवीस यांनी बांधलेला सोळा कोनी मोठा तलावदेखील गडावर आहे. पण या तलावाचे पाणी आता

वापरात नाही. पूर्वी गडावर राहणाऱ्या लोकांची सोय म्हणून या तलावाच्या पाण्याचा वापर होत असावा.

### विंचूकाटा माची....

लोहगडावरचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे विंचूकाटा माची... विंचूकाट्यावर जायचे हेच ठरवून आम्ही घरातून बाहेर पडलो होतो. चिंचोळी वाट, पावसाने निसरडे झालेले रस्ते आणि माणसांवर कोणत्याही क्षणी हल्ला करू शकतील अशी धीट माकडे. पावसाची जोरदार सर आली तर अंगावर शेकडो बाण जोराने टोचताहेत याचा अनुभव यामुळे विंचूकाट्याच्या टोकाला जाणे म्हणजे जणू शत्रूच्या हातून गड जिंकण्यासारखेच होते. झोंबणाऱ्या गार वाऱ्यात स्वतःला सावरत पुढे जावे लागते. यातून जर थोडा निष्काळजीपणा झाला तर लोहगडावरून देवगडावर पोहोचले जाण्याची शक्यता. त्यामुळे ग्रुपमधील सर्वांनी एकत्र राहावे आणि येथे टोकावर जाताना चिंचोळ्या रस्त्यावर दंगामस्ती करू नये. येथे ढग उतरलेले असतात. अगदी आपल्या अवतीभवतीचा परिसरही धुक्यात गायब होऊन गेलेला असतो. अंगावर ही ढगाची रेशमी चादर लपेटून आहोत असाच भास होतो. तो अनुभव शरीरातून मनापर्यंत उतरू द्यायचा असतो.

### तलाव, विहीर

लोहगडाचा विस्तार फार नाही. पण तरीही गडावर आल्यावर आपल्या पूर्वजांच्या प्रतापाचा अनुभव घेता येतो. एवढ्या उंचीवर ते कसे राहत असतील आणि तेथे कशी बांधकामे झाली असतील याची कल्पनाच केलेली बरी. गडावर तलाव आहे. तलावाच्या भोवतीने फेर धरून बसलेल्या बेडक्या असतात. आपण त्या तलावाशेजारी गेलो की या बेडक्या पटापट पाण्यात उड्या मारतात. एखाद्या पीटी शिक्षकाने आज्ञा केल्यावर जशी शाळकरी पोरे एकामागूनएक लांबउड्या मारतात अगदी तसेच या बेडक्यांचे होते. गडावर असलेल्या विहिरीत साप आहेत. आम्हाला दोन साप अगदी पायऱ्यांवर येऊन बसलेले दिसले. कदाचित हे साप विषारी नसतीलही पण तरीही त्यांच्यापासून सावध राहायला हवे. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे इथले साप, बेडूक, मासे यांचे ते घर आहे. त्यांना त्यांच्या घरात मुक्तपणे वावरू द्यावे. आपण पाहुणे आहोत. पाहुण्याच्या काठीने साप मारावा या म्हणीचा प्रत्ययवाद येथे आणण्याचे कारण नाही.



### आपली शिदोरी आपल्याबरोबरच

गडाच्या पायथ्याला किंवा गडावर राहण्याची कोणतीही सोय नाही. पायथ्याला स्थानिक लोकांनी खाण्या-पिण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे पण ती पुरेशी नाही. त्यामुळे आपल्यासोबत आपली शिदोरी असणे केव्हाही चांगले.

### लोहगडचा इतिहास

किल्ले लोहगड हा सुमारे २००० वर्षांपूर्वी बांधला गेला आहे. हा सातवाहनकालीन गड आहे. लोमेश ऋषींचे वास्तव्याचे स्थान म्हणजे लोहगड. या गडाची बांधणी ही मुख्यत: नाणे मावळ, कोर्बार्से मावळ आणि आंध्र मावळ यांच्यावर नजर ठेवण्यास केली गेली. बहामनी राज्यकर्त्यांकडून निजामशाहीत, निजामशाहीतून आदिलशाहीत असा या गडाचा प्रवास आहे. शिवाजी महाराजांनी हा गड १६४८ साली काबीज केला. नेताजी पालकर ह्या गडाचे पहिले किल्लेदार. पण १६६५ च्या पुरंदरच्या तहात तो मिर्झाराजे जयसिंग यांनी मुघल सल्तनित नेला. १६७० साली राजांनी तो परत स्वराज्यात आणला. ❒ ❒

### असे जाता येईल

- मुंबई-पुणे रेल्वे मार्गावर मळवली नावाचे रेल्वे स्थानक आहे. तेथे उतरल्यानंतर साधारणत: दीड किमी अंतरावर मळवली गाव असून तेथून पायीच जाणे सोईस्कर ठरते.
- लोहगडाच्या पायथ्यापर्यंत चांगला डांबरी रस्ता असून तेथेपर्यंत जाण्यासाठी मात्र खासगी वाहन करावे लागते.

### येथे राहता येईल

- लोहगडावर किंवा गडाच्या पायथ्याला राहण्याची कोणतीही सोय नाही. त्यामुळे लांबच्या पर्यटकांनी आणि गिर्यारोहकांनी लोणावळ्यात उतरणे खूप सोयीचे ठरते.
- लोणावळ्यात राहण्याची उत्तम सोय उपलब्ध असून लोणावळा-पुणे लोकल ट्रेनने मळवली स्टेशनवर उतरता येते.

### भेटीचा उत्तम काळ

- लोहगडाला भेट देण्यासाठी वर्षातील कोणताही काळ उत्तम असला तरी पावसाळ्यात लोहगडाने ओढलेली हिरवी चादर सुखावून जाते.
- पावसाळ्यातही जुलै-ऑगस्ट महिन्यात जेव्हा जोरदार पाऊस सुरू असतो. तेव्हा येथील अनेक धबधबे ओसंडून वाहत असतात. या धबधब्यांची मजा लुटण्याचा आनंद अवर्णनीयच असतो.

# सूत्रबद्ध नियोजन

**ध्येय पक्के असेल तर यश हमखास मिळते. मात्र त्याला जोड हवी ती परिश्रम, सूत्रबद्ध नियोजन आणि ध्येयावर ठाम राहण्याची. पुणे येथील अबोली नरवणे यांनीदेखील आयएएस होण्याच्या ध्येयावर ठाम राहत संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम तर देशात पहिल्या पाचमध्ये येण्याचा मान पटकावला आहे. यापूर्वी दुसऱ्याच प्रयत्नात त्यांची भारतीय राजस्व सेवेसाठी निवड झाली होती. परंतु आयएएस होऊन भारतीय प्रशासकीय सेवेत येण्याचे त्यांचे ध्येय होते. त्या दृष्टीने नियोजनबद्ध तयारी करून त्यांनी हे ध्येय साध्य केले. नागरी सेवा परीक्षेत यश मिळविण्याचा फार्म्युला त्यांच्याच शब्दात...**



**अबोली नरवणे**

भा.प्र.से., रँक ७८

लोकसेवा आयोगाची नागरी परीक्षा वाटते तेवढी अवघड नसतेच मुळी. शिवाय त्यासाठी अगदी १०-१२ वीपासून अभ्यास केला पाहिजे असेही नाही. अगदी पदवी शिक्षण झाल्यानंतर या परीक्षेची चांगली तयारी करता येणे शक्य आहे. पदवी शिक्षण होईपर्यंत व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला तर त्याचा या परीक्षेच्या तयारीत अधिक फायदा होऊ शकतो.

नागरी सेवा परीक्षेचा अभ्यासक्रम खूप मोठा आहे. यूपीएससीची परीक्षा संयमाचा अंत पाहणारीदेखील असल्याने या परीक्षेच्या तयारी दरम्यान संयम खूप महत्त्वाचा आहे. तो व्यक्तिमत्त्व विकासातून येतो. त्यामुळे पदवी शिक्षण सुरू असताना आवड, छंद, चर्चासत्रे, वक्तृत्व स्पर्धा आदींसाठी वेळ द्यायला हवा. पदवीनंतर नियोजबद्ध अभ्यास करून या परीक्षेत यश मिळवता येते. छंद, आवड जोपासल्यास अभ्यासाच्या तणावापासून दूर राहण्यास मदत होते आणि गुणवत्तापूर्ण अभ्यास करता येतो. मला नृत्याची आवड आहे. याचा फायदा मला अभ्यासासाठी ऊर्जा मिळविण्यात झाला.



### परीक्षेची तयारी

या परीक्षेच्या अभ्यासक्रमाची व्याप्ती खूप मोठी असल्याने प्रथम आपण तो समजून घ्यायला हवा. परीक्षेची तयारी करताना सतत अभ्यासक्रम समोर ठेवावा. नियोजनबद्ध अभ्यास करण्यावर अधिक भर दिल्यास चांगले परिणाम मिळतात.

सलग १० ते १२ तास अभ्यास केलाच पाहिजे असेही नाही. आपल्या सोयीसाठी दिवसाचे सकाळ-दुपार-संध्याकाळ, रात्र असे सोयीचे भाग पाडून टप्प्याटप्प्याने अभ्यास केल्यास चांगली तयारी होते. ठरावीक दिवशी ठरवलेला अभ्यास झालाच पाहिजे यावर आग्रही राहण्यापेक्षा जो अभ्यास होईल तो दर्जेदार कसा होईल यावर भर द्यावा. कुठल्या दिवशी कुठला आणि किती भाग वाचायचा याचा व्यवस्थित आराखडा आखून प्रत्येक विषयाची तयारी आपण करायला हवी. आपल्याला लागू होणारी अभ्यासाची पद्धत आपण स्वत: विकसित केलेली बरी. आपल्याला सोयीची असेल ती पद्धत अवलंबून घोकंपट्टीपेक्षा दर्जेदार अभ्यास करण्यावर भर द्यावा.

### गटचर्चा

सतत एकाच ठिकाणी बसून अभ्यास करण्यापेक्षा त्यात नावीन्य व वैविध्य ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. त्यासाठी गटचर्चा हा चांगला पर्याय आहे. परीक्षेपूर्वी केलेल्या गटचर्चेचा मला खूपच फायदा झाला.

दोन ते तीन तास गटचर्चेसाठी राखून ठेवले होते. यात कधीही खंड पडू दिला नाही. त्यामुळे चांगली तयारी झाली. आपल्यासमवेत या परीक्षेची तयारी करत असलेल्या मित्र-मैत्रिणींनी एखाद्या विषयावर चर्चा केली तर त्याचा फार उपयोग होते. विषयाची व्याप्ती, विषयाच्या नवीन संकल्पना एकमेकांना समजत असल्याने त्या कायमस्वरूपी लक्षात राहतात.

### उजळणी

पूर्वपरीक्षेची तयारी करताना उजळणी महत्त्वाची ठरते. आपण केलेल्या अभ्यासाची उजळणी चांगले गुण मिळविण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असते. त्यामुळे परीक्षेच्या एक-दोन दिवस आधी आपण गेल्या तीन-चार महिन्यात जे काही वाचले आहे त्याची उजळणी व्हायला पाहिजे. हेच सूत्र मुख्य परीक्षेलाही लागू होते. मुख्य परीक्षेच्या तयारीदरम्यान लेखनकौशल्य, मुद्देसूद सादरीकरण आदीवर भर देणे क्रमप्राप्त आहे. सामान्य अध्ययन, वर्तमानपत्रे, चालू घडामोडी, महत्त्वाच्या

घडामोडींसंदर्भातील विवेचन हे परीक्षेच्या एक-दोन दिवस आधी वाचल्याने माझे पेपर अधिक चांगले गेले.

### पर्याय तयार ठेवावा

यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेत प्रत्येकाला यश मिळेलच असे नाही. शिवाय काही जणांवर कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात. अशा वेळी दोन-तीन प्रयत्नानंतर मानसिक तणाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे करिअरचा दुसरा पर्याय आपण तयार

### मुलाखत

मुलाखतीची विशेष तयारी मला करावी लागली नाही. कारण मुलाखत ही परीक्षा नसते तर आपण आतापर्यंत आयुष्यात जे काही मिळवले आहे, जे काही आयुष्य जगलो आहे त्याचे प्रतिबिंब असते. आपण स्वत:ला कसे व्यक्त करतो, एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कसा आहे, आपली निर्णयक्षमता कशी आहे, स्वत:शी आपण किती प्रामाणिक आहोत इत्यादी बाबींना मुलाखतीत अधिक महत्त्व असते. मित्र-

## श्रेय आई-बाबांना



**'गुणवत्ता नसेल तरी कष्ट करून यश मिळवता येते. मात्र, कष्ट करण्याची तयारीच नसेल, तर गुणवत्ता असूनही उपयोग होत नाही,' आईने दिलेल्या कानमंत्राला माझ्या यशाचे श्रेय आहे. आईवडलांकडून मला यूपीएससीसाठी प्रोत्साहन मिळाले. बाबा सुनील नरवणे मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाले असून परीक्षेची तयारी, परीक्षेच्या वेळी अगदी माझ्यासाठी नाष्टा बनवण्यापर्यंत ते गुंतलेले असायचे. तर आई डॉ. मीनल नरवणे यशदात असल्याने मला वेळोवेळी योग्य मार्गदर्शन मिळत गेले. पुणे येथील ज्ञानप्रबोधिनीमध्ये मिळालेल्या मार्गदर्शनाचा चांगला उपयोग झाला. परंतु एखाद्या विशिष्ट स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शन घेतलेच पाहिजे वा त्यासाठी पुणे, मुंबई, दिल्ली गाठलीच पाहिजे असे नाही. आपल्या संकल्पना स्पष्ट होणे महत्त्वाचे असते.**

ठेवलेला असल्यास आपण तेवढ्याच आत्मविश्वासाने या परीक्षेला सामोरे जाऊ शकतो.

दुर्दैवाने अपयश पदरी पडल्यास आपल्याला दुसरा मार्ग खुला असतो.

मैत्रिणी, वरिष्ठांसोबत केलेली चर्चा, पेपर वाचन, बायोडाटाचा अभ्यास या गोष्टींचा मला मुलाखतीदरम्यान उपयोग झाला.

**शब्दांकन : राजाराम देवकर**



### यशाची सूत्रे

- दहा ते बारा तास घोकंपट्टी करण्यापेक्षा दर्जेदार, गुणात्मक अभ्यास कसा होईल यावर भर द्यावा.
- अभ्याससाठी दिवसाचे तीन चार भाग करून त्याप्रमाणे विषय पूर्ण करावे. अभ्यासाचे काटेकोर वेळापत्रक बनवून त्या-त्या दिवशी ठरवलेला विषय वाचून संपवावा.
- सर्वप्रथम अभ्यासक्रमाची व्याप्ती समजून घ्यावी. अभ्यासक्रम लक्षात घेऊन अभ्यास केला तरच या परीक्षेच्या तयारीला निश्चित दिशा मिळते.
- अभ्यासात तोचतोपणा ठेवण्यापेक्षा नावीन्य आणावे. नियमित गटचर्चा करावी.
- अभ्यासाच्या तणावापासून दूर राहण्यासाठी एखादा छंद जोपासल्यास उत्तमच.
- दर्जेदार वृत्तपत्रांचे संपादकीय, इंग्रजी वृत्तपत्राचे वाचन आणि चालू घडामोडींसंबंधीचे मासिक अधिक गूण मिळवून देते.
- परीक्षेपूर्वीचे १५ दिवस उजळणीसाठी राखून ठेवावे.
- एकाच विषयाच्या तयारीसाठी दोनपेक्षा अधिक पुस्तकांचा अभ्यास करणे टाळावे.
- दर्जेदार पुस्तकांचे वाचन करावे.



# विकासासाठी भूसंपादन

**निती (नॅशनल इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) आयोगाच्या संचालन परिषदेच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भूसंपादन कायद्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित 'कौशल्य विकास' कार्यक्रमासही मुख्यमंत्र्यांची उपस्थित होते.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी निती आयोगाच्या संचालन परिषदेची दुसरी बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत उपस्थित विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. राज्यांच्या विकासाची गती वाढविण्यासाठी भूसंपादन कायद्यांतर्गत संरक्षण आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांना सामाजिक परिणाम निर्धारण व संमती नियमातून वगळण्याची आणि विकास प्रकल्प सुरू न झाल्यास संपादित करण्यात आलेली जमीन पाच वर्षांनंतर परत करण्याच्या नियमात दुरुस्ती करण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत केली.

दयानंद कांबळे

### राज्यासाठी अन्यायकारक

२०१३ सालचा भूसंपादन कायदा राज्यांसाठी अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले. या कायद्यातील तरतुदींनुसार राज्यातील विविध प्रकल्पांना सामाजिक परिणाम निर्धारण नियम लागू करण्यात आला. ज्यामुळे राज्यांतील अनेक प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब लागत आहे. तर दुसरीकडे या कायद्यांतर्गत महामार्ग, कोळसा खाण आदी प्रकल्पांसह १०५ केंद्रीय प्रकल्पांना सामाजिक परिणाम निर्धारण व संमती नियमातून वगळण्यात आले होते हे त्यांनी यावेळी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

महाराष्ट्रात १८ टक्के जमीन सिंचनाखाली आहे. शेतीच्या विकासासाठी भूसंपादनाची आवश्यकता आहे. याबाबी लक्षात घेता केंद्र शासनाने सामाजिक परिणाम निर्धारणात योग्य ते बदल केल्यास भूसंपादन प्रक्रिया अधिक सुलभ होऊन राज्यांच्या विकास प्रकल्पांना चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या बैठकीत श्री. फडणवीस यांनी २०१५ सालचा सुधारित भूसंपादन अध्यादेश राज्यांना अधिक अधिकार प्रदान करणारा असल्याचे सांगितले. तथापि, विकास प्रकल्पांसाठी संपादित करण्यात आलेली जमीन संबंधित प्रकल्प सुरू न झाल्यास पाच वर्षांच्या कालावधीनंतर परत करण्याचा नियम या अध्यादेशात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक विकास प्रकल्पाचा कालावधी वेगवेगळा असू शकतो त्यामुळे जमीन परत करण्याचा कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक असावा अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

# 'कौशल्य विकास'



जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'कौशल्य विकास' कार्यक्रमाची सुरुवात केली. येणाऱ्या काळात जागतिक पातळीवर आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाचा विचार करता भारताने कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जगाला लागणारे आवश्यक मनुष्यबळ पुढील काळात भारत पुरवील, असा आत्मविश्वास पंतप्रधानांनी या वेळी व्यक्त केला. पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी कौशल्य विकासाच्या बोधचिन्हाचे तसेच कौशल्य विकास प्रारूपाचे प्रकाशन करण्यात आले. कौशल्य कार्डाचे (Skill Card) वितरणही यावेळी करण्यात आले. रेल्वे मंत्री सुरेश प्रभू, वित्तमंत्री अरुण जेटली, कौशल्य विकास राज्यमंत्री राजीव प्रताप रुडी, ऊर्जा राज्यमंत्री पियूष गोयल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, इतर राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री व वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## ऊकाई धरणाचे पाणी

गुजरातमधील नदीजोड प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील विशेष समितीच्या बैठकीत जलसंपदा राज्य मंत्री विजय शिवतारे यांनी गुजरातेतील ऊकाई धरणातून १६.५ टीएमसी पाणी राज्यातील खानदेशमधील उर्ध्व तापी खोऱ्यास देण्याची मागणी केली.

या बैठकीत राज्यातील नार-पार-तापी, वैनगंगा-गोसीखुर्द, दमण-गंगा-पिंजाळ प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात आली. नार-पार-तापी या प्रकल्पांतर्गत राज्याला मिळणाऱ्या पाण्याविषयी शिवतारे म्हणाले, या प्रकल्पातून राज्याला एकूण २८.५ टीएमसी पाणी मिळणार आहे. यापैकी १६.५ टीएमसी पाणी समुद्रात जाईल ते पाणी गुजरातला मिळावे, अशी मागणी गुजरात राज्याने केली आहे. गुजरात राज्याने केलेल्या मागणीच्या बदल्यात महाराष्ट्राला गुजरातमधील ऊकाई धरणातून १६.५ टीएमसी पाणी मिळावे, ही मागणी राज्य शासनाच्यावतीने करण्यात आली.

तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील गोदावरी खोऱ्यांतर्गत येणाऱ्या प्राणहिता सिंचन प्रकल्पाची उंची १५२ मीटर असल्याने राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील २२ आणि गडचिरोली जिल्ह्यातील ८ अशी एकूण ३० गावे बुडणार आहेत. हा धोका टाळण्याकरिता प्राणहिता सिंचन प्रकल्पाची उंची १४८ मीटर असावी, अशी मागणी होती. या मागणीवर तेलंगणा सरकारकडून सकारात्मकता दर्शविण्यात आली. दमण-गंगा-पिंजाळ या नदी जोड प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार झालेला आहे. या प्रकल्पामध्ये राज्य शासनाच्यावतीने काही महत्त्वपूर्ण बदल सुचविण्यात आले आहेत. या नदी जोड प्रकल्पातून मुंबई शहराचा २०५० पर्यंतचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.



नदी जोड प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील विशेष समितीच्या बैठकीदरम्यान चर्चा करताना जलसंपदा राज्य मंत्री विजय शिवतारे

सुमारे २१ टीएमसी पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून या प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या उर्वरित पाण्याचा उपसा करून हे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यात यावे, तसेच हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करावा, अशी मागणी श्री. शिवतारे यांनी केली.

संपर्क : ०९५८२२८२५४१

# संवाद मनातला




**आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या दिलखुलास या कार्यक्रमात गेल्या महिन्यात मुख्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया, नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू काळे, आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. कांचन जगताप आणि संपर्क बालग्राम संस्थेचे अध्यक्ष अमितकुमार बॅनर्जी यांनी श्रोत्यांशी संवाद साधला...**

**जे. एस.सहारिया,**
**मुख्य निवडणूक आयुक्त**

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त जे.एस. सहारिया यांची राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका या पार्श्वभूमीवर मुलाखत घेण्यात आली. राज्यात १५ हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुका- दोन टप्प्यात घेण्यात येणार असून सध्या सुमारे ९ हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुका जुलै आणि ऑगस्टमध्ये दोन टप्प्यात आणि ऑक्टोबर -नोव्हेंबर महिन्यात तीन हजार ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत.

जुलै महिन्यात २५ जुलै रोजी सार्वत्रिक आणि पोटनिवडणूक -कोल्हापूर नांदेड, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, सांगली, बीड या जिल्ह्यांमध्ये होणार आहेत.

**अभिमन्यू काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड, जिल्हा परिषद**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शौचालय बांधण्याच्या प्रक्रियेत नांदेड जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी 'आनंददायी शाळा' हा उपक्रम राबवण्यात आला या उपक्रमाची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिमन्यू काळे यांनी दिली. शाळाबाह्य मुलांना आनंददायी शाळेच्या माध्यमातून शाळेची सवय लागावी, यासाठी गाणी, खेळ, अभ्यास यांच्या माध्यमांतून शिक्षणाची गोडी लागली आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढ हा मुख्य उद्देश साध्य झाला असल्याचे मुलाखतीत श्री. अभिमन्यू काळे यांनी सांगितले.

**डॉ. कांचन जगताप, सहसंचालक, आरोग्य सेवा**

पावसाळा आला की अनेक साथीचे आजार उद्भवतात. या साथीच्या आजारांचे नियंत्रण आणि निर्मूलन करण्यासाठी राज्य शासनाचा आरोग्य विभाग शर्थीने प्रयत्न करीत असतो. साथीचे रोग नियंत्रण या विषयावर आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ.कांचन जगताप यांनी राज्यातील जनतेशी या कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला. साथीच्या आजारात प्रामुख्याने कॉलरा, गॅस्ट्रो यासारख्या होणाऱ्या आजारावर (क्षारसंजीवनी ORS) मिश्रित पाणी पिणे खूप महत्त्वाचे असते. तसेच लेप्टो स्पायरोसिसची लक्षणे कशी ओळखावीत, त्याचप्रमाणे राज्यात डेंग्यू या आजाराच्या नियंत्रणासाठी नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, हिवतापसारख्या आजाराची लक्षणे आढळून आल्यास तत्काळ शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधून वेळीच तपासण्या करून घ्याव्यात, असे आवाहन डॉ. कांचन जगताप यांनी केले. (साथीचे रोग याविषयी माहिती आणि मार्गदर्शनासाठी नागरिकांनी ०२०-२६६८४५५० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.)

**अमितकुमार बॅनर्जी, अध्यक्ष, संपर्क बालग्राम संस्था लोणावळा**

एखाद्या अपघाताने किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकांचे जीवन सैरभैर होते. या अपघातात अनेक कुटुंबांना आपल्या आप्तस्वकीयांना मुकावे लागते. यामध्ये अधिक झळ पोहोचते ती लहान मुलांना. अशा वेळी त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेण्यास नातेवाईक तयार होत नाहीत. या प्रसंगी या मुलांना प्रेमाचा, आपुलकीचा आधार मिळावा यासाठी तसेच त्यांना आई-वडील, भाऊ-बहीण यांचे प्रेम मिळावे, कौटुंबिक वातावरणाप्रमाणेच त्यांना शिक्षण मिळावे यासाठी बालग्राम संपर्क संस्था निर्माण झाली. हे सामाजिक कार्य करणाऱ्या संपर्क संस्थेचे संस्थापक अमितकुमार बॅनर्जी यांनी संस्थेविषयी सखोल माहिती दिली.

**- मीरा ढास**

❑ ❑



**जे. एस.सहारिया,**
मुख्य निवडणूक आयुक्त



**अभिमन्यू काळे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड, जिल्हा परिषद



**डॉ. कांचन जगताप,**
सहसंचालक, आरोग्य सेवा



**अमितकुमार बॅनर्जी,**
अध्यक्ष, संपर्क बालग्राम संस्था लोणावळा

# चौफेर मुलाखती




**राजकारण, शिक्षण, साहित्य ते स्वच्छता अभियान अशा चौफेर विषयांचा आढावा जय महाराष्ट्र कार्यक्रमातून जुलै महिन्यात घेण्यात आला. त्यात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, भारत विकास ग्रुपचे अध्यक्ष हनुमंतराव गायकवाड, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू माणिकराव साळुंखे, युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक वीरा राठोड आदींना आमंत्रित करण्यात आले होते. त्यातील काही मुलाखतींचा हा थोडक्यात आढावा...**

**गिरीश महाजन (जलसंपदा तथा पालकमंत्री नाशिक)**

कुंभमेळा हा भारतीय संस्कृती व परंपरेचा महत्त्वाचा आध्यात्मिक सोहळा आहे. हरिद्वार, अलाहाबाद, नाशिक-त्र्यंबकेश्वर आणि उज्जैन येथे दर चार वर्षांनी कुंभमेळा भरतो. यंदा नाशिक येथे हा कुंभमेळा भरला असून या कुंभमेळ्यासाठी लाखो भाविक येणार आहेत. या कुंभमेळ्याच्या निमित्ताने कोट्यवधी रुपयांची विकासकामे होणार असून प्रशासनालाही मोठी तयारी करावी लागली आहे. यंदाच्या नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील याच कुंभमेळ्याविषयी आणि प्रशासनाच्या एकूणच तयारी, नियोजनाविषयी जलसंपदा मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली.

सर्व भेदाभेद विसरून साधुमहंतांपासून सर्वच जण या कुंभमेळ्यात सहभागी होत असतात. कुंभमेळ्याची अत्यंत नियोजनबद्ध अशी आखणी करण्यात आली आहे. त्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक शिखर समिती, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तिसरी तर बांधकाम सचिवांच्या अध्यक्षतेखाली चौथी समिती स्थापन करण्यात आली आहे. या चारही समित्यांच्या माध्यमातून नियोजनबद्ध काम करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने जगभरातील भाविक आणि पर्यटक नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणार आहेत. यानिमित्ताने पर्यटनाला चालना देण्यात येणार आहे. केंद्राकडून कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. रस्ते दुरुस्ती, हरितकुंभ या संकल्पनांविषयी मंत्रिमहोदयांनी विस्तृत माहिती दिली.

**हनुमंतराव गायकवाड (अध्यक्ष, भारत विकास ग्रुप)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाची सुरुवात केली आहे. याच धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू करण्यात आले आहे. स्वच्छतेचे महत्त्व जाणून वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांचे आणि कंपन्यांचे स्वच्छतेचे काम करणारे तसेच घन कचरा व्यवस्थापनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून रोजगार निर्मिती करणाऱ्या हनुमंत गायकवाड यांनी स्वच्छतेच्या माध्यमातून साठ हजार लोकांना रोजगार उपलब्ध करून देत देशातील सर्वात मोठी नॉन लिस्टेड कंपनी त्यांनी स्थापन केली आहे. मेकॅनिकल हाऊसकिपिंग ही संकल्पना १९९९ साली सर्वप्रथम सुरू केली. संसदेपासून मंत्रालयापर्यंत त्यांचे हजारो कर्मचारी काम करीत असून घनकचरा व्यवस्थापनासाठी पुण्यात त्यांनी प्रकल्प सुरू केला आहे.

**डॉ. माणिकराव साळुंखे (कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ)**

विविध कारणांमुळे ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिले आहे अशांना शिक्षणाचे दार खुले करणारे विद्यापीठ म्हणजे नाशिकचे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ. या विद्यापीठांतर्गत कोणकोणते अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आले आहेत, अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया, परीक्षापद्धती तसेच जिल्ह्यात विविध विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी कोठे संपर्क साधावा, यासंदर्भात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी माहिती दिली.

**वीरा राठोड (युवा साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक)**

साहित्य अकादमीचे युवा साहित्य पुरस्कार नुकतेच घोषित झाले. मराठीत या पुरस्काराचा बहुमान मराठवाड्यातील कवी वीरा राठोड यांना त्यांच्या 'सेनं सायी वेस' या कवितासंग्रहासाठी मिळाला. सेनं सायी वेस म्हणजे सर्वांचं कल्याण कर. वीरा राठोड यांच्या कवितेतून हा भाव जागोजागी प्रकटतो. एका बंजारा तांड्यातून पुढे येत त्यांनी हा मैलाचा दगड गाठला आहे. राठोड यांच्या प्रश्नोत्तरांदरम्यान हा संघर्ष जाणवला.

**- अतुल पांडे**

❐ ❐



**गिरीश महाजन**
(जलसंपदा तथा पालकमंत्री नाशिक)



**हनुमंतराव गायकवाड**
(अध्यक्ष, भारत विकास ग्रुप)



**डॉ. माणिकराव साळुंखे**
(कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ)



**वीरा राठोड**
(युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त साहित्यिक)




# नवी सदरे... उपयुक्त माहिती

महान्यूज... गेली आठ वर्षे वाचकांच्या पसंतीस उतरलेले आणि ती पसंती कायम राखलेले माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे वेब पोर्टल.... हे सांगण्यात नावीन्य नसले तरीही महान्यूजची वाचकप्रियता टिकण्याचेही खास कारण आहे, ते म्हणजे यातील मजकुराची टिकून असलेली विविधता आणि वाचनीयता...

'महान्यूज' या न्यूज पोर्टलवर विविध विषयांवरील वाचनीय मजकूर तसेच शासन जे दैनंदिन काम करते ते बातम्यांच्या स्वरूपात प्रसिद्ध केले जाते. शिवाय शासनाची जी ध्येयधोरणे असतात, निर्णय घेतलेले असतात, योजना असतात त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अन्य पर्याय असणे आवश्यक होते. महान्यूजमधील सदरांची नावे कालौघात बदलली असली तरी या सदरांमधून शासनाला जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जात आहे. नेट-भेटमधून मंत्री, सचिव यांच्या मुलाखती, छायाचित्र दालनातून विशेष कार्यक्रमांची अधिक छायाचित्रे, व्हिडीओ गॅलरी, नोकरी शोधामधून रोजगाराच्या संधी, लोकराज्यच्या अंकाची थेट लिंक अशा विविध माध्यमातून दिला जाणारा मजकूर वाचकांना उपयोगी सिद्ध होत आहे.

मजकुरात तोचतोपणा येऊ नये म्हणून त्यात कालांतराने थोडाफार बदल करून नव्या स्वरूपात मजकूर देण्याचा प्रयत्न महान्यूजमधून करण्यात आला. जसे मागील काही दिवसात राज्यातील विविध विद्यापीठांची माहिती 'विद्यापीठे' या सदरातून किंवा भ्रमंतीच्या ठिकाणांची माहिती 'महाभ्रमंती' या सदरातून प्रसिद्ध करण्यात येत आहे. यातून विद्यार्थी आणि पर्यटकांना उपयुक्त माहिती दिली जात असून त्याचा त्यांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास आहे. दैनंदिन बातम्यांच्या माध्यमातून शासन स्तरावर घडणाऱ्या घडामोडींची प्रसिद्धी करणे हे महासंचालनालयाचे प्रमुख काम आहेच. महान्यूजदेखील हे काम मुख्य बातमी, मंत्रालय आणि महाराष्ट्रातील बातम्या या माध्यमातून करीत आहे.

**– ब्रिजकिशोर झंवर**

❑ ❑

# चित्रीकरणात नावीन्य

दिवसेंदिवस प्रत्येक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान येत आहे आणि या तंत्रज्ञानाचा उपयोग कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजात होणे अत्यंत आवश्यक असते. यासाठी या सुसज्ज आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देणे हे क्रमप्राप्त झाले आहे. याचाच एक भाग म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील राज्यभरातील कॅमेरामनसाठी चित्रीकरणातील अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण नुकतेच मंत्रालयात आयोजित केले होते. अत्याधुनिक तंत्र सामग्रीच्या साह्याने गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि कलात्मक चित्रीकरण कसे करावे या विषयी कार्यशाळेत प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेचा थोडक्यात वृत्तांत:

माहिती व जनसंपर्क महासंचालक चंद्रशेखर ओक यांच्या हस्ते या राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संचालक (माहिती) (प्रशासन) देवेंद्र भुजबळ, संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) शिवाजी मानकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत दूरदर्शनचे कॅमेरामन दीपक शर्मा, फिल्म डिव्हीजनचे कॅमेरामन नागराज रेवणकर, ज्येष्ठ कॅमेरामन विजय देशमुख आणि सोनी इंडियाचे प्रोजेक्ट हेड अमिताभ कुमार यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करून रोजच्या कामात उपयोगी येणाऱ्या छोट्या-छोट्या टिप्सदेखील दिल्या. कॅमेरामनने चित्रीकरणासाठी जाताना आपण कोणत्या कार्यक्रमाचे चित्रीकरण करणार आहोत याची माहिती घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे नागराज रेवणकर यांनी सांगितले. तर ज्येष्ठ कॅमेरामन विजय देशमुख यांनी ६० सेकंदात शासनाची एखादी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत कशी पोहोचवावी याचे तंत्र समजावून सांगितले. कॅमेऱ्यातील SD ते HD या तंत्रज्ञानातील महत्त्वाचे टप्पे अमिताभ कुमार यांनी समजावून सांगितले.




**कार्यशाळेत मार्गदर्शन करताना माहिती व जनसंपर्क महासंचालक चंद्रशेखर ओक, व्यासपीठावर संचालक देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर.**

**– मीनल जोगळेकर**

❑ ❑

श्रद्धांजली

# स्वप्नपूर्तीचे अग्निपंख



**भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे दि. २७ जुलै रोजी एका व्याख्यानासाठी प्रवासाला निघाले तेव्हा त्यांनी ट्विट केले होते की, 'आज शिलाँग येथील लिव्हेबल प्लॅनेट अर्थवर आयआयएमच्या विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान आहे. ज्या पृथ्वीवर त्यांचे मनापासून प्रेम होते त्यावर भाष्य करताना त्यांनी या जगाचा निरोप घ्यावा हा काव्यगत न्याय झाला.**

अब्दुल कलाम, थोर शास्त्रज्ञ होते. राष्ट्रपती होते, मिसाइल मॅन होते, पण त्याही पलीकडे जाऊन ते थोर माणूस होते. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी आपले माणूसपण जपले. त्यामुळेच ते 'लोकांचे राष्ट्रपती' होऊ शकले. लोकांच्या हृदयात अशी जागा मिळवण्यासाठी कर्तृत्व तर मोठे हवेच असते पण वर्तनही तसेच हवे असते. 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले,' या उक्तीप्रमाणेच डॉ. कलाम यांचे संपूर्ण जीवन होते.

तामीळनाडूतील रामेश्वरम येथे अतिशय गरीब घराण्यात जन्म. प्रारंभापासूनच गणितात गती. त्यामुळे पुढे शिक्षणाच्या विविध संधी मिळत गेल्या आणि त्याचे कलाम यांनी सोने केले. गेल्या २०-२५ वर्षात भारताने अंतराळ आणि अणुक्षेत्रात भव्यदिव्य झेप घेतली आहे. विविध प्रकारची क्षेपणास्त्रे यशस्वीरीत्या सोडली आहेत. उपग्रह सोडले आहेत. असे तंत्र, कौशल्य आणि ज्ञान असलेल्या जगातील मोजक्या देशांमध्ये भारताचा समावेश होतो. त्यासाठी डॉ. कलाम यांनी महत्त्वाची आणि प्रमुख भूमिका बजावली आहे. भारतीयांमध्ये अफाट क्षमता व बुद्धिमत्ता असल्याचा त्यांना ठाम विश्वास होता. या बुद्धिमत्तेच्या जोरावर भारत अशक्य ते शक्य करून दाखवू शकतो याची खात्री त्यांना होती. त्यामुळेच ते भारतीय तरुणांना सतत सांगत राहिले की, 'तुम्ही मोठी स्वप्न बघा. या स्वप्नांना खरोखरच पंख फुटतील आणि तुम्ही तुमचे उद्दिष्ट साध्य करू शकाल.'

भव्य स्वप्न आणि ते साध्य करण्यासाठी नियोजन व अथक परिश्रम आवश्यक असल्याचे ते तरुणांच्या मनावर सतत बिंबवत राहिले. त्यांना प्रेरणा देत राहिले. राष्ट्रपतिपदावर आरूढ झाल्यावर त्यांनी विद्यार्थी आणि तरुणांशी संपर्क आणि संवाद साधण्याला प्राथमिकता दिली आणि अखेरपर्यंत त्यात खंड पडू दिला नाही.

प्रचंड विद्वत्ता आणि कर्तृत्व असूनही ते वागण्याबोलण्यात अत्यंत साधे होते, निगर्वी होते. राष्ट्रपतिपदाचा कोणताही बडेजाव त्यांनी मिरवला नाही. त्यांनी सर्वसामान्यांसाठी राष्ट्रपती भवन अधिक खुले केले. पारंपरिक प्रथापरंपरांना बाजूला सारून ते कायम लोकांमध्ये मिसळत राहिले. आपल्या दांडग्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग नव्या पिढीला व्हावा यासाठी अनेक विषयांवर साधे, सरळ आणि थेट भिडणारे लेखन ते सातत्याने करत राहिले. त्यांचा प्रत्येक शब्द हृदयाचा ठाव घेतो. जगण्याची नवी दृष्टी देतो. कर्तृत्व गाजवण्यासाठी पंखात बळ देतो, आत्मविश्वास जागृत करतो.

२१ वे शतक भारताचेच असेल, भारत एक महासत्ता झालेली असेल हे स्वप्न त्यांनी बघितले आणि भारतीयांना बघायला लावले. हे सारे 'मेक इन इंडिया'ने साध्य होऊ शकते. हा त्यांचा विश्वास होता. हा विश्वास ते शेवटच्या क्षणापर्यंत आम्हा भारतीयांमध्ये जागृत करत होते. हा विश्वास सार्थ ठरवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**– सुरेश वांदिले**
संपर्क : ०९३२४९७३९४७

## कृतार्थ जीवनयात्रा...

**पूर्ण नाव :** आबुल पाकिर जैनुलादीन अब्दुल कलाम.
**जन्म:** १५ ऑक्टोबर १९३१ रोजी रामेश्वरम (तामिळनाडू).
**प्राथमिक शिक्षण :** श्वार्त्ज हायस्कूल, रामअनंतपुरम
**पदवी :** सेंट जोसेफ कॉलेज, तिरुची(विज्ञान)
**उच्च शिक्षण:** १९५४ ते ५७ मध्ये एम.आय.टी. मद्रास येथून एअरोनॉटिकल इंजिनीअरिंगमध्ये डी.एम.आय.टी.

**चढता आलेख**

**१९५८** साली डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशनमध्ये (डीआरडीओ) वरिष्ठ वैज्ञानिकाचे सहायक म्हणून नोकरी.

**१९६३ ते १९८०** या कालावधीत इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनमध्ये (इस्रो) काम.

**१९८० :** इंदिरा गांधी यांनी इंटिग्रेटेड, गाइडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्राम सुरू केला. याचे सतीश धवन पहिले संचालक होते. त्यानंतर या महत्त्वाकांक्षी योजनेची जबाबदारी डॉ. अब्दुल कलाम यांच्याकडे सोपविण्यात आली.

**११ व १३ मे १९९८ :** पोखरण येथील अणुचाचण्यात महत्त्वाची भूमिका.

**१७ जुलै २००२** रोजी देशाचे ११ वे राष्ट्रपती म्हणून शपथ.
**२४ जुलै २००७** राष्ट्रपतिपदावरून निवृत्त.

**पुरस्कार**

●१९८१ पद्मभूषण ● १९९० पद्मविभूषण ● १९९७ भारतरत्न ● १९९७ इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता ● १९९८ वीर सावरकर पुरस्कार ● २००० रामानुजम पुरस्कार ● २००७ किंग चार्ल्स (दुसरा) पदक ● २००७ डॉक्टर ऑफ सायन्स मानद पदवी २००९ हुवर पदक ● २०११ एस. गुजराथी विद्यापीठाचा डॉक्टर ऑफ सायन्स ● २०१२ डॉक्टर ऑफ लॉ (सिमॉन फ्रेजर विद्यापीठ) ● २०१४ डॉक्टर ऑफ सायन्स (एबिनबर्ग विद्यापीठ, इंग्लंड)




**टेकसेव्ही असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटसचा हा आढावा.**

पंढरपूरच्या आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला वारकऱ्यांना आश्वस्त करताना आणि पंढरपुरातील वातावरणाने भारावून

State will develop Pandharpur as pilgrimage destination and provide funds to clean Chandrabhaga

At Pandharpur since evening for Wari and various programs. The atmosphere here is full of enthusiasm & Vithhunam chants! Jai Hari Vithhal !

कारगील विजय दिवसानिमित्त...

Kargil Vijay Diwas Hon Atalji's leadership made this Victory possible! My Salaam & Tributes to the Brave sons of Bharat Mata!

ज्येष्ठ नेते रा. सू. गवई यांच्या निधनानंतर शोक व्यक्त करताना

Saddened by the demise of great leader Shri R.S Gavaiji. It is a big loss for Ambedkar movement, our State & Nation.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहताना

Paid floral tributes to Lokmanya Bal Gangadhar Tilak on His Birth Anniversary at Mantralay and Vidhan Bhawan.

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना

Congratulations to all those who cleared #UPSC Examination today! Wishing the very best to take our nation to even greater heights

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी



My salutations and tributes to the Great Social Reformer 'Lokshahir' Annabhau Sathe on His Smrutidin !

**मुलीच्या वाढदिवसानिमित्त विनोद जेठानी यांनी जलयुक्त शिवार योजनेसाठी एक लाख रुपयांचा निधी प्रदान केल्यानंतर**

Thank you Shri Vinod Jethani for donating ₹1,00,000 for #JalYuktShivar movement on your daughter Priyashi's birthday.



शेतकऱ्यांना कर्ज नाकारणाऱ्या बँकावर एफआयआर करू.

FIRagainst banks who do not give loans to farmers:

प्रोकबड्डी सामन्यांमध्ये सहभागी असलेल्या मुंबई आणि पुण्याच्या संघाला शुभेच्छा देताना

Kabaddi Maharashtra ke rago rago me daudti hai! It is our game. I wish both @U_Mumba @PuneriPaltan the best! #ProKabaddi

नाशिक येथील कुंभमेळ्यासंदर्भात

Kumbh is a symbol of world peace and prosperity. So let us together make this #kumbhmela a grand success & let it be known by 'HaritKumbh'.

दुबार पेरणीसाठी प्रति हेक्टर रक्कम रु १५०० या मर्यादेत प्रतिशेतकरी २ हेक्टरपर्यंत शेतकऱ्यांना बियाणे खरेदीकरिता अर्थसाहाय्य देण्याची तरतूद

महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...



सर्वत्र : सर्वोत्तम

**लोकराज्य**

४ लाख खप
४० लाख वाचक

ऐकायलाच हवा

**दिलखुलास** संवाद...





@२३४१

**لوک راجیہ**

उर्दू लोकराज्य

**जय महाराष्ट्र**

लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...

नाबाद...७६६ भाग

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा

**महान्यूज**

@१ कोटी ६५ लाख

**MAHARASHTRA** *Ahead*


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय


https://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th August 2015
Date of Publication : 10th of every Month


# लोकमान्य : लोकराज्य



















सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक